

# मेहता मराठी ग्रंथजगत

जून, २०१६ । किंमत १५ रुपये





## आमची वाचनीय पुस्तके
















# वेध पर्यावरणाचा

## निरंजन घाटे

**पर्यावरणाची सांगोपांग माहिती देणारा,
अद्ययावत संशोधन
निष्कर्षांवर आधारलेला ग्रंथ**

# मेहता मराठी ग्रंथजगत

। जून २०१६ । वर्ष पंधरावे । अंक सहावा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **दिनविशेष** | १० |
| **साहित्यवार्ता** | १२ |
| **पुरस्कार** | ४२ |
| *पुस्तक परिचय* | |
| **दाह** | ४८ |
| **डिनायल** | ६८ |
| **स्मरण** | ८२ |
| **श्रद्धांजली** | ८६ |
| **का ते सांगा!** | ८८ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय

## मान बुकर पुरस्काराची किमया

दक्षिण कोरियातील हान कँग या कादंबरी लेखिकेच्या ‘द व्हेजिटेरियन’ या अनुवादित कादंबरीला मान बुकर पुरस्काराचा सन्मान लाभला आहे. दक्षिण कोरियन लेखकाला प्रथमच हा मान मिळाला आहे. नोबेल पुरस्काराच्या खालोखाल सध्या मान बुकर पुरस्काराला महत्त्व प्राप्त झाले आहे. नोबेलच्या तुलनेत मान बुकरची रक्कम कमी असली तरी पन्नास हजार पौंड ही रक्कमही काही कमी नाही. नोबेल पुरस्कारासाठी आयुष्यभरातील लेखनाचा विचार केला जातो. जीवनगौरवाच्या स्वरूपाचा तो पुरस्कार असतो. मान बुकर पुरस्कार हा दरवर्षी कादंबरीला देण्यात येतो. आरंभी राष्ट्रकुलातील लेखकाच्याच स्वतंत्र इंग्लिश कादंबरीची निवड केली जाई. परंतु सन २००५ पासून इंग्रजीबरोबर अनुवादित कादंबरीलाही हा पुरस्कार देण्यात येतो. लेखक आणि अनुवादक या दोघांमध्ये विभागून तो देण्यात येतो. निवडीची पद्धत मात्र पूर्वीपासून जी आहे तीच कायम आहे. प्रथम त्या त्या वर्षातील लक्षवेधक कादंबऱ्यांची एक विस्तृत यादी बनवली जाते. त्या यादीतील दहा-बारा पुस्तकांची शॉर्ट लिस्ट जाहीर केली जाते. तीन महिने वाचकांच्या प्रतिक्रिया आणि पुस्तकाची विक्री वगैरे बाबी लक्षात घेऊन एप्रिलमध्ये खास समारंभात ॲकॅडमी ॲवार्डच्या थाटात पुरस्कार जाहीर करून तो विजेत्या लेखकाला दिला जातो. मूळ इंग्रजी कादंबरी किंवा कुठल्याही भाषेतील त्या वर्षात प्रसिद्ध

झालेला इंग्रजी अनुवाद ही प्रमुख अट. ब्रिटनमधील मूळ इंग्रजी कादंबरीला देण्यात येणाऱ्या बुकर पुरस्काराच्या जोडीने हा नवा व्यापक पुरस्कार सुरू करण्यात आलेला आहे; त्यामुळे कादंबऱ्यांच्या अनुवादालाही चालना मिळेल आणि जागतिक पातळीवर कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास करणेही शक्य होईल. इंग्रजी येत नाही, इंग्रजीत कादंबरी प्रसिद्ध होत नाही म्हणून आपणास हा पुरस्कार मिळत नाही, आपली उपेक्षा होते अशी तक्रार करायला आता जागा उरलेली नाही. १६ मे रोजी लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये मोठ्या झगमगाटात हान कँग या ४५ वर्षीय दक्षिण कोरियन महिलेला मान बुकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. मूळ कादंबरी तिने पंधरा वर्षांपूर्वी लिहिली. ती कोरियात गाजली. तिला अनेक पुरस्कार मिळाले. सेऊलच्या प्रादेशिक कला संस्थेत ती अध्यापन करते. तिच्या नावावर बरीच पुस्तके आहेत. कोरियनमधून तिचे इंग्रजीत भाषांतर दहा वर्षांपूर्वी झाले; परंतु प्रकाशन मात्र गेल्या वर्षी झाले. मान बुकरच्या शॉर्ट लिस्टमध्ये तिचा समावेश झाला आणि तिला इंग्रजी वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. एवढेच नव्हे तर मान बुकरचा सन्मानही!


'द व्हेजिटेरियन' या नावावरून कादंबरीच्या मध्यवर्ती विषयाची कल्पना येईल. आपल्याकडे जसे कट्टर शाकाहारी आणि मांसाहार घेणारे आणि त्या आहाराला धर्माचे अधिष्ठान देणारे लोक आहेत. जाती-जमाती आहेत, तसेच ते कोरियातही आहेत. या कादंबरीची नायिका यंग हाय ही गृहिणी आहे. कुटुंबाच्या खाण्या-पिण्याच्या सर्व चौकटी ती पाळते. एके रात्री तिला एक स्वप्न पडते, आपण मांसाहाराचा त्याग करून शाकाहारी होणार असे ती कुटुंबातील सर्वांना सांगते. आजवर समाजात मांसाहारी म्हणून कुठलेही नियम न पाळणारे कुटुंब त्यातील मुख्य गृहिणी मांसाहार सोडणार तर आपला निभाव कसा लागणार असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. तिचा नवरा, मेहुणा, बहीण, वडीलधारी माणसे सर्वजण आरंभी तिचे बोलणे थट्टेवारी नेतात; पण जेव्हा यंग हाय इतरांसाठी मांसाहारी पदार्थ करते; आणि ती स्वत: मात्र शाकाहारी पदार्थच खात आहे हे कुटुंबीयांना दिसते तेव्हा

त्यांच्यात चर्चा सुरू होते. एखाद्या शाकाहारी जैन कुटुंबात मांसाहारी मुस्लीम स्त्री सून म्हणून आल्यावर काय होते याची कल्पना करा. बहुसंख्य लोकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी सोडून त्या विरोधी पद्धतीचा आहारविहार स्वीकारणाऱ्या एखाद्या स्त्रीची कुचंबणा होणे अपरिहार्य आहे... असे काही केल्याने घर उद्‌ध्वस्त होऊ शकते. प्रत्येक धर्म, समाज हा विशिष्ट नीतिनियमांचा आचारधर्माचा आग्रही असतो. त्याला विरोध केला तर तो सहन केला जात नाही.

...या कादंबरीने युरोपियन देशात वादळ उठले.

मान बुकर पुरस्कारामुळे असे अनेक वादग्रस्त विषय कादंबऱ्यांमध्ये येऊ लागतील. भाषाभाषांतील अंतर, खाण्या-पिण्यातील अंतर, भिन्नभिन्न जीवनस्तर यांच्यातील बारकावे आणि अंतर्विरोध स्पष्ट होतील.

यापुढे अशा वेगवेगळ्या समाजातील समस्यांवर कादंबरीकारांचा भर राहील. अनुवादाच्या माध्यमातून व्यापक कादंबरीविश्वाचे दरवाजे खुले होतील. जागतिकीकरणामुळे ही प्रक्रिया वेगवान होईल. यापुढील काळ हा अनुवादाचा काळ असेल. इंग्रजीच्या आग्रहामुळे होणारी कोंडी फुटेल. वेगवेगळ्या भाषांतून अनुवाद होण्याला आणि विश्वसाहित्याला स्वागतार्ह वातावरण तयार होईल. दक्षिण कोरियाच्या हान कँगच्या बुकरने सर्वच भाषांतील लेखकांना आपले आशयक्षेत्र विस्तृत झाल्याची जाणीव होईल.



# ग्रंथजगत

## विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks



# दिन विशेष

## पर्यावरण रक्षण करू या!!

*किलबिल किलबिल पक्षी बोलती । झुळझुळ झुळझुळ झरे वाहती ।।*
*पानोपानी फुले बहरती । फुलपाखरे वर भिरभिरती ।।*

हे गाणे ऐकले किंवा गुणगुणले तरी प्रसन्न निसर्ग मन:चक्षुंसमोर उभा राहतो. निसर्गाचेच दुसरे नाव पर्यावरण आणि ते टिकवून ठेवणे, त्याचे जतन व संवर्धन करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे; कारण आपण सर्व म्हणजे माणूससुद्धा पर्यावरणाचा एक घटक आहे हे प्रथम लक्षात घ्यायला हवे. पर्यावरणरक्षण हा उत्सव व्हावा, आपल्याला त्याची सतत आठवण राहावी यासाठी दरवर्षी 'पर्यावरण दिन' साजरा करण्यात येतो.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीने १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे भरलेल्या पर्यावरणविषयक परिषदेमध्ये ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जाहीर केला. जगातील सुमारे शंभरपेक्षा जास्त देशांमध्ये हा दिवस विविध पर्यावरणविषयक उपक्रमांनी साजरा होतो. प्रत्येक माणसामध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे म्हणजेच संपूर्ण राष्ट्राने या संदर्भात पुढाकार घेणे हा याचा मुख्य हेतू आहे. यामध्ये पर्यावरणाची समस्या सोडवून गुणवत्ता वाढवण्याबरोबर प्रत्येक व्यक्तीत पर्यावरणरक्षण आणि संवर्धनाविषयी निर्णय घेण्याची क्षमता यावी आणि त्याची प्रत्यक्ष कार्यवाही व्हावी यासाठी पोषक वातावरण तयार करणे अपेक्षित आहे.

निसर्गाने मानवाला अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसह अनेक सोयी-सुविधा बहाल केल्या; पण सर्वात बुद्धिमान माणसाच्या स्वार्थी, बेफिकीर आणि अविचारी वृत्तीने पर्यावरणाचा अमर्याद वापर केल्याने त्याचा ऱ्हास होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या. पाण्याचा बेसुमार उपसा केल्याने काही लोक पाण्याचाही (पाणी विकून) पैसा करतात तर दुसरीकडे काहींना पिण्यासाठीसुद्धा पाणी विकत घ्यावे लागते. आपण खनिजसंपत्ती विशेषत: पेट्रोलसारखे जमिनीतील इंधनसाठे काढून ते संपवीत आहोतच; आता

किमान पवनऊर्जा आणि सौरऊर्जा उपयोगात आणताना निसर्गाला हानी पोहोचणार नाही याची दक्षता बाळगायला हवी. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी रासायनिक औषधे आणि खतांचा वापर केला जातो. त्यावर सेंद्रीय पद्धतीने शेती करणे हा चांगला उपाय आहे.

इमारतींच्या बांधकामासाठी तसेच रहिवास आणि अन्य कारणांसाठी दिवसेंदिवस जंगलतोड वाढत असल्याने वनक्षेत्र कमीकमी होत आहे; त्यामुळे जंगलाच्या आश्रयाने राहणारे अनेक दुर्मीळ पशू-पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या संदर्भात **'जीवो जीवस्य जीवनम्'** हे तत्त्व ध्यानात ठेवून त्याप्रमाणे आपण सर्वांनी आचरण करायला हवे.

लोकसंख्यावाढआणि वाढते शहरीकरण हे पर्यावरणाला घातक ठरणारे घटक आहेतच; पण 'ग्लोबल वॉर्मिंग'चे दुष्परिणाम आता थेट आपल्या घरापर्यंत आले आहेत. ऋतुचक्रात झालेले (अपुरे पर्जन्यमान आणि तीव्र उन्हाळा) बदल आपण प्रत्यक्ष अनुभवतो आहोत. वेळीच सावध झालो नाही तर आपणच आपल्यासाठी सर्वनाश ओढवून घेत आहोत, असे म्हणावे लागेल. निसर्गाप्रती कृतज्ञतेचा नियम पाळून पर्यावरणाशी जो योग्य प्रकारे समन्वय साधतो तोच पर्यावरणात जिवंत राहू शकतो. मानवी जीवनही याला अपवाद नाही.

पर्यावरणरक्षण ही काळाची गरज आहे आणि ती आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. ती यथायोग्यपणे पार पाडण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे ही सामाजिक बांधिलकी आहे. कारण पर्यावरण टिकवणे हेच आज खऱ्या अर्थाने अतिशय महत्त्वाचे झाले आहे. पर्यावरण टिकले तरच पृथ्वीवरील प्रत्येक जीव सुरक्षित व संरक्षित राहील. प्रत्येक नागरिकाने पर्यावरणासंदर्भात अधिक जागरूकतेने जीवन जगल्यास, जैवविविधतेचा विकास घडवून आणल्यास भविष्यात पर्यावरणाचा समतोल राखला जाऊ शकतो. ही सांघिक प्रकारची कामगिरी आहे. आपण असे वागावे आणि इतरांना तसे वागण्यास प्रेरणा व प्रोत्साहन द्यावे. यामध्ये प्रत्येकाने खारीचा वाटा उचलायला हवा; अर्थात या चांगल्या कामास स्वत:पासून सुरुवात करावी आणि पर्यावरण संतुलनास आपल्या परीने हातभार लावावा.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा! चला, यानिमित्ताने आपण पर्यावरणरक्षणाचा संकल्प करू या आणि तो प्रत्यक्ष कृतीत आणू या.

**– उदय हर्षे**

# साहित्य वार्ता

## ✍ सरस्वती नदीविषयी संशोधनास वाव

"भारतात संस्कृतीचा उगम ज्या नद्यांच्या प्रदेशात झाला त्यामध्ये सरस्वती नदीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. या नदीवर आधारित संशोधनामुळे पुराणातील अनेक गोष्टींमध्ये तथ्य असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे; त्यामुळे सरस्वती नदीविषयी आणखी संशोधन करण्यास वाव आहे," असे मत ज्येष्ठ पुरातत्त्व शास्त्रज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

शरच्चंद्र लिमये लिखित 'आणि सरस्वती नदी लुप्त झाली... गुप्त झाली' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. देगलूरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी इतिहास अभ्यासक आनंद दामले, भगवंतराव ठिपसे आदी उपस्थित होते.

डॉ. देगलूरकर म्हणाले, "पुराणात सांगितल्याप्रमाणे प्राचीन काळातील भारतीय संस्कृती खूप प्रगल्भ होती, याला या नदीसंदर्भातील संशोधनामुळे दुजोरा मिळाला; परंतु आपल्याकडील लोकांना आजही इंग्रजांनी सांगितलेला इतिहास जास्त जवळचा वाटतो. पुराणातील गोष्टींना भाकड कथा मानून त्याकडे दुर्लक्ष केले जाते; असे न करता डोळसपणे पुराण साहित्य समजून घेणे आवश्यक आहे."

## ✍ 'प्रकाशपर्व' पुस्तकाचे प्रकाशन

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व समाजांना समान न्याय मिळेल या दृष्टीने काम केले; परंतु अनेक लेखकांनी बाबासाहेबांनी अन्य धर्म व समाजासाठी केलेल्या कार्याकडे दुर्लक्ष केले. याउलट बाबासाहेबांना दलितांपुरते मर्यादित ठेवण्याचा करंटेपणा त्यांनी केला," असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उमेश चव्हाण यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर लिहिलेल्या 'प्रकाशपर्व' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. सबनीस यांच्या हस्ते झाले. यावेळी योग प्रशिक्षक दत्ता कोहिनकर, भारिप

बहुजन महासंघाच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. वैशाली चांदणे, नगरसेवक धनंजय जाधव, चव्हाण, यशोदीप पब्लिकेशन्सचे निखिल लंभाते उपस्थित होते. यावेळी मच्छिंद्र गायकवाड व राम जगदाळे यांना 'बहुजन प्रकाश' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. सबनीस म्हणाले, ''बाबासाहेबांप्रमाणेच प्रकाश आंबेडकर यांनीही दलितांसह ओबीसी, आदिवासी, कामगार यांच्यासाठी भरीव कार्य केले आहे. आंबेडकरांनंतरच्या चळवळीच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे काम हे पुस्तक करेल.''

चांदणे म्हणाल्या, ''प्रकाश आंबेडकर यांच्या आयुष्य व कार्याचा वेध घेण्याची अवघड जबाबदारी चव्हाण यांनी पार पाडली. ॲड. आंबेडकरांचे दलित चळवळीतील कर्तृत्व मोठे असल्याने त्यांच्याविषयीची समाजाला माहिती असणे आत्यंतिक महत्त्वाचे होते.''

## ✍ वारकरी साहित्य संमेलन

पाचवे वारकरी साहित्य संमेलन पंढरपूरचे वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ अभ्यासक बद्रिनाथमहाराज तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील एआयएसएसएमएस मैदानावर २१ ते २३ मे या कालावधीत झाले. दिंडी सोहळ्याने संमेलनाची सुरुवात झाली. 'संतांच्या भूमिकेतून पाणीनियोजन', 'पर्यावरणाची गरज', शेतीशी निगडित जोडधंदे', 'शासन आणि शेतकरी', 'शेतीचे पणन आणि अर्थशास्त्र', 'कृषी शिक्षण' अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

याशिवाय सत्कार सोहळे, हरिपाठ, कीर्तन, गायन असे भरगच्च कार्यक्रमही या संमेलनात झाले.

## ✍ भारतीयांच्या संपत्तीत चारशे टक्क्यांनी वाढ

गेल्या दहा वर्षांत (२००५ ते २०१५) भारतातील नागरिकांच्या संपत्तीमध्ये सरासरी चारशे टक्क्यांनी वाढझाली असून, युरोपीय नागरिकांच्या संपत्तीमध्ये सरासरी पाच टक्क्यांनी घट झाल्याचे 'न्यू वर्ल्ड वेल्थ'च्या अहवालात म्हटले आहे.

भारत, चीन, व्हिएतनाम या देशांतील संपत्ती २००५ ते २०१५ या

दहा वर्षांत चारशे टक्क्यांनी वाढली आहे. सध्या युरोपातील नागरिक सुमारे ८६ हजार अमेरिकी डॉलर कमावतो. त्यामध्ये गेल्या दहा वर्षांत पाच टक्क्यांनी घट झाली आहे. या काळात ऑस्ट्रेलियातील नागरिकांची संपत्ती सरासरी शंभर टक्क्यांनी वाढली, तर कॅनडामध्ये ५० टक्क्यांनी वाढली आहे. श्रीमंत लोक युरोपातून दुसरीकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे (स्थलांतर मुख्यत्वे अमेरिका, कॅनडा, न्यूझीलंड, कॅरेबिअन, ऑस्ट्रेलिया या ठिकाणी झाले आहे.) युरोपातील संपत्तीचे प्रमाण कमी झाले आहे. २००८ मध्ये उद्‌भवलेल्या जागतिक आर्थिक संकटाचाही मोठा फटका युरोपला बसला आहे.

युरोपातील पोलंडसारखे काही देश आर्थिक क्षेत्रात चांगली कामगिरी करण्याची शक्यता आहे. पश्चिम आणि दक्षिण युरोपातून मोठी वाढहोण्याची अपेक्षा नाही. जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, इटली, स्पेन या देशांना संघर्ष करावा लागेल, असे अहवालात नमूद केले आहे. नागरिकांची संपत्ती मोजताना नागरिकांकडे असणारा रोख पैसा, संपत्ती, उद्योग आदी बाबी विचारात घेण्यात आल्या होत्या.

## ✍ पंडित संगमेश्वर गुरव स्मृती पुरस्कार

''मला बाबांनी गाणं शिकवलं... आणि आईने जगणं शिकवलं! आई नसती तर मी या क्षेत्रात आलोच नसतो. बाबांना सुरुवातीला मी गाण्याच्या क्षेत्रात यावं की नाही, याबद्दल शंका होती. मी त्या कष्टांतून जाऊ नये, असं त्यांना वाटत होतं; पण आई खंबीरपणे मागे उभी राहिली आणि आज मी इथवर पोचू शकलो. गाण्याच्या क्षेत्रात खडतर परिश्रम लागतातच. मी 'अभिषेकी' असलो तरी मलाही तेवढेच कष्ट घ्यावे लागले, त्यात कोणताही सोपा मार्ग नसतो,'' अशा शब्दांत गायक पंडित शौनक अभिषेकी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

किराणा घराण्याचे प्रख्यात गायक पंडित संगमेश्वर गुरव यांच्या स्मृतिदिनानिमित्त कलानुभव चॅरिटेबल ट्रस्टने आयोजित केलेल्या संगीत महोत्सवात अभिषेकी यांना 'पंडित संगमेश्वर गुरव स्मृती सन्मान पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. ज्येष्ठ भरतनाट्यम नृत्यांगना सुचेता भिडे - चापेकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. ट्रस्टच्या विश्वस्त भारती

**२री आवृत्ती**

# मालनगाथा

लेखक - **इंदिरा संत**

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**




...पहाटेची वेळ. एका डोंगरदरीत विसावलेले एक खेडेगाव. सर्व घरे साखरझोपेत असलेली. पण घरातील ओसरीशी वा पडवीशी एक ठाणवई मिणीमिणी उजळत असलेली. त्या प्रकाशात जात्याशी बसलेली एक मालन. एक मांडी घालून, एक पाय लांब सोडलेला. तिचा काकणांनी भरलेला हात जात्याचा खुंटा धरून जाते फिरवीत असलेला. दुसरा हात मधून मधून बाजूच्या सुपातील जोंधळे मुठीने घेऊन जात्याला भरवीत असलेला. जात्याचा तो मंद सुरातील घर्र घर्र असा वळणे घेणारा आवाज. दळतानाच्या हालचालींची मालनीची वळणदार लय आणि यात एकरूप झालेली ती मालन.

जसे पीठ जात्यातून झरत जाते, तशा तिच्या ओठांतून शब्दकळ्या उमलू लागतात. ओव्यांमागून ओव्या गात असता दळण कधी संपते, तिला कळत नाही. त्या ओव्याही ओळीला ओळ जोडून, घोळून घोळून, उंच स्वरात गायच्या. ओवीच्या शेवटच्या ओळीच्या अखेरीस एक लांब असा हेल देऊन त्याच्या टोकानेच दुसरी ओवी उचलायची. या ओवीत काय नसायचे? अवघ्या स्त्रीजीवनाला त्यांनी स्पर्श केलेला असायचा. सुपली-कुरकुळीच्या खेळापासून घाण्याच्या बैलासारख्या ओढलेल्या कष्टांपर्यंत. न्हाणवलीच्या सुखद सोहळ्यापासून मरणवेळेच्या काळापर्यंत. शृंगाररसापासून ईश्वराशी जडलेल्या सौहार्दरसापर्यंत. पुत्रजन्मापासून वैधव्याच्या आकांतापर्यंत, जे जे म्हणून स्त्रीला भावले, ते सर्व या ओवीत आहे. ते एक अमृतानुभवाचे अथांग असे मानससरोवर आहे...

बऱ्हाटे, नरेंद्र बऱ्हाटे, पंडित कैवल्यकुमार गुरव यावेळी उपस्थित होते.

अभिषेकी म्हणाले, ''संगीताच्या क्षेत्रातील अवतारी देवमाणसांपैकी एक म्हणजे पं. संगमेश्वर गुरुजी होते. आमच्यासाठी तर ते या क्षेत्रातील एव्हरेस्ट शिखरच! त्यांच्या नावाने पुरस्कार मिळणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. अशा पुरस्कारांनी कलाकारांची समाजाप्रती जबाबदारी वाढते.''

भिडे म्हणाल्या, ''अभिजात कलांमध्ये वारसा आणि परंपरा महत्त्वाच्या आहेतच; पण त्याचबरोबर कलेची साधनाही तितकीच महत्त्वाची आहे.''

कार्यक्रमाच्या सुरुवातीस राग 'गावती'ने शौनक यांनी आपल्या गाण्याची सुरुवात केली. पंडित रामाश्रय झा यांनी रचलेला 'तुम्हारे चरणकी आस लागी... तुम्हारे दर्शनकी आस लागी' हा ख्याल आणि त्यांनतर द्रुत बंदिश ते गायले. 'कालिंदी सरस्वती...' ही एकत्रित तीन रागांची 'त्रिवेणी' गाऊन शौनक यांनी मैफलीस एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले.

## ✍ गदिमा स्मारक

आपल्या गीतांमधून संपूर्ण महाराष्ट्रावर अधिराज्य गाजविणारे गीतकार ग. दि. माडगूळकर यांच्या स्मारकाच्या कामाला गती मिळावी, यासाठी आवश्यक तो पुढाकार घ्यावा, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर मुकारी अलगुडे यांनी जिल्हाधिकारी सौरव राव यांची भेट घेऊन केली.

माडगूळकर यांच्या नावाने वाकडेवाडी भागात स्मारक उभारण्याचा'संकल्प' महापालिकेने केला आहे. या स्मारकासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून हे काम रखडले आहे. जिल्हाधिकारी यांनी यामध्ये पुढाकार घेऊन गदिमांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, त्याचप्रमाणे महापालिकेने स्मारक उभारण्यासाठी पुरेशी तरतूद करून स्मारकाचे काम लवकरात लवकर करावे, असे उपमहापौर अलगुडे यांनी सांगितले.

वाकडेवाडी भागातील मुठा नदीच्या काठी स्मारकासाठी जागा निश्चित झाली होती. त्यावेळी राष्ट्रीय हरित लवादाने नदीच्या कडेला बांधकाम करण्यास मज्जाव केल्याने अडचण निर्माण झाली होती.

बांधकाम करण्यास 'एनजीटी'ची हरकत असल्यास याच भागात उपलब्ध असलेल्या सरकारी जमिनींमधील काही जमीन जिल्हा प्रशासनाने

पालिकेला स्मारक आणि बागेसाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अलगुडे यांनी केली. याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले. गदिमांचे नातू सौमित्र माडगूळकर, भाषा संवर्धन प्रतिष्ठानचे प्रवीण वाळिंबे, संवाद पुणेचे सुनील महाजन, पालिकेचे उद्यान अधीक्षक अशोक घोरपडे आदी उपस्थित होते.

## ✍ महाराष्ट्राचा इतिहास केंद्रीय अभ्यासक्रमात

स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचा गौरवशाली सहभाग होता. हा गौरवशाली इतिहास सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई आणि आय.बी. या केंद्रीय अभ्यासक्रमांत बंधनकारक करण्यात येईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी दिली. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार पश्चिमी क्षेत्र, सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे पुणे येथे स्वातंत्र्यसेनानी तात्या टोपे जन्मद्विशताब्दी सोहळा झाला.

तात्या टोपे यांचे जन्मगाव येवला येथे केंद्र शासनाच्या सहकार्याने स्मारक उभारण्यात येईल.

## ✍ गौरव दिनी मराठीचा जागर

मराठीची ओळख असणारी ‘युनिकोड’ भाषा जागतिक पातळीवर नेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. युनिकोड कन्सेर्टियम या आंतरराष्ट्रीय मानक संस्थेचे सदस्यत्व मिळाल्यावर मराठी भाषा संगणकीकरण क्षेत्र जागतिक स्तरावर प्रमाणित होईल.

मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा करून मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

अहमदनगर येथील बेबीताई गायकवाड यांना पहिल्या कविवर्य मंगेश पाडगांवकर भाषासंवर्धक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. परदेशातून महाराष्ट्रात येऊन मराठी भाषेचा सखोल अभ्यास करणाऱ्या डॉ. श्रीमती मॅक्सीन बर्नसन यांना पहिला डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार

प्रदान करण्यात आला.

## ✍ मराठी भाषा विकासाच्या प्रकल्पांना अग्रक्रम

राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची तब्बल पाच वर्षांनंतर प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. मराठी भाषा समृद्ध करण्याच्या दृष्टीने आगामी काळात संगणकीय मराठी, दलित, ग्रामीण शब्दकोशांच्या पुढील आवृत्ती व सूची, शेतीकोश तसेच परिभाषा कोश यांची निर्मिती करण्यात येईल. बोली भाषेत नाट्य स्पर्धा आयोजित करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, तसेच अमराठी भाषकांमध्ये मराठीची रुची निर्माण करण्यासाठी संगीताचा वापर करण्यात येईल, अशी माहिती मराठी भाषा विकासमंत्री विनोद तावडे यांनी दिली.

विकीपिडीयाच्या धर्तीवर संगणकीय मराठी भाषा विकसित करण्यात येणार आहे. बळीराजाच्या माहितीसाठी शेतीकोश तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्याच पद्धतीने देवनागरी आणि मोडी लिपीचे प्रशिक्षणही सुरू करण्यात  येईल. राज्य मराठी विकास संस्थेअंतर्गत होणाऱ्या भविष्यातील प्रकल्पासाठी मराठी भाषा विकासमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात येणार आहे. मराठी संकेतस्थळाची स्पर्धा, मराठी ग्रंथ सूचीमाला वस्त्रनिर्मिती माहिती कोश, वैज्ञानिक पुस्तकांचा अनुवाद आदी प्रकल्प अग्रक्रमाने हाती घेण्यात येतील, असेही तावडे यांनी सांगितले.

## ✍ पुरस्कारप्राप्त चित्रपटांना अनुदान

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य देण्याच्या योजनेअंतर्गत सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते विविध पुरस्कारप्राप्त चित्रपट आणि निर्मात्यांचा धनादेश आणि पुस्तके देऊन गौरव करण्यात आला. अवताराची गोष्ट, जयजयकार, एक हजाराची नोट, एलिझाबेथ एकादशी, यलो, फँड्री आणि लोकमान्य - एक युगपुरुष या पुरस्कारप्राप्त मराठी चित्रपटांना अनुदान देण्यात आले.

## ✍ सीमावर्ती भागांमध्ये मराठी शाळा

सीमावर्ती भागातील मराठी भाषकांच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी माध्यमातून शिक्षण देण्याच्या दृष्टीने सरकार वचनबद्ध आहे. या भागातील मराठी भाषकांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, अशी भूमिका शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी विधानपरिषदेत मांडली. आशिष शेलार यांचा सत्कार करण्यात आला. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून कोकणातील महामार्ग चौपदरीकरणासाठी सुमारे २०,००० कोटी रुपये आलेले आहेत. यामुळे कोकणात मोठे परिवर्तन होणार आहे. रेल्वेमार्गाचे विस्तारीकरण, सागरी महामार्ग, चिपी विमानतळ, मासेमारी, पर्यटन, शेती या क्षेत्रांसाठीही सरकारने भरीव मदत केली आहे.

## ✍ तंत्रज्ञानाकडे डोळसपणे पाहण्याची गरज

आधुनिक काळात तंत्रज्ञान हे लष्करी डावपेचांबरोबरच विदेशनीतीमध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अर्थात, तंत्रज्ञानाचे जसे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. त्यातून निर्माण होणारी सायबर हल्ल्यांसारखी आव्हानेही मोठी आहेत; त्यामुळे तंत्रज्ञान सिद्धतेकडे डोळसपणे पाहायला हवे, असे मत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे माजी सदस्य प्रा. अमिताव मल्लिक यांनी व्यक्त केले.

पुणे इंटरनॅशनल सेंटर आणि सेंटर फॉर ॲडव्हान्स स्ट्रॅटेजिक स्टडीज यांच्या उपस्थितीत ‘यशदा’ येथे प्रा. मल्लिक यांच्या ‘रोल ऑफ टेक्नालॉजी-इन इंटरनॅशनल अफेअर्स’ या पुस्तकाचे प्रकाशन झाले. पीआयसीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, उपाध्यक्ष डॉ. विजय केळकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर, एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, माधव मंगलमूर्ती, पीआयसीचे मानद संचालक प्रशांत गिरबने आदी यावेळी उपस्थित होते.

‘‘देशाच्या संरक्षणसिद्धतेच्या अनुषंगाने तांत्रिकदृष्ट्या पुरेसे सबळ होण्यासाठी भारताने वेळोवेळी अमेरिका आणि सोव्हियत युनियनशी लष्करी पातळीवर संबंध प्रस्थापित केले आहेत. देशात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांची भूमिका त्यात महत्त्वाची ठरली होती. सोव्हियत युनियनचा पाडाव झाल्यानंतर भारत-अमेरिका संबंध वाढविण्याची गरज त्यांनी अचूक हेरली होती. त्यातूनच

'नेक्स्ट स्टेप्स इन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' यासारख्या विदेशनीती आपल्याकडे रुजू झाल्या आणि सत्तासमीकरणे बदलली.''

''विकसनशील देश असल्यामुळे आजही अनेकदा आधुनिक तंत्रज्ञानात आपण मागे असल्याचा आपल्याला फटका बसतो हे नाकारता येणार नाही. उच्च दर्जाचे तंत्रज्ञान दरवेळी आपल्याला उपलब्ध होतेच असे नाही. नवे तंत्रज्ञान इतर देशांकडे जाऊ नये, असा अनेक विकसित देशांचा प्रयत्न असतो. आपण कशी प्रगती करतो, हे महत्त्वाचे ठरते,'' असे मत डॉ. माशेलकर यांनी व्यक्त केले.

## ✍ भारतातील सर्वांत मोठा वॉटरपार्क

लोणावळा इथे नुकत्याच सुरू झालेल्या 'वेट-एन-जॉय' वॉटरपार्कला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या थरारक राइड्स आणि भारतातील सर्वांत मोठा वेव्हपूल या आकर्षणांमुळे प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे.

संगमनेरस्थित मालपाणी उद्योग समूहाच्या २५ एकरांमध्ये पसरलेल्या या वेट-एन-जॉय वॉटरपार्कला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

वेट-एन-जॉयचे संचालक मनीष मालपाणी म्हणाले, ''पार्कमधील सर्व राइड्सची उभारणी नॉर्थ अमेरिकेतील व्हाइट वॉटर इंडस्ट्रीज या कंपनीने केली असून, या सर्व राइड्स सुरक्षित आहेत. त्याचबरोबर ६०,००० चौरसफुटांचा वेव्हपूल आनंदाच्या लाटांवर स्वार होण्याचा अविस्मरणीय अनुभव देणारा आहे.''

सर्वात मोठ्या वेव्हपूलसोबतच भारतात पहिल्यांदाच क्रेझी रिव्हर, इंटरॅक्टिव्ह फन झोन, ५० फूट उंच कोस्टर ब्लास्टर (वॉटर राइड्स आणि रोलर कोस्टरची एकत्रित मजा), मुलांसाठी व परिवारासाठी १० हजार चौरसफुटांचा आणि ९० हून अधिक धमाल आकर्षणे असलेला द रॉयल कॅसल - प्ले स्टेशन वेट-एन-जॉयमध्ये अनुभवायला मिळतो.

मनीष मालपाणी यांनी मिळालेल्या प्रतिसादाबाबत समाधान व्यक्त केले. ''अत्यल्प कालावधीत मिळालेला उदंड प्रतिसाद सुखावह आहे. आपण सगळ्यांनी वॉटरपार्कला येऊन भारतातील सर्वात मोठ्या राइड्सचा अनुभव घ्यावा, असे मी आवाहन करतो,'' असे ते म्हणाले.

खवय्यांसाठी वॉटरपार्कमध्ये ओशन रिट्रीट (मल्टी-क्विझीन रेस्टॉरंट),

२री आवृत्ती

# मालनगाथा : २

लेखक

**इंदिरा संत**

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




...पहाटेची वेळ. एका डोंगरदरीत विसावलेले एक खेडेगाव. सर्व घरे साखरझोपेत असलेली. पण घरातील ओसरीशी वा पडवीशी एक ठाणवई मिणीमिणी उजळत असलेली. त्या प्रकाशात जात्याशी बसलेली एक मालन. एक मांडी घालून, एक पाय लांब सोडलेला. तिचा काकणांनी भरलेला हात जात्याचा खुंटा धरून जाते फिरवीत असलेला. दुसरा हात मधून मधून बाजूच्या सुपातील जोंधळे मुठीने घेऊन जात्याला भरवीत असलेला. जात्याचा तो मंद सुरातील घर्र घर्र असा वळणे घेणारा आवाज. दळतानाच्या हालचालींची मालनीची वळणदार लय आणि यात एकरूप झालेली ती मालन.

जसे पीठ जात्यातून झरत जाते, तशा तिच्या ओठांतून शब्दकळ्या उमलू लागतात. ओव्यांमागून ओव्या गात असता दळण कधी संपते, तिला कळत नाही. त्या ओव्याही ओळीला ओळ जोडून, घोळून घोळून, उंच स्वरात गायच्या. ओवीच्या शेवटच्या ओळीच्या अखेरीस एक लांब असा हेल देऊन त्याच्या टोकानेच दुसरी ओवी उचलायची. या ओवीत काय नसायचे? अवघ्या स्त्रीजीवनाला त्यांनी स्पर्श केलेला असायचा. सुपली-कुरकुळीच्या खेळापासून घाण्याच्या बैलासारख्या ओढलेल्या कष्टांपर्यंत. न्हाणवलीच्या सुखद सोहळ्यापासून मरणवेळेच्या काळापर्यंत. शृंगाररसापासून ईश्वराशी जडलेल्या सौहार्दरसापर्यंत. पुत्रजन्मापासून वैधव्याच्या आकांतापर्यंत, जे जे म्हणून स्त्रीला भावले, ते सर्व या ओवीत आहे. ते एक अमृतानुभवाचे अथांग असे मानससरोवर आहे...

द इटालिया (इटालियन रेस्टॉरंट) आणि महाराष्ट्र माझा अशी तीन रेस्टॉरंटस् आहेत. त्याचबरोबर  कॉर्न, पॉपकॉर्न, आइस्क्रीम, कोल्ड्रिंक्सचीही मजा घेता येणार आहे.

निसर्गरम्य सौंदर्याने वेढलेले आणि उंच पर्वतांनी घेरलेले वेट-एन-जॉय लोणावळ्यापासून फक्त ८ किलोमीटरवर आहे. वेट-एन-जॉयचे संचालक राजेश मालपाणी म्हणाले, ''प्रकल्पासाठी लागणारे पाणी जवळच्याच दगडांच्या खाणीतून आणले जाते. पाण्याचा पुनर्वापर करण्यापूर्वी त्यावर नीट प्रक्रिया केली जाते, ज्यामुळे ते शुद्ध होते. निसर्गाच्या अनमोल देणगीचा अपव्यय होणार नाही याची पुरेपूर दक्षता घेतली जाते. त्याचप्रमाणे वॉटरपार्कच्या पार्किंगमध्ये भारतातील सर्वात मोठा एक मेगावॅटचा पार्किंग सोलर प्लांटही उभारण्यात आला आहे. या विजेचा वापर पार्कसाठी केला जात आहे; त्यामुळे या पार्कने भारतातील पहिला इको-फ्रेंडली वॉटरपार्क अशी ओळख मिळवली आहे.''

मालपाणी ग्रुपची स्थापना १८९४ मध्ये झाली असून, एफ.एम.सी.जी., शैक्षणिक, सोलर, विंडपॉवर जनरेशन, शेती, ट्रान्स्पोर्ट, हॉस्पिटॅलिटी, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी भरारी घेतली आहे. वेट-एन-जॉयच्याच शेजारी हा ग्रुप लवकरच मॅजिक माउंटन्स अम्युजमेंट पार्क उभारत आहेत. येथील सर्व राइड्स आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असून इटली, जर्मनी आणि अमेरिकेहून मागवण्यात आलेल्या आहेत.

अधिक माहितीसाठी,

९६५७२३४४४/९६८९८८६६६६

वर फोन करा  किंवा www.wetnjoy.in ला भेट द्या.

## ✍ स्वदेशी बनावटीचे अवकाशयान सज्ज

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) प्रथमच स्वदेशी बनावटीचे अवकाशयान तयार केले आहे. हे अवकाशयान लवकरच प्रक्षेपित केले जाणार असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

एखाद्या 'एसयूव्ही' मोटारइतका आकार आणि वजन असलेल्या या 'रियुझेबल लॉंच व्हेइकल- टेक्नॉलॉजी डेमोन्स्ट्रेटर' (आरएलव्ही-टीडी) अवकाशयानाची अंतिम चाचणीही घेण्यात आली असून, श्रीहरीकोटा येथील

अवकाश केंद्रात ते उड्डाणाच्या प्रतीक्षेत आहे. पुनर्वापर करता येण्यासारखे पंख हे या अवकाशयानाचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारची रचना इतर देशांनी करण्याचे टाळले होते. मात्र, खर्च कमी करण्याच्या उद्देशाने भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांनी हे आव्हान पेलत ही रचना शक्य करून दाखविली आहे. हा खर्च प्रतिकिलो दोन हजार डॉलर इतका कमी करता येऊ शकतो.

मॉन्सूनला सुरुवात होण्याआधीच या अवकाशयानाचे उड्डाण करण्यास 'इस्रो' प्रयत्नशील आहे. आंध्र प्रदेशाच्या किनाऱ्यावरून हे प्रक्षेपण होईल. प्रक्षेपण झाल्यानंतर अवकाशयानाला लावलेले काही पंख (डेल्टा विंग्ज) बंगालच्या उपसागरात उतरविता येणार आहेत. या पंखांच्या रचनेमुळे ते तरंगणार नसल्याने परत आणता येणे अवघड आहे. मात्र, या प्रयोगाचा उद्देश पंखांचे तरंगणे नसून ते अवकाशयानापासून परत येणे, हा आहे.

## ✍ 'इंटरसेप्टर'ची यशस्वी चाचणी

भारताने क्षेपणास्त्राचा हल्ला भेदणाऱ्या (इंटरसेप्टर) स्वदेशी बनावटीच्या स्वनातीत क्षेपणास्त्राची ओडिशाच्या किनाऱ्यावर यशस्वीपणे चाचणी घेतली. यामुळे भारतावर हल्ला करणाऱ्या क्षेपणास्त्राचे हवेतच खंडन करता येणे शक्य आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय शास्त्रज्ञांचा बहुउद्देशीय क्षेपणास्त्र संरक्षण यंत्रणा तयार करण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यानुसार या नव्या क्षेपणास्त्राची निर्मिती करण्यात आली आहे. अलीकडेच घेतलेल्या चाचणीत क्षेपणास्त्राने नियोजित लक्ष्यांचा यशस्वीपणे भेद केल्याचे संरक्षण संशोधन विकास संस्थेने (डीआरडीओ) सांगितले.

## ✍ समाजाला कवी सावध करतो

'माणसाचे जगणे आणि कविता या गोष्टी वेगवेगळ्या नसतात. आयुष्य जगताना घेतलेल्या अनुभूती, वेदना, जाणीव, कल्पना आणि वास्तव या साऱ्यांतून कवी समाजाला संकटकाळी सावध करण्याचे काम करीत असतो,' असे मत ज्येष्ठ गझलकार रमण रणदिवे यांनी व्यक्त केले.

मैत्री पब्लिकेशनतर्फे कवी अशोक भांबुरे लिखित 'मी चंद्र पाहिलेला' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. दामोदर खडसे, डॉ. नजीर फतेहपुरी, ॲड. प्रमोद आडकर, मोहिनी कारंडे, टीकमसिंह

शेखावत यांच्यासह मराठी, हिंदी, उर्दू साहित्यिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. खडसे म्हणाले, ‘कविता म्हणजे साहित्याचा अर्क असते. विविध भाषांचे अलंकार घेऊन कविता व्यक्त होते. कविता माणसाला संवेदनशील माणूस बनवते. कोणताही समाज आपल्या संपर्कात येणाऱ्या आसपासच्या भाषा स्वीकारूनच प्रगल्भ होत असतो.’

यावेळी भांबुरे यांच्या निवडक रचनांवर ‘या चंद्रांगणी’ ही मैफल झाली. स्वरगंधार कलामंचाचे अध्यक्ष गोपाळ कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संगीतकार सागर गायकवाड, सुदाम कुंभार, अशोक लांडगे, मृणाल घाटे व कवी भांबुरे यांनी गीते सादर केली. प्रमोद चिल्लाळ, सुभाष देशपांडे, प्रतीक काशल्लू यांनी साथसंगत केली. विजय सातपुते यांनी निवेदन केले. मोहिनी कारंडे यांनी प्रास्ताविक केले. स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले. भालचंद्र कोळपकर यांनी आभार मानले. नलिनी दर्शने, सुनंदा पाटील, ऋचा कर्वे आदींनी संयोजन केले.


## ✍ नाट्यगृहे नाटकांसाठीच!

“शहरातील नाट्यगृहे ही यापुढे नाटक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीच राहतील. माझ्या पक्षासह इतर कुठल्याही पक्षाला राजकीय कार्यक्रमांसाठी नाट्यगृहांच्या नियमानुसार आरक्षित झालेल्या सांस्कृतिक संस्थांच्या तारखा काढून घेता येणार नाहीत; तसा नियमच यापुढे राहील,” अशी घोषणा महापौर प्रशांत जगताप यांनी केली. लवकरच नाट्यगृह धोरण ठरवले जाईल, असेही ते म्हणाले.

बालगंधर्व रंगमंदिरात तीन महिने आधी नियमानुसार ठरलेल्या एका सांस्कृतिक संस्थेची तारीख काढून घेऊन ती कन्हैया कुमारच्या सभेसाठी महापौरांनी दिली. याशिवाय, गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या राजकीय नेत्यांनी आपापल्या संस्थांच्या कार्यक्रमांसाठी नाट्यगृहांच्या आधी आरक्षित तारखा आयत्यावेळी काढून टाकायला भाग पाडले. सतत सुरू असलेल्या या प्रकारांमुळे कलाक्षेत्रातून नाराजी व्यक्त झाली आणि प्रलंबित असलेला नाट्यगृह धोरणाचा विषयही समोर आणला गेला.

**२वी आवृत्ती**

# द स्ट्रीट लॉयर




मूळ लेखक - **जॉन ग्रिशमॅ**

अनुवाद - **शीला कारखानीस**

**किंमत : ४००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

एक बेघर माणूस फर्मच्या अलिशान ऑफिसमध्ये घुसून नऊ वकिलांना ओलीस धरतो. ते ओलीस नाट्य संपतं, तेव्हा मायकेलचा चेहरा त्या माणसाच्या रक्ताने थबथबलेला असतो आणि अचानक! मनात विचारसुद्धा येणार नाही, अशी गोष्ट करायला मायकेल तयार होतो. अनेक वर्षांपूर्वी हरवलेल्या त्याच्या सदसद्विवेकबुद्धीचा त्याला परत एकदा शोध लागतो. मायकेल त्याची बलाढ्य फर्म सोडून, त्याचा हल्लेखोर जिथं कधीकाळी राहत होता, त्या रस्त्यांवर जायला तयार होतो. त्या रस्त्यांवर राहणाऱ्या समाजातल्या दुर्बलांना, न्याय मिळवण्यासाठी वकिलाची गरज असते.
पण अजून एक कोडं आहे, जे मायकेल सोडवू शकत नाही. ड्रेक ॲन्ड स्वीनीच्या अथांग गर्तेतून, आता मायकेलच्या हातात पडलेल्या एका गुप्त फाइलमधून एक रहस्य तरंगत वर येऊ पाहतं. एक कटकारस्थान शिजलंय, ज्याने काही लोकांचा बळी घेतलाय. आता मायकेलचे पूर्वीचे भागीदार त्याचे कट्टर शत्रू झाले आहेत. कारण त्यांच्यासाठी मायकेल ब्रॉक हा रस्त्यावरचा सर्वांत धोकादायक माणूस झालेला असतो.

## ✍ साहित्य संमेलन तर होणारच

'मराठी माणूस उत्सवप्रिय आहे. गणेशोत्सव दरवर्षी होतो ना, मग साहित्य संमेलनही होणारच,' अशी रोखठोक भूमिका अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे नूतन अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी मांडली. 'संमेलने राजकारण्यांच्या दावणीला, असे जे स्वरूप प्राप्त झाले आहे, ते यापुढील काळात खोडून काढू. जे संमेलन होईल ते भाषेच्या व साहित्याच्या मूळ उद्दिष्टांकडे जाणारेच असेल,' असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय पुढील तीन वर्षांसाठी विदर्भ साहित्य संघाकडे गेले आहे. 'खर्चिक संमेलन नको, तसेच वर्षाआड संमेलन व्हावे,' अशी भूमिका विदर्भ साहित्य संघाकडून मांडली जात होती. 'दरवर्षी संमेलन झालेच पाहिजे' अशी तरतूद घटनेत कुठेही नाही, याकडे संघाचे पदाधिकारी लक्ष वेधत होते. तेच पदाधिकारी आता महामंडळाचे पदाधिकारी झाल्यानंतर मात्र संमेलनासाठी प्रक्रिया राबवायला सज्ज झाले आहेत. नव्वदाव्या साहित्य संमेलनासाठी तीन निमंत्रणे आली आहेत. महामंडळाने निमंत्रणे पाठवण्यासाठी मुदत जाहीर केली आहे.

'महामंडळाचे कार्यालय साहित्य परिषदेकडे असताना झालेल्या संमेलनाने बडेजावाचे टोक गाठले होते. संमेलने राजकारण्यांच्या दावणीला बांधली गेली आहेत; पण यापुढे संमेलने राजकारण्यांच्या दावणीला बांधली जाणार नाहीत. संमेलन आयोजनाच्या कल्पनेने ग्रामीण भागातील लोक भयभीत होत असून, त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्यात येईल. यापुढे होणारी संमेलने देखणी करण्यापेक्षा नेमकी आणि नेटकी असावीत, असा टोला त्यांनी लागावला.

नव्वदाव्या साहित्य संमेलनासाठी तीन निमंत्रणे आली असून, निमंत्रणे पाठवण्यासाठी महामंडळाने १७ जुलैपर्यंतची मुदत जाहीर केली आहे. महामंडळाचे कार्यालय महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे असताना कल्याणचे निमंत्रण आले होते. महामंडळ विदर्भ साहित्य संघाकडे गेल्यानंतर आणखी दोन ठिकाणांहून निमंत्रणे आली आहेत. 'कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयासह परिषदेची सातारा येथील शाखा आणि डोंबिवलीतील आगरी यूथ फोरम या संस्थांकडून महामंडळाला निमंत्रण प्राप्त झाले आहे,' अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी दिली.

## ✍ महामंडळाकडे खर्चाला पैसे नाहीत

केवळ २५ हजार रुपयांमध्ये वर्षभर मराठी भाषा आणि साहित्याचा प्रचार-प्रसार व संवर्धन कसे करायचे, असा प्रश्न अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे नवे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना पडला आहे. त्यांनी पाहिलेल्या मराठमोळ्या स्वप्नांना आता अपुऱ्या निधीचा अडसर ठरू लागला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाला सरकारतर्फे पाच लाख रुपयांचे वार्षिक अनुदान मिळते. यातील साडेतीन लाख रुपये वर्षभरातील बैठका आणि त्यानिमित्ताने होणाऱ्या दौऱ्यांवर खर्च होतात. जवळपास सव्वालाख रुपये आस्थापनेवर खर्च होतात. मराठी भाषा आणि साहित्यविषयक उपक्रमांसाठी यातून केवळ २५ हजार रुपये शिल्लक राहतात. अशा परिस्थितीत महामंडळाला साहित्य संमेलनाच्या 'रंजक' दुनियेतून बाहेर काढून भाषिक व साहित्यिक चळवळीत सक्रिय करण्याचे नव्या अध्यक्षांचे स्वप्न कसे पूर्ण होणार?

डॉ. श्रीपाद जोशी यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली तेव्हा घटनेनुसार संमेलनाच्या व्यतिरिक्त साहित्यिक व भाषिक उपक्रम राबविणे हेच महामंडळाचे मूळ उद्दिष्ट असायला हवे, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, तसे करण्यासाठी अतिरिक्त अनुदानाची आवश्यकता आहे.

विदर्भ साहित्य संघाकडे कारभार आला. पहिल्या दिवशी नव्या कार्यकारिणीच्या बैठकीत डॉ. जोशी यांनी या विषयावर इतर सदस्यांसोबत चर्चाही केली. पुढील बैठक जुलैमध्ये होणार असून, त्यात संमेलनस्थळ, निवड समिती, संमेलनाचे यजमानपद आदी बाबी कार्यक्रमपत्रिकेवर असतील; पण घटनेतील उद्देशांवर काम करण्याचा अध्यक्षांचा निर्धार आता आर्थिक विवंचनेपुढे ढळत चालला आहे.

यापूर्वीही महामंडळाला एवढेच अनुदान मिळायचे. मात्र, 'साहित्य संमेलन' या एका उपक्रमात इतर सर्व मुद्दे गौण ठरत गेले. परिणामी, तीन दिवसांच्या संमेलनातच वर्षभराचे 'टार्गेट' पूर्ण करण्याचा प्रयत्न झाला. दुर्दैवाने नव्या पिढीमध्ये मराठीची जाणीव निर्माण करणे आणि मराठीच्या जोरावर पोट भरणाऱ्यांना सामावून घेण्याचे कामच झाले नाही. नव्या अध्यक्षांनी हे स्वप्न रंगवले असले, तरीही 'पैशाचे सोंग' सोपे नाही, हे मात्र

खरे!

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष कवी आणि समीक्षक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर कार्यवाह म्हणून डॉ. इंद्रजित ओरके आणि कोषाध्यक्ष म्हणून डॉ. विलास देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली. पुण्यातील महामंडळाचा कार्यकाळ ३१ मार्चला संपल्यावर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय नागपुरात विदर्भ साहित्य संघाच्या संकुलात आल्याची अधिकृत घोषणा महामंडळाचे माजी कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी केली. महामंडळाच्या पहिल्या बैठकीत डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे नाव अध्यक्षपदासाठी मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी सुचविले आणि त्याला चंद्रशेखर गोखले यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्ष म्हणून भोपाळचे सुधाकर भाले, तर कार्यवाह म्हणून डॉ. इंद्रजित ओरके आणि कोषाध्यक्षपदी डॉ. विलास देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणाले, ''महामंडळाचा अध्यक्ष म्हणून अनेक आव्हाने असली तरी येत्या तीन वर्षात सर्वांच्या सहकार्याने ती सकारात्मक, सौहार्द आणि सुसंवादातून पूर्ण करता येतील. या बैठकीला मराठी साहित्य परिषदेचे प्रा. मिलिंद जोशी, कौतिकराव ठाले पाटील, आसाराम लोमटे, चंद्रशेखर गोखले, भालचंद्र शिंदे, विद्या देवधर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ✍ 'नीट' परीक्षेबाबत कुठल्याही नवीन याचिकेवर विचार नाही

राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा म्हणजे 'नीट'च्या विरोधात कुठल्याही नवीन याचिकेवर विचार करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे; त्यामुळे विद्यार्थ्यांची चांगलीच अडचण होणार आहे. एमबीबीएस व बीडीएस प्रवेशासाठी आता 'नीट' ही परीक्षा ग्राह्य धरली जाणार आहे. परीक्षा ठरल्याप्रमाणे होऊ द्या, असे सांगून न्यायालयाने म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या वकिलांनी अर्ज सादर करावा. न्यायालयाने आतापर्यंत याबाबत जे आदेश दिले आहेत, त्यानुसार सरकारी वैद्यकीय महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालये ही आता 'नीट'च्या

अखत्यारित येतील. ज्या परीक्षा आधी झाल्या आहेत किंवा होणार आहेत त्या रद्दबातल समजण्यात येतील. २१ डिसेंबर २०१० रोजी सरकारने एकच सामायिक प्रवेश परीक्षा घेण्याचा जो आदेश काढला होता तो न्यायालयाने पुनरुज्जीवित केला असून त्यासाठी 'नीट' ग्राह्य धरली जाईल, असे म्हटले होते. याबाबत कुठल्याही उच्च न्यायालयात अर्ज करता येणार नाही व उच्च न्यायालयांचा हस्तक्षेप चालवून घेतला जाणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

एमबीबीएस व बीडीएससाठी सामायिक प्रवेश परीक्षा रद्द करण्याचा तत्कालीन सरन्यायाधीश अल्तमश कबीर यांनी दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयाने मागे घेतला होता. त्यानंतर संकल्प चॅरिटेबल ट्रस्टने २८ एप्रिलला याचिका दाखल केली होती; त्यात, केंद्र सरकार, वैद्यक परिषद आणि सीबीएसइ हे न्यायालयाने 'नीट'च्या अंमलबजावणीबाबत दिलेल्या आदेशांचे योग्य प्रकारे पालन करीत नाहीत, असे म्हटले आहे.

## ✍ 'शब्दफुले', 'काव्यसुगंध'चे प्रकाशन

'कमीतकमी शब्दांत कवी मोठा आशय कवितेतून व्यक्त करतो; त्यामुळे कविता दीर्घ काळ स्मरणात राहते,' असे मत ज्योती पानसे यांनी व्यक्त केले.

श्रद्धा प्रकाशनतर्फे कवयित्री उषा जोशी यांच्या 'शब्दफुले' व 'काव्यसुगंध' या कवितासंग्रहांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. कवयित्री चित्रा कुलकर्णी यावेळी उपस्थित होत्या.

'कवितेतील विषयांचे वैविध्य, कवी कल्पना आणि परिणामकारकता यामुळे कविता प्रशंसनीय ठरतात. मनात येते तेव्हा कविता साकारते. कविता ठरवून लिहिली जात नाही,' असे कुलकर्णी यांनी सांगितले.

डॉ. अरविंद नेरकर म्हणाले, ''गद्यलेखनापेक्षा कविता लिहिणे अवघड असते. शब्दांची योग्य मांडणी करून कवितालेखन होते.'' प्रकाशिका चारुशीला बेलसरे यांनी स्वागत केले. काव्यसुगंध कवितासंग्रहातील सहभागी २२ कवींचा सत्कार करण्यात आला. उत्तरार्धात बेलसरे यांचा 'अक्षयगान' हा कार्यक्रम रंगला. यावेळी 'चांदणे शिंपीत जाशी', 'लटपट लटपट तुझं चालणं', 'नाच गं घुमा', 'केव्हातरी पहाटे', 'दिल है छोटासा',

'रसिक बलमा' अशा गीतांनी रसिकांना श्रवणानंद दिला. डॉ. अरविंद नेरकर यांनी निवेदन केले.

## ✍ १० हजार 'सोशल मीडिया मॉम्स'

आपला मुलगा सोशल मीडियावर नेमके काय करतो, हे पाहण्यासाठी अनेक आयांनी आपले अकाउंट उघडले; पण त्याही पलीकडे अनेकजणींनी आईपण निभावताना येणारे अनुभव, अडचणी, उपाय शेअर करण्यासाठीही या डिजिटल माध्यमाचा आधार घेतला आहे. लहानग्यांसाठीचे खाद्यपदार्थ, पालकत्वाच्या टिप्स यांसारख्या अनेक विषयांवर त्या सोशल मीडियावर मन मोकळे करीत आहेत. कंटेट क्रिएटर म्हणून होणाऱ्या देवाण-घेवाणीतून त्या आपले आईपण अधिक समृद्ध करत आहेत. काहींनी आपले ब्लॉग सुरू करत हजारो महिलांना त्यावर कनेक्ट केले आहे, तर काहींनी थेट यू-ट्युब चॅनल सुरू करत त्यांचे प्रश्न पुढे आणले आहेत.

लाइफ स्टाइल विषयावर ब्लॉग लिहिणाऱ्या अंकिता धवन वर्किंग मॉम्सशी संबंधित विविध विषयांवर प्रकाश टाकतात. मुलांना सांभाळताना येणारे अनुभव, आरोग्यदायी आहार, पेहराव आदी विविध बाबींविषयी त्या नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या आयांना मार्गदर्शन करतात. ''मला स्वत:ला लिहायला आवडत असल्याने मी ती तारेवरची कसरत करायला तयार असते. ब्लॉगिंगमुळे शक्यतांचे नवे जग माझ्यापुढे उघडले आहे,'' अशी भावना त्या व्यक्त करतात.

आपल्याप्रमाणेच इतर मॉम्सना एकत्र करण्याचे ध्येय समोर ठेवत रितू गोराई यांनी व्हॉट्स-ॲपवर १० हजारजणींना एकत्र आणले. आई झाल्यावर स्त्रिया मुलांमध्ये गुंततात; पण त्यांना नव्या मैत्रिणी मिळाव्यात, अशा मॉम्समध्ये शेअरिंग व्हावे, यासाठी 'जॅम्स'ची (जर्नी अबाउट मस्त मॉम्स) या नेटवर्कची स्थापना केली.

यावरून पालकत्व, आरोग्यदायी आहार, पर्यटन, मुलांवर संस्कार आदी विविध विषयांशी संबंधित अनुभव, विचार, टिप्स यांची देवाण-घेवाण होते, याचा सगळ्यांनाच फायदा होतो, असे रितू गोराई म्हणाल्या.

## ✍ दुसरे अंधश्रद्धा निर्मूलन साहित्य संमेलन

पुराणकाळात गणपतीला सोंड लावणे शक्य झाले, कारण तेव्हा ‘प्लॅस्टिक सर्जरी’ होती, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी बिनदिक्कतपणे सांगतात, महाभारतातील पुष्पक विमानाचा दाखला देत तंत्रज्ञानातील प्रगती पुरातन असल्याचेही सांगितले जाते. गणपती दूध पितो, असेही काही वर्षांपूर्वी भासविले गेले. एकूणच देशात अविवेकी स्थिती निर्माण झाली आहे. अशी स्थिती यापूर्वी कधीच नव्हती. त्याची चिरफाड करण्याचे सोडून माध्यमांकडून याचे उदात्तीकरण होणे घातक आहे, असे परखड मत ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ यांनी मांडले.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वार्तापत्राच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनानिमित्त आयोजित दुसऱ्या अंधश्रद्धा निर्मूलन साहित्य संमेलनाची सांगता साईनाथ यांच्या उपस्थितीत झाली. ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील अध्यक्षस्थानी होते.

साईनाथ म्हणाले, ‘‘डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे आणि डॉ. कलबुर्गी या तीन मान्यवरांचा खून झाला. माध्यमांनी त्याच्या मूळापर्यंत जायला हवे. इथे शोधपत्रकारिता दिसायला हवी होती. कार्पोरेट जगताच्या प्रभावाने विवेकवादाची अपेक्षा फोल ठरते. सत्ता चालवणारी मंडळी अविवेकाचा प्रचार करताहेत, अंधश्रद्धा पसरवत आहेत; ती खोडून काढण्याची जबाबदारी माध्यमांनीच घ्यायला हवी. एकीकडे भूकबळी जात असताना आम्ही गणपती दूध पितो, याच्या बातम्यांना किती प्राधान्य द्यायचे? इथेच थांबलो नाही तर कुणाचा गणपती जास्त दूध पितो, अशी स्पर्धा चालवली. इंडियन प्रिमिअर लीग क्रिकेटसाठी पाण्याची प्रचंड नासाडी होत असताना त्याविरुद्ध माध्यमे बोलत नाहीत. तो विषय बाजूला राहतो आणि उसाला पाणी देऊन नासाडी करत नाही का, हा मुद्दा चर्चेला येतो.’’

डॉ. पाटील म्हणाले, ‘‘अंधश्रद्धेला प्रतिकूल असे राज्यकर्ते सत्तेवर आले आहेत. अविवेकी, असहिष्णू वातावरणात विवेकाचा पायबंद घालणाऱ्या शक्ती आपण उभारल्या पाहिजेत.’’ संमेलनाध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. सुनीलकुमार लवटे, स्वागताध्यक्ष ॲड. के. डी. शिंदे, अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील, मुक्ता दाभोलकर आदी उपस्थित होते.

## ✍ आरती प्रभू यांच्या अप्रकाशित कवितांचा संग्रह

‘गेले द्यायचे राहून’, ‘ती येते आणिक जाते’, ‘ये रे घना ये रे घना’, ‘समईच्या शुभ्र कळ्या’ अशी अवीट गोडीची गीते लिहिणारे कवी चिं. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांच्या अप्रकाशित कविता आता लवकरच उपलब्ध होणार आहेत.

चिं. त्र्यं. खानोलकर यांनी लिहिलेली ‘कुढत का राहायचं?’ ही पहिली कविता १९५३ मध्ये ‘वैनतेय’मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर त्यांनी ‘एक मुद्रा’, ‘एक जुनाट जांभुळ’, ‘उभी ही कोण?’ ‘पंगारा’ अशा अनेक कविता लिहून वाचकांवर गारूड केले; त्या काळात ‘सत्यकथा’ मासिकाचा साहित्य वर्तुळात मोठा दबदबा होता. ‘सत्यकथा’मध्ये लेखन प्रसिद्ध होणे ही प्रतिष्ठेची बाब होती.

खानोलकर यांनी ‘वैनतेय’मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘उभी ही कोण?’ आणि ‘व्यर्थ मनोरथ’ या कविता ‘सत्यकथा’कडे पाठवल्या. ‘सत्यकथा’चे तेव्हाचे संपादक श्री. पु. भागवत यांना पत्रही लिहिले; परंतु कविता छापून आल्या नाहीत आणि भागवत यांच्याकडून काही उत्तरही आले नाही. त्याच मन:स्थितीत त्यांनी ‘शून्य शृंगारते आता होत हळदिवे’ आणि ‘मिळालेले मला खूळ’ या दोन कविता लिहिल्या. यातील ‘शून्य शृंगारते’ ही कविता जानेवारी १९५४ मध्ये ‘सत्यकथा’मध्ये ‘आरती प्रभू’ या नावाने प्रकाशित झाली. या काळात त्यांनी अनेक कविता लिहिल्या. त्या सगळ्याच तेव्हा प्रकाशित झाल्या नाहीत. गेली अनेक वर्षे अप्रकाशित राहिलेला हा काव्यठेवा आता प्रकाशित होत आहे.

## ✍ कवितेत मानवी संस्कृतीची प्रामाणिकता असावी

कविता ही काही ठरवून होत नसते. जगण्यातील दु:ख, विरह आणि जगण्यातील अनुभवांतून जशी कविता सुचते तशीच ती हळुवार आणि उत्कट प्रेमातूनही सुचते. मात्र, त्या कवितेमध्ये मानवी संस्कृतीची प्रामाणिकता असावी, अशी अपेक्षा साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केली.

उचित माध्यम प्रकाशित हरीश तारू यांच्या ‘बिनवासाचा चाफा’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन सबनीस यांच्या हस्ते झाले.

प्रकाशक रेश्मा जीवराज आणि हनुमंत जगनगडा यावेळी उपस्थित होते.

**५वी आवृत्ती**

# मराठी व्याकरण परिचय




लेखक

**डॉ. राजशेखर हिरेमठ**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

व्याकरण हा भाषेचा मूलभूत घटक आहे; भाषारचनेचा तो पाया आहे; त्यामुळे मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे व त्यांची शास्त्रीय मीमांसा ही अभ्यासकाला अत्यावश्यक असतात. त्यासाठी आज विद्यार्थ्यांना या विषयावरची शास्त्रीय स्वरूपाची अनेक पुस्तके वाचावी लागतात आणि त्यांतील मीमांसा त्यांना क्लिष्ट व किचकट वाटते.

या विद्यार्थिवर्गाच्या अडचणी ध्यानात घेऊन या पुस्तकात मराठीतील प्रमुख व सर्वमान्य व्याकरणकारांच्या महत्त्वाच्या मतांची मुद्देसूद व विस्तारपूर्वक चर्चा केली आहे. ज्या ज्या संदर्भात शंका उपस्थित झाल्या, तिथे तिथे त्या नोंदवल्या आहेत. आवश्यक तिथे स्वतंत्र मतेही मांडलेली आहेत.

या पुस्तकात ‘स्वनिम विचार’, ‘पदिमविचार’ आणि ‘वाक्यविन्यास’ या तीन नव्या प्रकरणांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

मराठी व्याकरणातील महत्त्वाच्या व वादग्रस्त विचारांचे विस्तृत व सुगम असे विवेचन केलेले असल्याने विद्यार्थ्यांना ते निश्चितच उद्‌बोधक व मार्गदर्शक ठरेल, असा आम्हांला विश्वास वाटतो.

उत्तरार्धात हरीश तारू आणि अभिजित थिटे यांनी कविता सादर केल्या.

सबनीस म्हणाले, केवळ प्रेमालाच नव्हे तर विरहालाही गंध असतो. प्रेम ही केवळ नैसर्गिक भावना नाही, तर प्रेम हे मूल्य आहे. जीवनामध्ये आलेले अनुभव, बसलेले चटके, जातिभेदाच्या भिंतीने केलेले आघात याचे प्रतिबिंब या कवितासंग्रहामध्ये आहे.

एका अर्थाने 'सैराट' चित्रपटाची समकालीन काव्यसंहिता म्हणून या संग्रहाकडे बोट दाखवता येईल. जगण्यातील वेदना, प्रेमातून आलेला विरह याबरोबरच समाजातील विविध प्रश्नदेखील कवितेतून मांडले जावेत.

संगीता बर्वे म्हणाल्या, ''परिस्थितीशी झुंजताना अनेकदा काही सुचते; पण प्रत्येकालाच ते शब्दांत अभिव्यक्त करता येत नाही. कवितेमुळे माणसे जोडली जातात. हरीशने केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. त्याच्या कवितांना गजलचा सुगंध आहे. गजल काव्यप्रकाराचा बारकावा समजून घेतला तर तो गजलकार होऊ शकेल. शब्द हेच धन असले तरी तेवढेच धन पुरत नाही; त्यामुळे कवीने वेगवेगळ्या अनुभवांना सामोरे जात शब्दाने आणि संपत्तीने धनवान होण्याची गरज आहे.''

## ✍ गोरेगाव पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलास मृणाल गोरे यांचे नाव

सरकारमध्ये विविध मुद्द्यांवरून शिवसेनेशी भांडणाऱ्या भाजपचे आणि मृणाल गोरे यांच्याशी राजकीय संघर्ष झडलेल्या शिवसेनेचे मृणालताईंच्या कार्यकर्तृत्वाबाबत मात्र एकमत झाले. 'मृणालताईंशी वैचारिक वाद असू शकतात. मात्र, त्यांचा प्रामाणिकपणा आणि संघर्षवृत्ती याला आमचा सलाम आहे', अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मृणालताईंना अभिवादन केले.

गोरेगाव पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलास ज्येष्ठ समाजवादी नेत्या दिवंगत मृणाल गोरे यांचे नाव देण्याचा समारंभ उद्धव ठाकरे यांच्या हस्ते गोरेगावात झाला. या कार्यक्रमास उद्योगमंत्री सुभाष देसाई, पालिका आयुक्त अजय मेहता, गृहनिर्माण राज्यमंत्री रवींद्र वायकर, विद्या ठाकूर, आमदार सुनील प्रभू व मृणालताईंच्या कन्या अंजली वर्तक उपस्थित होत्या.

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, ''शिवसेनेने मृणालताईंचे नाव

उड्डाणपुलाला देण्याचा प्रस्ताव महापालिकेत आणला, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. मृणालताईंशी वैचारिक वाद असले, तरी त्यांनी विविध सामाजिक, राजकीय प्रश्नांवर केलेला संघर्ष, वंचितांसाठीचा बुलंद आवाज आणि त्यांची लढाऊ वृत्ती यांचे विस्मरण होऊ नये तसेच थोरा-मोठ्यांचा आदर करावा, या भूमिकेतून ताईंचे नाव पुलाला द्यावे, अशी सूचना मी केली.''

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुलाला मृणालताईंचे नाव दिल्याबद्दल पालिकेचे अभिनंदन केले.

## ✍ पाठ्यपुस्तकातून नेहरूंना डच्चू?

'नव्या अभ्यासक्रमानुसार बनविण्यात आलेल्या पाठ्यपुस्तकांमध्ये देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १५ ठिकाणी सन्मानजनक उल्लेख करण्यात आला आहे. जवाहरलाल नेहरू यांचा उल्लेख वगळण्याचा सरकारचा हेतू नव्हता आणि नाही. राज्य सरकार शिक्षणाचे राजकारण करीत नाही,' असे सांगून राजस्थानचे शिक्षणमंत्री वासुदेव देवनानी यांनी काँग्रेसचा आरोप फेटाळून लावला.

'राजस्थान सरकारने आठवीच्या पाठ्यपुस्तकात जवाहरलाल नेहरू यांचा उल्लेख वगळला असून, ही मुख्यमंत्री वसुंधराराजे यांच्या सरकारची बौद्धिक दिवाळखोरी आहे,' असा आरोप काँग्रेसने केला होता; परंतु 'काँग्रेसने सरकारवर आरोप करण्यापूर्वी पाठ्यपुस्तके पडताळून पाहण्याचेही कष्ट घेतले नाहीत. वास्तविक, सातवी (हिंदी), नववी (सामाजिक शास्त्र) आणि अकरावी (जागतिक इतिहास) या पुस्तकांमध्ये जवळपास १५ वेळा नेहरूंचा सन्मानजनक उल्लेख करण्यात आला आहे. नेहरूंची स्वातंत्र्य चळवळीतील भूमिका, पंचायतराज, असहकार आंदोलन आदींचा समावेश नव्या पाठ्यपुस्तकांत करण्यात आला आहे,' असे देवनानी यांनी सांगितले.

'शिक्षणाचे राजकारण करण्याचा राज्य सरकारचा हेतू नव्हता आणि नाही. पहिली ते आठवीपर्यंतचा अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी राज्याच्या शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेकडे (एसआयईआरटी) आणि नववी ते बारावीपर्यंतच्या अभ्यासक्रमाची जबाबदारी माध्यमिक शिक्षण मंडळाकडे आहे,' असेही देवनानी म्हणाले.

## ✍ ‘चाइल्ड पोर्न’चे आव्हान मोठे

मानवी तस्करीबरोबरच लैंगिक पर्यटन (सेक्स टुरिझम) आणि ‘चाइल्ड पोर्नोग्राफी’ ही सर्वांत मोठी आव्हाने असल्याचे मत केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह यांनी व्यक्त केले.

‘साउथ एशिया इनिशिएटिव्ह टू एंड व्हायोलन्स अगेन्स्ट चिल्ड्रन’च्या चौथ्या मंत्रिस्तरावरील बैठकीमध्ये मुलांचे संरक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे; त्यामुळेच मुलांचे पालक, शिक्षक आणि समाजातील सर्व घटकांनी ही जबाबदारी पार पाडावी, असेही त्यांनी सांगितले. मानवी तस्करीची समस्याही सर्वांत मोठी आहे. तंत्रज्ञानाचा वेगाने प्रसार होत असून, जागतिक अर्थव्यवस्थाही वेगळ्या पद्धतीने बदलत आहे. यातूनच सेक्स टुरिझम, चाइल्ड पोर्नोग्राफी यांसह मानवी तस्करीची समस्याही समोर येत आहे. नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल आणि हिंसाचारामुळे हजारो मुलांवर विपरीत परिणाम होत आहे, अशी चिंताही त्यांनी  व्यक्त केली.

## ✍ ‘तनहाई’तून शायरीचा जन्म

‘शायर हा एकटा राहत असतो. त्याच्या ‘तनहाई’मध्ये (एकटेपणात) नव्या शायरीचा जन्म होतो. शायरचे आयुष्य हे चित्रपट निर्मात्यांसारखेच असते,’ असे मत ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक महेश भट यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ उर्दू साहित्यिक कवी डॉ. राहत इंदौरी, महाराष्ट्र उर्दू अकादमीचे अध्यक्ष अब्दुल रौफ खान, डॉ. कलीम कैसर, जोहद कानपुरी, नईम अख्तर, रफीक जाफर, अस्लम तनवीर, मुनव्वर पीरभॉय, मुमताज पीरभॉय आदी उपस्थित होते. उर्दू साहित्यातील योगदानाबद्दल यावेळी इंदौरी यांचा भट यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

महेश भट म्हणाले, ‘डॉ. राहत इंदौरी आणि आपला दोस्ताना जुना आहे. इंदौरी आणि कैफी आझमी यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सारखेपणा आहे. माझ्या आयुष्यात पहिला उर्दू शब्द माझ्या कानावर पडला तो माझ्या आईचे नाव शिरीन. उर्दू भाषेपासून मी दूर राहू इच्छित नाही. जेथे सर्व शायर एकत्र येतात, तेथे जीवनाच्या विविध पैलूंना समजण्याची मोठी संधी निर्माण होते.’

डॉ. राहत इंदौरी म्हणाले, ‘‘देशातील विद्येचे माहेरघर समजल्या

**३री आवृत्ती**

# मोरावळा

लेखक - **शिवाजी सावंत**

**किंमत : ११०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




हा आहे 'शब्द- मोरावळा'.
लेखक मनोगतात म्हणतो :
शरीरस्वास्थ्याच्या शास्त्राप्रमाणं साधा आवळा अति गुणकर असतो, हे सिद्ध झालंय. हा तर आहे साखरेच्या मधुर पाकात अंगभर मुरलेला मोरावळा.
गुणकर, तसाच तुरटपणा टाकून चविष्ट झालेला.
त्यातही हा शब्दमोरावळा, साहित्यिकमोरावळा आहे. मानवी मनाचा सारा अहंपणा, मत्सर, द्वेष अशा षड्रिपूंचा बेचव तुरटपणा टाकून ललितरम्य भाषेत सादर केलेला.
श्री. शिवाजी सावंत यांच्या सशक्त भाषाशैलीत हा 'शब्दमोरावळा' साकारला आहे, त्यांच्या खास कोल्हापुरी बाजात  नि ढंगात.
इथं सावंतांच्या जीवनयात्रेत भेटलेली राजकारण, शिक्षण, प्रकाशन व साहित्य अशा विविध क्षेत्रांतील बलदंडांची आखीव रेखांकने आहेत.
त्यांत एक-दोन खास ग्रामीण अफलातूनही भेटतात.
मोरावळ्याचा पहिलाच तुकडा जिभेवर ठेवताच खरा रसज्ञ मिटकी मारत नकळतच म्हणतो, 'व्वा!' तसंच काही हा 'शब्दमोरावळा' चाखताना रसिक वाचकाला
वाटलं, तर आश्चर्य वाटायला नको!!

जाणाऱ्या पुण्यात आपला गौरव होतो याचा आपल्याला अतिशय आनंद आहे. या शहरात उर्दूचे चाहते, जाणकार आहेत. महेश भट यांच्या चित्रपटापासून मी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. भट यांच्यामुळेच चित्रपटसृष्टीशी माझ्या जवळचा संबंध आला.'' डॉ. मेहताब अस्ल यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले.

'इंग्रजी ही ज्ञानभाषा, व्यवहाराची भाषा म्हणून जगभर वापरली जाते; परंतु कित्येक शतके ज्या भाषेने जगावर राज्य केले, त्या उर्दू भाषेकडे सध्या इंग्रजीमुळे दुर्लक्ष होत आहे; त्यामुळे या भाषेची पीछेहाट होत चालली आहे,' अशी खंत ज्येष्ठ उर्दू कवी डॉ. राहत इंदौरी यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले, 'उर्दू भाषेत मुशायरा या प्रकाराला विशेष महत्त्व आहे. त्या ठिकाणी शेरो-शायरीवर चर्चा होते. विचारांचे आदानप्रदान केले जाते. ज्यांना उर्दू, हिंदी येत नाही त्यांना या भाषेतील साहित्य समजण्यासाठी मुशायरा हा चांगला मार्ग आहे; त्यामुळे उर्दू भाषेसमोर सध्या कोणतेही आव्हान नाही.'

डॉ. राहत इंदौरी म्हणाले, 'गुजराथी, तामिळ या दक्षिणेतील राज्यांमधूनच खऱ्या अर्थाने देशभर उर्दू भाषेचा प्रसार झाला. मराठी आणि फार्सी भाषेत उर्दू शब्दांचा प्रचंड वापर होतो. उर्दू भाषेच्या विकासासाठी सरकारकडून अपेक्षा करणे योग्य नाही. मराठी साहित्य संमेलनाप्रमाणे देशात अनेक ठिकाणी छोट्या-मोठ्या प्रमाणात उर्दू साहित्य संमेलने आयोजित केली जातात. अलिगड, लखनौ, भोपाळ या ठिकाणी मुशायरे होतात. जर्मनी, ऑस्ट्रेलिया या देशांमध्येही उर्दूचे मुशायरे होतात. त्या ठिकाणी या भाषेच्या साहित्याला महत्त्व आहे.'

## ✍ तिज्जनबाई यांनी जागवल्या आठवणी

छत्तीसगडमधील 'पंडवानी' म्हणजे महाभारतातील पांडवांच्या कथा साभिनय लोकांपुढे सादर करण्याची एक लोककला. गेली ५० वर्षे तिज्जनबाई ही कला सादर करत आहेत. तिचा प्रसार आणि प्रचार देश-परदेशांत करत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'भारतीय लोककला अभ्यास, संशोधन व कल्याण केंद्राच्या उद्‌घाटनानिमित्ताने त्या पुण्यात आल्या होत्या.

''आई मला अक्षरशः शिव्या घालायची... मारमार मारायची! इतकं की,

तिला आवरायला जाणाऱ्यांनासुद्धा तिचा मार पडायचा. कधीकधी जेवायलाही द्यायची नाही. एके दिवशी तर अशाच फणकाऱ्यात तिने मला घरातून हाकलून दिलं. तिला मी 'पंडवानी' सादर करणं पसंतच नव्हतं... पण मीही चंग बांधला होता तो कलेच्या साधनेचा! खरं सांगू का, मी जेवढा मार खायची ना, तेवढीच माझी ज्ञानपिपासा आणि ताकद वाढत जायची आणि मी अधिक जोमाने कलेला वाहून घ्यायची. तसा 'पण'च मी केला होता जणू...'' उभं आयुष्य 'पंडवानी' या लोककलेसाठी वाहिलेल्या कलाकार तिज्जनबाई आपल्या आठवणी सांगत होत्या.

तिज्जनबाई म्हणाल्या, ''तेरा वर्षांची असताना गावकुसाबाहेर एक झोपडी बांधून मी एकटीच राहू लागले; पण कलेसाठी हा त्रास कधीही वाटला नाही. हाती तंबोरा घेतला की, माझ्या अंगात काय संचारतं ठाऊक नाही; पण मी आपोआप मंचावर सादरीकरण करू लागते.'' माझ्यासारखी कलाकार सरकारच्या मदतीशिवाय पुढे येऊच शकली नाही. मात्र, आज अभिरुचीची साधनं बदलली आहेत. अशात लोकांमध्ये लोककलेप्रती असणारी रुची टिकून राहणं महत्त्वाचं आहे, असंही त्या म्हणाल्या.

तिज्जनबाई सांगतात, ''पंडवानी कला माझ्याआधी कधीही महिलांनी मंचावर सादर केली नव्हती. ती पुरुषांचीच मक्तेदारी होती. मला मात्र त्यात काहीतरी करायचं होतं. म्हणून मी ही बंडखोरी केली; पण हे सारं वाटतं तेवढं सोपं कधीच नव्हतं माझ्यासाठी. लहानपणी माझ्या गुरूंनी हातात तंबोरा देत म्हटलं होतं, 'या कलेची लाज राख.' आणि मीही त्याच दिवशी ठरवलं की, भले काहीही होऊ देत; पण मी सारं आयुष्य कलेसाठीच खर्च करेन. या कलेच्या सोबतीने मला भगवान कृष्णाच्या स्मृतींत अंतर्बाह्य सामावून गेल्याची अनुभूती व्हायची. जिकडे पाहावं, तिकडे फक्त कृष्णच... मग घराचं काय त्यापुढे?''

## ✍ दुर्मीळ मराठी पुस्तके प्रिंट ऑन डिमांडवर

पुस्तकांच्या हजारो प्रतींच्या आवृत्ती काढण्याचा पायंडा मागे पडून आता जगभर वाचकांच्या 'मागणीनुसार छपाई' अर्थात 'प्रिंट ऑन डिमांड' या तंत्राने पुस्तके प्रकाशित केली जात आहेत. परंतु, याही पुढे जाऊन 'प्रिंट ऑन डिमांड' संकल्पना वापरून दुर्मीळ किंवा 'आउट ऑफ स्टॉक' मराठी पुस्तके

वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ‘पुस्तकसागर’ने पुढाकार घेतला आहे; त्यामुळे, लवकरच वाचकांना हवी असलेली दुर्मीळ पुस्तके वाचायला मिळणार आहेत.

मराठीमध्ये गेल्या पावणेदोनशे वर्षांच्या काळात अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. यातील बहुतांश पुस्तके सध्या दुर्मीळ झाली असून, वाचकांना ती वाचण्यासाठी सहजासहजी उपलब्ध होत नाहीत; त्यामुळे अशा पुस्तकांची छपाई पुन्हा करावी यासाठी वाचकांकडून सतत मागणी होत असते. मराठीत पुस्तकांची एक आवृत्ती संपण्यासाठी वर्षानुवर्षे वाट पाहावी लागत असल्याने प्रकाशक या दुर्मीळ पुस्तकांची नवी आवृत्ती काढण्याचा धोका पत्करत नाहीत; त्यामुळे ‘पुस्तकसागर’ प्रकाशनाने अशा दुर्मीळ पुस्तकांना वाचकांच्या मागणीनुसार त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी ‘मागणीनुसार छपाई’ या प्रकाशन तंत्राचा अवलंब केला आहे.

या उपक्रमात वाचकाला हवे असणारे पुस्तक ‘पुस्तकसागर’ला कळवल्यास आठ दिवसांत घरपोच मिळणार आहे. सध्या ‘पुस्तकसागर’ने ५०-६० नव्या - जुन्या मराठी पुस्तकांच्या छपाईचे काम सुरूही केले आहे. यात ‘भाऊसाहेबांची बखर’, साने गुरुजी यांनी लिहिलेले ‘बापूजींच्या गोड गोष्टी’चे सात भाग, चिपळूणकरांची ‘निबंधमाला’, नारायण बांदेकर यांचे ‘टिळक गेले त्या वेळची गोष्ट’ आदी पुस्तकांचा समावेश आहे. तसेच आगामी काळात सुमारे पाच हजार नवी-जुनी पुस्तके वाचकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाची छपाई व बांधणी असणाऱ्या या पुस्तकांच्या किमती ऑफसेट पुस्तकांच्या किंमतीइतक्याच राहणार असल्याचे ‘पुस्तकसागर’चे पराग पाटील यांनी सांगितले.

महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर म्हणजे १ मेपासून सुरू झालेल्या या उपक्रमात दुर्मीळ व सध्या बाजारात उपलब्ध नसलेली पुस्तके डिजिटल तंत्राने प्रकाशित करून वाचकांना उपलब्ध करून दिली जाणार आहेत. एरवी पुस्तके ऑफसेट तंत्राने छापली जातात. त्यात मोजक्या प्रतींच्या प्रकाशनासाठी तुलनेने अधिक खर्च येतो; त्यामुळे शंभरपेक्षा कमी प्रतींची आवृत्ती काढायची असल्यास खर्च वाढतो. परंतु, नव्या डिजिटल तंत्रामुळे छपाईखर्च कमी झाल्याने वाचकांच्या मागणीनुसार पुस्तकाची एक प्रत काढणेही सहज शक्य झाले आहे.


❖

३री आवृत्ती

# पासंग

लेखक -**दया पवार**

**किंमत : १७०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




‘पासंगालाही काही पुरत नाही’ या अर्थाची म्हण मराठीत आहे. ‘क्षुल्लक’ या अर्थाने ती वापरली जाते. तराजूच्या दांड्याला, दोन तागडी समतोल राहावीत म्हणून जे छोटे वजन लावले जाते, ते म्हणजे ‘पासंग’.

आंबेडकरी चळवळीत कळू लागल्यापासून ऐकत आलो आहे की, दलितांचे राजकारण हे पासंगाचे राजकारण आहे. याचा अर्थच असा की, समाज समतोल ठेवायचा असेल, तर दलितांनी पासंगासारखे राहावयास हवे. समाजाचे एकारलेपण दलितांमुळेच समतोल होऊ शकते, हा बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय विचार होता.

‘पासंग’मध्ये जातिधर्मनिरपेक्ष अशा अनेक घटना आणि व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. केवळ दलितांचे, त्यांच्या चळवळीचे उदात्तीकरण केलेले नाही तर त्यांच्यावर, त्यांच्या चळवळीवर कठोर आघातही केले आहेत. समाजाच्या सर्व थरांत ज्या घटना किंवा व्यक्ती ‘फूटनोट’ म्हणून आजवर दुर्लक्षित ठेवण्यात आल्या, त्यांचा शोध घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न.



# पुरस्कार

**✻ लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई स्मृती पुरस्कार जाहीर**

श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे माहेर संस्थेच्या ल्युसी कुरियन, कचरा आणि जैवप्रकल्पातून इंधननिर्मितीचे संशोधन करणाऱ्या संशोधक मनीषा दाते आणि ममता फाउंडेशनच्या शिल्पा बुडूख यांना यंदाचा लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रत्येकी २५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि महावस्त्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महिला सबलीकरण, बालकल्याण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांना लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई यांच्या नावाने पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या पुरस्काराचे यंदा दुसरे वर्ष आहे.

**✻ वरुणराज भिडे स्मृती पुरस्कार**

‘आपल्याकडील बहुतांश वर्तमानपत्रे आणि वाहिन्या कुठल्यातरी राजकीय पक्षाशी किंवा उद्योगसमूहाशी निगडित आहेत. यामुळे बऱ्याचदा पत्रकारांच्या अभिव्यक्ती- स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. अशा काळात ‘सोशल मीडिया’च्या माध्यमातून स्वतंत्र बाण्याचे विचारपीठ तयार व्हायला हवे. अशा व्यासपीठावर सरकारलासुद्धा निर्बंध आणता येणार नाहीत. मात्र, अशा व्यासपीठाचे स्वातंत्र्य सर्वांनी मिळून वाढवायला हवे,’ असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले. वाढत्या स्पर्धेमुळे येत्या पाच-दहा वर्षांत वर्तमानपत्रे लुप्त होतील, असेही ते म्हणाले.

‘लोकसत्ता’चे सहसंपादक मधू कांबळे यांना ‘वरुणराज भिडे स्मृती पुरस्कार’ तर ‘सकाळ’चे खास प्रतिनिधी गजेंद्र बडे, ‘महाराष्ट्र वन’च्या प्राची कुलकर्णी आणि ‘दिव्य मराठी’चे श्रीनिवास दासरी यांना चव्हाण यांच्या हस्ते

‘आश्वासक पत्रकार पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. यावेळी पालकमंत्री गिरीश बापट, उपमहापौर मुकारी अलगुडे, माजी आमदार उल्हास पवार, राजकीय विश्लेषक डॉ. सुहास पळशीकर उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले, ‘‘माध्यमांमध्ये प्रचंड स्पर्धा सुरू आहे. वाहिन्याच नव्हे, तर ‘सोशल मीडिया’ही प्रभावी झाला आहे. स्मार्ट फोनमुळे तर क्षणाक्षणाला बातम्या मिळत आहेत; त्यामुळे आजच्या काळात कोणालाही पत्रकार होता येते, अशी स्थिती आहे. ‘ब्रेकिंग न्यूज’ काय आहे हेच सध्या पाहिले जात आहे. संबंधित घटनेची पार्श्वभूमी काय; त्यामुळे नेमके काय होणार आहे हे पाहायला आणि त्याचा विचार करायला कोणाकडे वेळ नाही. पूर्वी एखाद्या घटनेच्या दोन्ही बाजूंचा विचार व्हायचा. आता तसे राहिलेले नाही. ‘आमची ही भूमिका आहे’, असे सांगून बातम्या दाखवल्या जातात, हा आग्रह आहे की दुराग्रह याचाही विचार झाला पाहिजे. अशाने विश्वासार्हता धोक्यात येते.’’

बापट म्हणाले, ‘‘जनतेचा राजकारण्यांवरील विश्वास उडाला आहे; पण त्यांचा पत्रकारांवरील विश्वास उडाला तर ते लोकशाहीला मारक ठरेल.’’

पळशीकर म्हणाले, ‘‘माध्यमांचे राजकारणातले प्रस्थ वाढत आहे. ते केवळ राजकारणात डोकावत नाहीत, तर त्यात शिरू पाहत आहेत, त्यावर स्वार होऊ पाहत आहेत; त्यामुळे माध्यमे आणि राजकारण यांच्यातील लक्ष्मणरेषा नाहीशी होत चालली आहे. याचा विचार झाला पाहिजे.’’ कांबळे म्हणाले, ‘‘सभ्यता, प्रामाणिकपणा, निष्ठा, तटस्थपणा हे गुण पत्रकारात फार कमीजणांकडे बघायला मिळतात. भिडे यांच्याकडे हे सर्व गुण होते.’’

विकास वाळूंजकर यांनी सूत्रसंचालन केले. सूर्यकांत पाठक यांनी आभार मानले.

**✻ विनोद कांबळे यांना सेवागौरव पुरस्कार**

महावितरणमधून नुकतेच निवृत्त झालेले आणि सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेले विनोद कांबळे यांना सेवागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी समीक्षा संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिनगारे उपस्थित होते.

**✻ 'मसाप'चे पुरस्कार**

नाटककार अशी ओळख असूनही कथा, कविता, कादंबरी, अनुवाद, एकांकिका अशा विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन करणारे साहित्यिक प्रेमानंद गज्वी यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, तर वैजनाथ महाजन (सांगली) यांना भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला.

साहित्य परिषदेचा ११० वा वर्धापन दिन २६ मे रोजी संपन्न झाला. यावेळी साहित्यिक अरुण साधू आणि परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते मसाप कार्यकर्ता पुरस्कार राजन लाखे आणि प्रकाशक ह. ल. निपुणगे यांना, तर उत्कृष्ट मसाप शाखेसाठी देण्यात येणारा फिरता करंडक फलटण शाखेला देण्यात आला.

**विशेष ग्रंथकार पुरस्कार :**

चैतन्यमहाराज देगलूरकर (न. र. फाटक पुरस्कार), सुलभा ब्रह्मनाळकर (रामाचार्य अवधानी पुरस्कार), अंजली कुलकर्णी (भा. रा. तांबे पुरस्कार), प्रकाश घोडके (ना. घ. देशपांडे पुरस्कार), डॉ. अनिल लचके (गो. रा. परांजपे पुरस्कार), डॉ. वेदकुमार वेदालंकार (श्रीपाद जोशी पुरस्कार), राजकुमार तांगडे (कमलाकर सारंग पुरस्कार).

**वार्षिक पारितोषिके :**

स्व. मुरलीधर खैरनार - कादंबरी - 'शोध' (ह. ना. आपटे पारितोषिक), विलास केळसकर - कथासंग्रह 'ढोरवाटा' (आनंदीबाई शिर्के पारितोषिक), डॉ. लता मोहरीर - नाट्यविषयक - 'शेक्सपिअर आणि मराठी नाटक' (म. वि. गोखले पारितोषिक), सुधाकर लोंढे - इतिहासविषयक - 'साद नर्मदेची' (रा. ना. नातू पारितोषिक), डॉ. नीला पांढरे - ललितेतर वैचारिक - 'सहजीवनातील प्रकाशवाटा' (सत्यशोधक केशवराव विचारे पारितोषिक), डॉ. गणेश राऊत - ललितेतर वैचारिक - 'भूदान चळवळ' (गणेश सरस्वती ठाकूरदेसाई पारितोषिक), कुमार शिळमकर - ललितेतर वैचारिक - 'नवे जग नवी तगमग' (शि. म. परांजपे पारितोषिक), डॉ. प्रल्हाद लुलेकर - सामाजिक शास्त्रे - 'बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे' (अभिजात पारितोषिक), सुशील धसकटे - कादंबरी - 'जोहार' (शंकर पाटील पारितोषिक), जयप्रकाश प्रधान - प्रवासवर्णन 'ऑफबीट भटकंती - २' (दि. बा. मोकाशी पारितोषिक), हेरंब कुलकर्णी - शिक्षणविषयक - 'आमच्या

**९वी आवृत्ती**

# नागझिरा




लेखक - **व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : ९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘पहाट होई ती दयाळ पक्ष्याच्या भूपाळीने.
क्षितिजाकडे कललेला चांदोबा दिसे. झाडांचे उंच-उंच बुंधे,
पर्णहीन असा त्यांचा विस्तार – यावरचे आभाळ हळूहळू
उजळत जाई. माझ्या निवासापुढे कडीला टांगलेला कंदील
फिकट पिवळा दिसू लागे.
मग झटपट अंथरूण गुंडाळून मी आयुष्यातल्या
या नव्या दिवसाचे सार्थक करण्यासाठी बाहेर पडत
असे....’

भंडारा जिल्ह्यातील ‘नागझिरा’ अभयारण्यात गळ्यात
दुर्बीण,
मनात अमाप उत्साह आणि आस्था;
केवळ या अल्पशा भांडवलावर लेखकाने मुक्काम ठोकला.
काय सापडले या जंगलसफरीत...
त्याचा हा वृत्तांत!

शिक्षणाचे काय?' (ग. ह. पाटील पारितोषिक), गजेंद्र बडे - उत्कृष्टग्रंथ निर्मिती - 'करिअरचा पासवर्ड' (नी. स. गोखले पारितोषिक), डॉ. सुभाष शेकडे - आत्मचरित्र - 'हाणला कोयता झालो मास्तर' (लक्ष्मीबाई टिळक पारितोषिक).

अशोक समेळ - 'मी अश्वत्थामा चिरंजीव' (मृत्युंजय पारितोषिक), डॉ. श्याम अष्टेकर - मानसशास्त्र, समाजशास्त्र, स्त्रीजीवनविषयक - गुड मॉर्निंग नमस्ते (कमल व के. पी. भागवत पारितोषिक), अजय देशपांडे - उत्कृष्ट वाङ्मय मूल्य - 'ग्रेस : वेदना आणि सौंदर्य' (विजया गाडगीळ पारितोषिक), समीक्षा विभागून, डॉ. राजेंद्र सलालकर - 'रंगनाथ पाठारे यांच्या साहित्यातील स्त्री-दर्शन, डॉ. संजय नगरकर - 'महाराष्ट्रातील विस्थापित आणि मराठी कादंबरी' (डॉ. अरविंद वामन कुलकर्णी पारितोषिक), उत्कृष्ट बालवाङ्मय विभागून - सुमन नवलकर - 'वजनदार (गद्य), रमेश तांबे - 'नवलगरी' (पद्य) (वि. वा. बोकील पारितोषिक), चंद्रकला कुलकर्णी सामाजिक आशय - 'गंगे तुझ्या तीराला' (अंबादास माडगूळकर पारितोषिक), लक्षवेधी साहित्य ग्रंथ विभागून - रामदास भटकळ, मृदुला जोशी - 'पॉप्युलर रीतिपुस्तक' (शरद्चंद्र मनोहर भालेराव पारितोषिक), प्रबंधलेखन - डॉ. सुधाकर जाधव - 'सत्यशोधकांचा साहित्यविषयक दृष्टिकोन : एक अभ्यास' (शरद्चंद्र मनोहर भालेराव पारितोषिक), आहार आरोग्य - डॉ. रवी बापट - 'अचूक निदान' (डॉ. पुष्पलता शिरोळे पारितोषिक), साहित्य पत्रिकेतील उत्कृष्ट लेख - डॉ. राजा दीक्षित - म.सा.प. पत्रिका अंक क्र. ३५० (श्रीमती ताईसाहेब कदम पुरस्कार), स्तंभलेखन - बाबू गंजेवार - गुल्लेर (मालिनी शिरोळे पारितोषिक), ललित गद्य विभागून - अप्पासाहेब खोत 'अनवाणी पाय', डॉ. मंदा खांडगे - 'एक झोका' (त्रिंबकराव शिरोळे पारितोषिक), संपादित ग्रंथ - डॉ. मंदा खांडगे, नीलिमा गुंडी, ज्योत्स्ना आफळे - 'स्त्रीसाहित्याचा मागोवा - खंड ४' (श्रीवत्स प्रकाशन पारितोषिक), संपादन क्षेत्रातील लक्षणीय - अनघा भट - 'केल्याने भाषांतर' (प्रभाकर व आशा संत पारितोषिक), (बँकिंग, व्यवस्थापन, अर्थशास्त्र) चंद्रशेखर टिळक - 'मार्केट मेकर्स' (सुभाष हरी गोखले पारितोषिक).

❖

**४थी आवृत्ती**

# प्लेझर बॉक्स




लेखक - **वपु काळे**

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘प्लेझर बॉक्स’च्या निर्मितीत एक गोष्ट कटाक्षाने टाळायचा प्रयत्न केला आहे.

निव्वळ खुषामत करणारी पत्रं किंवा संपूर्ण पत्रातला खुषामत वा बेदम कौतुक करणारा मजकूर प्रकाशित होऊ द्यायचा नाही. ही खुषीपत्रांची पोतडी नाही. हा एक संवाद आहे. आनंदाची देवाणघेवाण आहे. संवादाच्या, गप्पागोष्टींच्या ओघात आपण एकमेकांबद्दल जेवढं चांगलं बोलतो तेवढं स्तुतिपर बोलता येणं अपरिहार्य आहे.

हा पत्रव्यवहार मुळातच आवडनिवड कळण्यासाठीच निर्माण झाला आहे. तरीसुद्धा वाचकांची पत्रं काटछाट करूनच प्रकाशित केली आहेत. वाचकांच्या संकोचून टाकणाऱ्या स्तुतीने त्यांचा भाव कळतो पण संवाद पुढे सरकत नाही.

ज्या पत्रांनी आणखीन बोलायला लावलं त्याच पत्रांना अग्रक्रम मिळणं अपरिहार्य होतं.

# पुस्तक परिचय

# दाह

## हाडामासात रुतणारा ‘दाह’!



कादंबरीकर सुरेश पाटील हे पत्रकारितेत कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात ‘सामना’ दैनिकाद्वारे केली. प्रिंट मीडियाबरोबरच इलेक्ट्रॉनिक मीडियामध्येही ते कार्यरत होते. उपसंपादक, वरिष्ठ सहसंपादक, न्यूज एडिटर आदी पदांवर त्यांनी काम केले आहे. शिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा (एमपीएससी) उत्तीर्ण होऊन ते महाराष्ट्र शासनाच्या सेवेत राजपत्रित अधिकारी म्हणूनही काही वर्षे कार्यरत होते.

‘दाह’बरोबरच त्यांची ‘नक्षल बारी’ (कादंबरी), ‘सायबाचा हनिमून’ (कथासंग्रह), ‘जावयाची मुंडी’ (कथासंग्रह) ही पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसकडून प्रकाशित होत आहेत. शिवाय ‘पाणजंजाळ’ ही कादंबरीही प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

त्यांचे ‘अगं, ये ना!’ हे नाटक मुंबईच्या नाट्यमंदार नाट्य संस्थेने घेतले आहे. सध्या ते चित्र-नाट्य क्षेत्रातही कार्यरत आहेत.




लेखक
## सुरेश पाटील

*मराठी माणसाच्या हातातून मुंबई निसटत असल्याच्या किंबहुना निसटल्याच्या भावनेचा दुखरा स्वर आणि मराठी माणसामाणसांत घडणाऱ्या आंतरक्रियांचा लेखाजोखा म्हणजे सुरेश पाटील यांची 'दाह' ही कादंबरी. या कादंबरीचा आवाका खूप मोठा आहे. एखादं मिनी महाभारत म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. कोणत्याही राजकीय विचारधारेला हात न घालता जे आहे ते प्रामाणिकपणे मांडण्याचं धाडस पाटील यांनी दाखवलं आहे. कादंबरीच्या नावाप्रमाणेच त्यात ठासून भरलेला 'दाह' पदोपदी प्रचंड अस्वस्थ करतो. बाहेरच्या लोकांना मुंबई आपली वाटते, मग मराठी माणसाला तसं का वाटत नाही? आपल्याच मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात राहून मराठी माणसाला मरणासाठी आपलं गाव का हवं असतं? लेखकानं कथेच्या ओघात उभे केलेले असे प्रश्न प्रचंड अंतर्मुख करतात. या कादंबरीत काय नाही? प्रेम, वात्सल्य, ईर्षा, स्पर्धा, संघर्ष अशा अनेक कंगोऱ्यांतून कादंबरीची जडण-घडण होत राहते. मराठी मनाचा हा 'दाह' हाडामासात रुतणारा आहे.*

**– महाराष्ट्र टाइम्स (३१ ऑगस्ट, २०१४)**

**चाळ संस्कृतीचा प्रभावी आविष्कार...**

*कादंबरीच्या विशिष्ट साच्यानुसार रूढार्थाने एखादे कुटुंब, घटना, दोन जीव किंवा एखाद्या ढोबळ समीकरणाभोवती फिरणारी ही कथा वाटत नाही. हे एका संस्कृतीचे, समूहाचे चित्रण आहे. कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा, अनेक प्रसंग, अनेक प्रकरणे असली तरी कॅलिडोस्कोपमधून दिसणाऱ्या नवनव्या आकृत्यांसारखी ही चित्रे मनाला भिडतात. उत्कंठा वाढत जाते. प्रत्येक व्यक्तिरेखा आणि प्रसंगाशी तादात्म्य पावून ते डोळ्यांसमोर हुबेहूब साकार करणारी प्रभावी वर्णनशैली हे या कादंबरीचे बलस्थान आहे. कादंबरीतील एकएक प्रकरण म्हणजे स्वतंत्र कादंबरीचा विषय आहे. आशा-निराशांचा खेळ आणि त्यामुळे साऱ्या जीवनाला व्यापून राहिलेली दाहकता हे या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. मुळात हा चाळ संस्कृतीचा वेगळा अनुभवच ताकदवान आहे आणि त्याचा आविष्कारही तितक्याच प्रभावीपणे झाला आहे.*

**– दै. सामना (३ ऑगस्ट, २०१४)**

**'दाह' : मानवी जीवनाचं धगधगतं अग्निकुंड!**

*सुरेश पाटील यांनी उभा केलेला दाह स्वतंत्र आहे. त्याला स्वतःचा चेहरा आहे. कादंबरीत मांडलेला विशाल पट आणि त्या पटावर खेळवलेली पात्रे चटकन महाभारताची आठवण करून देतात. सामान्य माणसाचे आयुष्य हे त्या युद्धापेक्षा कमी नसते. माणसाच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांना असंख्य नीरगाठी असतात. एका गाठीचे पदर किंवा धाग्यांची उकल करावी तर पुढे गाठींची संख्या वाढतच गेलेली असते. मानवी जीवनाचे असे असंख्य कंगोरे तितक्याच ताकदीने मांडण्यात, समोर आणण्यात सुरेश पाटील कमालीचे यशस्वी ठरले आहेत. लेखकाने भाषेचा मूळ गाभा तोच ठेवून तिला प्रवाही ठेवण्याचे काम इमाने-इतबारे केले आहे. भाषेत कमालीची आक्रमकता असून ते कादंबरीचे बलस्थान ठरले आहे; त्यामुळे आपण 'दाह' नावाची कादंबरी वाचत आहोत की एखादा चित्रपट पाहात आहोत, हेच कळत नाही. 'दाह' ही फक्त कादंबरी नसून एका प्रवाही संस्कृतीचा चालता-बोलता इतिहास आहे. कादंबरीची मांडणी करताना त्यात कुठेही कृत्रिमता नाही, भेसळ नाही, लबाडी नाही की बडेजाव नाही.*

*जे पाहिलं ते मांडलं हे ब्रीद लेखकानं पाळलं असल्याने ही कादंबरी म्हणजे एक धगधगतं अग्निकुंडच झालं आहे.*

*कादंबरीत असलेला कमालीचा जिवंतपणा, रसरशीतपणा हे तिचे खास वैशिष्ट्यचं म्हणायला हवे. कादंबरी मुंबईच्या पार्श्वभूमीवर लिहिली असली तरी त्यात संपूर्ण महाराष्ट्राचे प्रतिबिंब पडते. तिचा एकंदरीत बाज पाहता ही एखाद्या माणसाची किंवा वर्ग, समूहाची कहाणी न राहता ती शाश्वत मानवी मूल्यांचा वेध घेते. कादंबरीत माणूस हा केंद्रस्थानी असून त्याच्या भावभावनांचा सशक्त लेखाजोखा, मानवी मूल्यांची रचना, ठेवण, गुंफण पाहता तिला आपोआपच जागतिक परिमाण लाभले आहे.*

**– दक्षिण महाराष्ट्र साहित्यपत्रिका (त्रैमासिक जाने-मार्च, २०१५)**

## मनोगत

कादंबऱ्यांच्या विशिष्ट साच्यानुसार रूढार्थानं एखादं कुटुंब, घटना, दोन जीव किंवा एखाद्या ढोबळ समीकरणाभोवती फिरणारी किंवा एखाद्या विशिष्ट फॉर्मला बांधून घेणारी ही कथा नव्हे. हे एका सर्वंकष संस्कृतीचं, समूहाचं चित्रण आहे. सुसंस्कृतपणा, कलात्मकता, भाषेचं सौंदर्य आदी बाबींच्या आहारी न जाता मला जे दिसलं, मी जे पाहिलं, अनुभवलं ते मांडत गेलो. त्यामध्ये कोणतीही भेसळ नाही. मुंबईसारख्या कॉस्मॉपॉलिटन शहरातील लालबाग, परळ, भायखळा, दादर, डिलाईल रोड, वरळी, क्रॉफर्ड मार्केट, फोर्ट, चारकोप, मानखुर्दसारख्या मराठी वस्त्या असोत वा वाशीसारखी दुसरी मुंबई वा आसपासचा परिसर... मुंबईसारखं जागतिक दर्जाचं शहर मराठी माणसाच्या हक्काचं असूनही इथं मराठी माणसाची नाळ मुंबईपेक्षा तो जेथून आला त्या प्रदेशाशीच (गावाशी!) अधिक घट्ट असल्याचं जाणवलं. एकीकडे जिथून आपण आलो त्या संस्कृतीचं ओझं, तर दुसरीकडे कॉस्मॉपॉलिटन शहराचे रीतिरिवाज. या घुसळणीत कॉस्मॉपॉलिटनत्व पुरेसं न अंगीकारल्यामुळे झालेली कुतरओढ; ही बाबच मला चिंता तसेच चिंतनाचा विषय वाटली.

मला नेहमीच माणसामाणसांमध्ये घडणाऱ्या आंतरक्रियांचं जबरदस्त आकर्षण राहिलं. या आंतरक्रियांच्या माध्यमातूनच माणसाची जडणघडण होत राहते. प्रेम, वात्सल्य, मैत्री, आशा-आकांक्षा, ईर्षा, स्पर्धा, संघर्ष अशा अनेक निऱ्यांचा हा हुतूतू. तो कधी कोणतं वळण घेईल, याचं अनुमान बांधणंही

कठीण. दोन माणसं कधी प्रेमानं एकत्र येताना दिसतील तर कधी एकमेकांच्या बोकांडी बसलेलीही आढळतील. मात्र, या सर्व बाहुल्यांना खेळवण्याचं काम करते ती भोवतालची परिस्थिती! तिला पायदळी तुडवून एखादी व्यक्ती पुढे गेली, तर ती महानायक/महानायिका ठरते. इतरांसाठी मात्र असतं ते तेच रिंगण. घाण्याला जुंपलेल्या बैलासारखं; झापडबंद! कधी झापड सरकली, घसरली, तुटली, खाली पडली तरी चालत राहायचं, ऊर फाटेस्तोवर! माझ्या मनात घर करून राहिलेला हा दाह मला नेहमीच अस्वस्थ करीत राहिला आणि त्यातूनच या 'दाह'नं आकार घेतला.

'दाह'बाबत मी संभ्रमित होतो. प्रकाशित होणारी ही माझी पहिलीच कादंबरी व कादंबरीत 'जसं आहे तसं'चा अंगीकार केलेला असल्यानं तिचं स्वागत कसं होईल, या भीतीपोटी माझी घालमेल वाढली होती. पण, ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा सर यांनी कादंबरीचं स्वागत 'दणदणीत' या शब्दात केलं, तर 'रातवा'कार ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे सरांनी 'अप्रतिम' म्हणत पाठीवर शाबासकीची थाप टाकली. मॅजेस्टिकच्या अरुण साठे यांनी तर कादंबरी वाचल्यानंतर माझे ज्येष्ठ बंधू पानिपतकार विश्वास पाटील यांना फोन करून अवाढव्य काम असल्याचं सांगितलं. ज्येष्ठ साहित्यिक वामन होवाळ, पत्रकार श्रीकांत आंब्रे, समीक्षक डॉ. राजेंद्र सलालकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी पाठ थोपटली. त्याचबरोबर दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. सामना, साप्ताहिक साधना, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (त्रैमासिक), मुंबई आकाशवाणी केंद्र आदींनी कादंबरीची अमाप स्तुती करून 'दाह'ची दाहकता समोर आणली. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेनं 'शंकर खंडू पाटील साहित्य पुरस्कार' देऊन कादंबरीचा गौरव केला. याबरोबरच कादंबरीला अन्य काही पुरस्कारही लाभले. 'कादंबरीची मांडणी करण्यापूर्वी तुम्ही आमच्याकडे यायला हवं होतं, यापेक्षाही झणझणीत, भन्नाट आम्ही दिलं असतं,' असे सूरही गिरणगावातून ऐकायला मिळाले. एका नवोदित लेखकासाठी यापेक्षा अधिक काय हवं?

बंधू पानिपतकार विश्वास पाटील यांनाही या विषयावर कादंबरी लिहायची होती. मात्र, त्यांनी 'दाह'चं स्वागत करताना कादंबरी खूपच आवडल्याचं सांगितलं. माझे सासरे शिवाजीराव हिंदुराव भोसले यांच्यामुळे मी प्रकाशात आलो. तर पत्नी क्षमाराजे हिनं नेहमीच माझ्यातल्या अवखळ आक्रमकतेला संयमाच्या चौकटीत बंदिस्त करण्याचं काम केलं. या दोघांचाही 'दाह'च्या जडणघडणीत

मोठा वाटा आहे.
मेहता पब्लिशिंग हाऊस हे प्रकाशन व्यवसायातील आघाडीचं नाव. त्यांच्याकडून पुस्तक प्रकाशित होणं, ही लेखकांसाठी मोलाची गोष्ट असते. 'दाह'चे प्रकाशक सुनील अनिल मेहता यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत. याशिवाय कादंबरीच्या देखणेपणात त्यांच्या सहकाऱ्यांचं योगदानही मोठं आहे. (मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी) 'दाह'च्या निर्मितीत विक्रम भोसले, संग्राम भोसले, सचिन घोरपडे (करनूर), जगन्नाथ डांगे, बाबूराव जामदार, विश्वास विष्णू पाटील, बबन बंडू पाटील, सर्जेराव माने-जाखलंकर, दै. 'सामना'चे पत्रकार प्रभाकर पवार यांच्यासह ज्यांचा हस्ते-परहस्ते हातभार लागला, त्या सर्वांचाच मी ऋणी आहे. मुंबईची लोकसंख्या सुमारे दीड कोटीच्या पुढे असून, इथं चाळसंस्कृतीचा उदयास्त होत राहिला. म्हणूनच कादंबरीतील एखादं पात्र, घटना, प्रसंग यांच्याशी एखाद्याला साम्य वाटलं तर तो निव्वळ योगायोग समजणंच उचित होईल.

**–सुरेश पाटील**

१

मुंबई नावाचं काँक्रीटचं अवाढव्य जंगल. दक्षिण मुंबई हा या जंगलातला एक महत्त्वाचा भाग. या भागात मार्केटांची तशी चंगळच. मग ते क्रॉफर्ड, मंगलदास, काथ्या, काच, लोखंड बाजार वा अन्य कोणतंही असो! पावलागणिक कोणत्या ना कोणत्या मार्केटला सामोरं जाणं हे आलंच. जांभळाच्या घोसांसारखे एक-दुसऱ्याची साथ-संगत करताकरता हे सर्व भाग एकमेकांत मिसळून गेले होते.
याच भागात असलेला 'चण्याचा माळा'! माळ्याची सातमजली इमारत जंगलातल्या एखाद्या करवंदाच्या भल्यामोठ्या जाळीसारखी पसरली होती. तिनं अनेक छोट्या छोट्या खोल्या आपल्या पोटात घेतल्या होत्या. त्यात राहणारी माणसं करवंदाच्या फांदीसारखी एकमेकांत गुरफटली होती. काहींच्या अंगावर पाडाला लागलेल्या करवंदासारखी चैतन्याची नव्हाळी होती. काही किडलेल्या करवंदासारखी देठ अडवून बसली होती. तर काही पार शिळपून गेली होती. हे शिळपणं जसं होतं, तसं फांदीवर येणाऱ्या नव्या कोवळ्या लुसलुशीत मऊसर लांबलचक डिऱ्यासारखं वाढणंही सुरू होतं! माळ्याच्या आजूबाजूला माळ्यासारख्याच असंख्य जाळ्या पसरल्या होत्या. त्यांच्याही फांद्या कळत-

नकळत एकमेकीत गुंतल्या होत्या.


झांजड पडली होती. धुरकट अंधारात माळा भुतासारखा गुपचूप बसला होता. माळ्यासमोरच्या रस्त्यावर म्युनिसिपालिटीचे दिवे पेटले होते. त्या दिव्यांभोवती कीटकांचा खेळ चालला होता. हा खेळ माळा किलकिल्या डोळ्यांनी पाहात होता. कीटकांच्या मस्तवाल हल्ल्यानं दिवा घाईला आल्यासारखा भासायचा. मध्येच प्रकाशाची झुळूक बारीक व्हायची. स्वत:चा डोलारा सांभाळताना माळ्याच्याही अंगाखांद्यावर माणूस नावाची कीटकं अशाच तऱ्हेनं वावरत होती. माणूस नावाची जात एकच होती. मात्र, प्रत्येकाचा रंग, गुणधर्म वेगळा असल्याने अनेकदा माळ्याच्या नाका-तोंडात दम भरत होता. तो गुदमरत होता. या कीटकांपासून भन्नाट दूर पळावं, असं त्याला मनापासून वाटत होतं. पण पळताही येत नव्हतं. माणूस नावाच्या प्राण्यानं त्याच्यावर आपल्या संरक्षणाची जबाबदारी लादली होती. त्यानं कुठं पळून जाऊ नये, म्हणून त्याचे पाय जमिनीत खोल खोल पुरले होते!

माळ्याचं मूळ नाव राजाजी मॅन्शन. पूर्वेला तोंड करून बसलेल्या माळ्यासमोर उत्तर-दक्षिण अशी समांतर गल्ली होती. माळ्याचं बांधकाम झालं, तेव्हा त्याच्यासमोर गल्लीपर्यंत मोकळं पटांगण होतं. नंतर त्या रिकाम्या पटांगणावर माळ्याला लागूनच व्यापारी स्वरूपाच्या बांधकामाचं आयाटान घातलं गेलं. अर्थात, हीसुद्धा राजाजी मॅन्शनच्या मालकाचीच करामत होती! या बांधकामाचा पहिला मजला पूर्ण झाल्यानंतर ते थांबवण्यात आलं होतं. ते का थांबलं, कुणी थांबवलं याबाबत माळकरी अनभिज्ञ होते, पण त्या जागेवर मजले उभे राहिले असते, तर मात्र माळ्याचा श्वास कोंडला असता! त्या व्यापारी गाळ्यांत पूर्वी चणे-कुरमुऱ्याची होलसेल दुकानं होती. पुढे, त्या प्रसिद्ध दुकानांनी अन्यत्र स्थलांतर केलं व रिकाम्या झालेल्या गाळ्यांत तयार कपड्यांनी, इतर मालानं आपला संसार थाटला! मात्र, त्या चणे-कुरमुऱ्याच्या दुकानांवरूनच राजाजी मॅन्शनचं नामाभिधान 'चण्याचा माळा' असं कधी झालं, हे माळ्यालाही कळलं नव्हतं! ही गोष्ट ऐतिहासिक असली तरी बिल्डिंगला चिकटलेलं 'चण्याचा माळा' हे नाव मात्र कायम राहिलं. 'चण्याचा माळा' हे काय नाव झालं? हे शब्द कानावर पडले, तरी माळ्याच्या अंगाचा तीळपापड व्हायचा. मात्र, अलीकडे माळ्याला आपलं हे नाव बेहद्द आवडू लागलं होतं. रिअल इस्टेट क्षेत्रात घुसलेले धनदांडगे तोंडात टाकलेल्या चार चणे-कुरमुऱ्यांसारख्या अशा कैक

**१३वी आवृत्ती**

*नातेसंबंधांविषयी मार्गदर्शन करणारे पुस्तक*

# तो आणि ती




मूळ लेखक - **जॉन ग्रे**

अनुवाद - **अॅड. शुभदा विद्वांस**

**किंमत : २९०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'त्याचे' आणि 'तिचे' नाते हे एखाद्या 'बगीच्या'प्रमाणे असते. जर ते हिरवेगार, रससशीत असावे असे वाटत असेल, तर त्या बगीचाला नियमितपणे पाणी घालावे लागते. त्याची निगराणी करावी लागते, मशागत करावे लागते. निरनिराळ्या ऋतूंचे तसेच अनपेक्षित हवामानाचे भान ठेवावे लागते. नवीन बीज पेरावे लागते, तण काढून टाकावे लागते, तेव्हाच प्रेमाची जादू कायम टिकून राहते!

'प्रेमाचा परिपोष कसा करावा?' ह्याचे अचूक मार्गदर्शन करणारे हे पुस्तक.

प्रॉपर्टीज हा हा म्हणता गिळंकृत करायचे. त्या दृष्टीने माळ्याचा भाव भलताच वधारला होता! शिवाय, माळ्याच्या अंगा-खांद्यावर बागडणाऱ्या माणसाचं आयुष्य तरी काय होतं? दाढेखाली धरलेल्या चण्यासारखंच. अस्तित्व तर दिसायचं; पण कुठे? कधी? काय? म्हणेपर्यंत सगळंच आयागमनी व्हायचं. जे माणसाचं तेच माळ्याचं... म्हटलं तर आहे, नाहीतर सगळंच असून नसल्यासारखं!

राजाजी मॅन्शन हे सरकारी दफ्तरातलं नाव. एखाद्या पत्रावर ते असेल, तर नवागत पोस्टमनही चक्रावून जायचा. परंतु हीच इमारत म्हणजे 'चण्याचा माळा' हे कळल्यानंतर मात्र त्याच्या तोंडावर पाणी यायचं! माळा ही तशी मुंबईतल्या अन्य असंख्य चाळींसारखीच एक चाळ. तिला तिचं स्वतंत्र अस्तित्व होतं. तिला पूर्वी लाकडी जिने, गॅलऱ्या होत्या. पुढे उन्हा-पावसात या गॅलऱ्या, जिने कुजले. त्यांची जागा सिमेंटच्या गॅलऱ्या, जिन्यांनी घेतली. त्याही आता म्हाताऱ्या झाल्या; पण इमारतीला 'माळा' का म्हणतात, हे कोडं मात्र माळकऱ्यांना काही सुटलं नाही. एखादं कुटुंब माळा सोडून बाहेर पडलं, तर माळ्याची कीर्ती घेऊनच ते बाहेर जायचं. तर नवीन आलेलं कुटुंब आपल्या रितीरिवाजांचे, संस्कारांचे खिळे माळ्याच्या अंगात ठोकायचं. अशा असंख्य भळभळत्या जखमा माळ्यानं वागविल्या होत्या, वागवीत होता!

दिवसभराचं घामट, चिकट अंग आकसून माळी अजूनही कीटकांचा खेळ पाहण्यात दंग होता. आकसून गेलेलं अंग थोडं सैल करावं, संध्याकाळचा गारवा अंगावर पांघरून आळस झटकावा असा विचारही त्याच्या मनाला शिवत नव्हता. माळ्यात स्पीकर कोकलत होता. त्याकडे त्याचं ध्यानही नव्हतं. मात्र, जेव्हा माळ्याच्या चौकामध्ये पोरांची धावाधाव सुरू झाली तेव्हा त्याला खऱ्याखुऱ्या कीटकांवर लक्ष केंद्रित करणं अवघड झालं. तो पळापळ करणाऱ्या सुधीर मिरचीकर, भागु रोंघे, सर्जा घोडगावकर, संतोष पिंपरकर, बंडू निकम, नंदू पालकर, दिलीप चाफेकर, राजा जायकर, आदी माळकरी पोरांकडे पाहू लागला.

आज होळी पौर्णिमा. त्याची सूचना देण्यासाठी संध्याकाळी पाचपासूनच माळ्यात स्पीकरनं तोंड उघडलं होतं. या परिचित आवाजाकडे लक्ष देण्याइतपत पोरांकडे वेळ नव्हता. ती होळी रचण्यात दंग झाली होती. माहीम-वांद्र्यामधून वाहणाऱ्या मिठी नदीच्या काठावरून पोरांनी एरंड आणला होता. मात्र, तो कुठून

आणला हे सांगताना आणणारे वसई-विरारचं नाव पुढे करीत होते! पोरांनी माळ्याच्या चौकात मधोमध दगडाचा आधार देऊन तोच एरंड उभा केला. त्यावर एकवीस नारळांची माळ बांधली. त्याला हळद, कुंकू, गुलालानं मढवण्यात आलं. त्याच्या भोवती रिकामी-वाया गेलेली चहाची लाकडी खोकी, कापडाच्या ताग्यांच्या शिवाय रेडिमेड कपड्यांच्या रिकाम्या मोडक्या-तोडक्या लाकडी पेट्या, पुठ्ठ्यांचे बॉक्सेस, मार्केटमधूनच आणलेलं इतर जुनंपुराणं लाकडी सामान, फर्निचर रचण्यात आलं. फळबाजारातून आणलेला पिंजराचा चोथा व भरीला जाडजूड खाकी पुठ्ठे घालण्यात आले. हळूहळू होळीनं आकार घेतला.

तसं पाहायला गेलं, तर होळीसाठी मार्केट किंवा अन्य ठिकाणांहून आणलेलं लाकूड, पिंजर, पुठ्ठे असं सामान म्हणजे तरी काय, तर तेथील तो कचराच! कधी तो माणसांच्या पायाखाली तुडवला जायचा, तर कधी कोपरा धरून एखाद्यानं त्यावर लघवीही केलेली असायची. त्यावर पानाच्या, तंबाखूच्या पिचकाऱ्या तर आम होत्या. एखादवेळी शौचाचा गंधही त्याला यायचा. होळीचं पावित्र्य जपणाऱ्या मनाला मात्र या बाबी कधी खटकायच्या नाहीत.

स्पीकरची बडबड थांबली. होळीभोवती जमा झालेल्या पोरांनी हुर्यो केलं. त्यांच्यात हशा पिकला. तो कशासाठी होता, हे वटनाच्या कठड्याजवळ उभे राहून खाली पाहणाऱ्या माळकऱ्यांना कळलं नाही. भिकुदादा पुढे झाला. त्यानं काडी पेटवली. ती पिंजराच्या चोथ्याखाली धरली. कोरडं ठणठणीत पिंजर व कागदाच्या कपट्यांनी एकदम पेट घेतला. होळी पेटली. एकमेकांच्या तोंडाकडे पाहात, खालवर नजर टाकीत पोरांनी बोंब ठोकली. वटनात उभं राहून खाली पाहणाऱ्या जिजा मिरचीकर, रेखा पिंपरकर, कमळा जायकर, जया चाफेकर, चंद्रा सुपकर, सखु पालकरनीनं पेटलेल्या होळीवर तांदळाचे दाणे टाकले व होळीला हात जोडले. त्यांचा कित्ता आजूबाजूला उभ्या असलेल्या लेकी-बाळी, सुनांनी गिरवला. होळीचा धूर माळ्याच्या नाकपुडीतून वर आभाळाकडे धाव घेऊ लागला. रख्मा रायकर, सुंगधा बिलवाडकर, अनिता खाडे सारख्या रसरसत्या माळकरणींनी होळीला नमस्कार केला. होळीच्या नैवेद्याचं ताट तयार करण्यासाठी माळ्यातल्या खाणावळी व इतर माळकरणी आपआपल्या खोलीत परतू लागल्या.

माळ्यात दरवर्षी होळी अशीच पेटत होती. कमळा जायकर इथं राहायला आल्यापासून तिनं त्यामध्ये पाहिलेला बदल म्हणजे अलीकडच्या काही वर्षांत

भिकुदादा होळी पेटवायचा, हाच. भिकुदादा व होळीत बरंच साम्य होतं. भिकुदादाचा माळयात दारूचा धंदा होता. त्याच्या फुग्यातली दारू अनेकांच्या संसाराची होळी करीत होती, तर कधीकाळी होळीची सुरुवात झाली तेव्हा होळीत तीन जिवांचा बळी गेला होता. त्यांना पोटात घेऊनच होळीच्या ज्वाळा गगनाला भिडत होत्या. दोन्हीतही नशा होती! कमळा दरवर्षी होळीला हात जोडून नमस्कार करीत होती. नैवेद्य देत होती. मात्र, होळीच्या दिवशी दिवसभरात तिला एकदा तरी एरंडपंत, होळोपंतीची आठवण व्हायची. तिच्या गावातले नामदेव कांबळे हे पेशाने शिक्षक होते. त्यांना गावातले लोक प्रेमानं गुरुजी म्हणायचे. त्यांचं वाचन दांडगं होतं. ते कमळाच्या आजोबांकडे नेहमी यायचे. गावात साजऱ्या होणाऱ्या अनेक होळींना नामदेव गुरुजींनी तिला, तिचे आजोबा, वडील व भावा-बहिणीला होळीची कथा सांगितली होती. तीच गोष्ट कमळा जायकरीन एखादं गुपित सांगितल्यासारखी आपल्या लेकरांना नाहीतर जेवणाऱ्यांना ऐकवायची...

दूरदेशाचा एक सुंदर, देखणा, विद्वत्ताप्रचुर तरुण त्या गावात आला. विद्यार्जन हे त्याचं काम. त्या गावातील एका ब्राह्मण कुटुंबाच्या पडवीत तो राहिला. स्वत:चा स्वयंपाक तो स्वत:च रांधायचा. भोजन करायचा व शाळेत जायचा. आपल्या शिष्यांना संस्काराचे धडे देणं, त्यांना शिकवून शहाणं-सुरतं करणं, समाजगाडा हाकण्यासाठी तयार करणं हे त्याचं दैनंदिन काम होतं. ते तो मोठ्या तळमळीनं पार पाडायचा. तो ज्या ब्राह्मणाच्या घरात राहिला होता, त्या ब्राह्मणाला एक नाजूक, उपवर कन्या होती. तिच्यासाठी स्थळ शोधण्याचं काम सुरू होतं. इतका देखणा, उच्चविद्याविभूषित तरुण घरी असताना बाहेर शोधाशोध का व कशासाठी? त्यापेक्षा यालाच आपली मुलगी दिली तरऽ...! ब्राह्मणाच्या डोक्यात विचार आला, अन् शिक्षक त्याचा जावई झाला.

पुढे शिक्षकाला एक मुलगा झाला. हळूहळू तो मोठा होऊ लागला. आपल्या मित्रांबरोबर विटी-दांडू, सूरपाट्या, फाटीचा खेळ, हार हार गवळ्याची म्हस असे खेळ खेळताना त्याच्या पावलांखाली गाव-शिवार तुडवू लागला. पण इतर ब्राह्मणांच्या मुलांसारखे याचे गुण नव्हते. हा खेळ खेळून घरी येत असताना वाटेत, शिवारात पडलेलं, एखाद्या मेलेल्या जनावराचं छोटं-मोठं हाडूक घेऊनच घरी यायचा. त्याच्या या आचरटपणामुळे त्याच्या आईला मळमळून यायचं. पोटातली शाकाहारी आतडी ढवळून निघायची. ती त्याला चांगलाच

**६वी सुधारित आवृत्ती**




# व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय

मूळ लेखक - **किरण बेदी**

अनुवाद - **लीना सोहोनी**

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

एका अत्याचारग्रस्त स्त्रीची कैफियत

त्याला (माझ्या पतीला) कशाचीही खंत नव्हती, इतका तो बेजबाबदार होता. त्यानं माझ्या किमती साड्या, दागिने, घरातील लोकरी कपडे, पुस्तकं आणि आमच्या मुलांचे कपडेसुद्धा विकून टाकले. इतकंच नव्हे तर मला माझ्या ऑफिसातून बक्षीस म्हणून मिळालेले पुरस्कार व स्मृतिचिन्हंसुद्धा त्यानं विकली. आम्ही घरात नसलो की, तो स्वत:च्याच घरात चोऱ्यामाऱ्या करून, सर्व पैसा दारूवर खर्च करत असे. घरातील जे काही सामानसुमान, विजेचे दिवे, कुलपे हाताला लागेल ती कोणतीही गोष्ट तो या दारूपायी विकून येत असे.

एवढंच काय त्याने दारूसाठी स्वत:च्या स्कूटरची स्टेपनीसुद्धा विकून टाकली होती. कधीकधी तो घरी येऊन, आपली स्कूटर पोलिसांनी ताब्यात घेतल्याची बतावणी करून ती सोडवून आणण्यासाठी शंभर रुपयांची मागणी करायचा. कोणत्याही मार्गाने, खोटारडेपणा करून घरच्यांना लुबाडून जगायचं या गोष्टीची त्याला सवय झाली होती. त्याच्या वागण्याचा माझ्यावर सतत प्रचंड शारीरिक व मानसिक ताण होता. एवढंच काय तो आपल्या मुलांवर हात उचलायलासुद्धा कमी करत नसे. 'मी घरातील कोणती गोष्ट चोरून विकली हे तुम्ही आईला सांगितलंत, तर मग बघाच – ' अशी धमकी तो त्यांना द्यायचा.

चोप द्यायची. अशी वर्तणूक परत न करण्याबाबत त्याला सक्त ताकीद द्यायची. पण पोराच्या ते अंगवळणी पडत नव्हतं. मग ती वैतागायची व त्या वैतागातच कधीकधी म्हणायची, 'काट्यां, एखाद्या महाराच्या घरी तरी जन्मायचंस! ब्राह्मणाच्या घरी जन्म घेऊन कशाला धर्म बुडवतोस?'

असाच एकदा खेळ खेळून तो पोरगा परत आला. नेहमीप्रमाणं त्याच्या हातात जनावराचं छोटं हाडूक होतं. ते पाहून त्याच्या आईच्या अंगाचा तीळपापड झाला. ती दारातच त्याला चोप देऊ लागली. समोरून मास्तर येत होते. त्यांनी ते पाहिलं. पित्याचं काळीज कळवळलं.

''अगं, अगंऽऽ! का मारतेस लेकराला?'' आईच्या हातून त्याला सोडवून घेत त्यांनी विचारलं.

''मारू नको तर काय करू? दररोज जनावरांची हाडे घेऊन येतो हा! किती समजवायचं, किती वेळा मार द्यायचा? तरीही अक्कल काही येत नाही!'' ती चिडून म्हणाली.

''अगं, आड्याचं पाणी त्याच घराच्या वळचणीला पडायचं नाही तर ते कुठं पडेल! मग महाराच्या पोरानं जनावराचं हाडूक आणलं तर बिघडलं कुठे?'' तो म्हणाला.

नवऱ्याचं उत्तर ऐकून तिच्या अंगाचा थरकाप उडाला. क्षणात तिच्या डोळे पांढरे झाले. मूर्च्छा येऊन ती खाली कोसळली. गोष्ट ब्राह्मणाच्या कानावर गेली. ब्राह्मणास कंप सुटला. ठिणगीचं रूपांतर वणव्यात झालं. ब्राह्मण्य धोक्यात आलं. खोल खोल पाण्यात बुडू लागलं. जातीवरच संकट कोसळलं होतं. त्यातून काहीतरी मार्ग काढणं आवश्यक होतं. त्यांनी कट केला. कारस्थान गुप्त राहिलं.

गावपंचायत भरली. भिन्न भिन्न जाती पंचायतीत आल्या. शास्त्र जाणणाऱ्या प्रमुख ब्राह्मणानं, समाजाच्या भल्यासाठी अग्निदेवतेला खूश करायचा व त्यासाठी अग्निदेवतेची पूजा करण्याचा प्रस्ताव मांडला. त्याच दिवशी पौर्णिमा होती. त्यासाठी पौर्णिमेच्या दिवशीच सार्वजनिक होळी पेटवायची. तिला पुरणपोळीचा नैवेद्य द्यायचा. दुसऱ्या दिवशी आनंदाचा दिवस म्हणून क्षत्रिय, इतर जाती- जमातींनी नशापाणी करायचं, बोकड कापायचा असे निर्णयही गावपंचायतीत घेण्यात आले. होळी पेटवण्याचा मान मात्र क्षत्रिय ग्रामप्रमुखाला देण्यात आला. ग्रामप्रमुखानं होकार दिला. त्याच्या डोक्यावर मानाचा तुरा डोलू

लागला.

ठरल्याप्रमाणं रात्री भलीमोठी होळी पेटली. नियोजित कटानुसार भाडोत्री गुंडांनी लोकांच्या लक्षात येण्याअगोदरच मास्तर, त्याची बायको व पोरगं होळीत फेकलं! गाव अवाक् झालं. त्यांना 'वाचवा, वाचवा' म्हणून बोंबलू लागलं. प्रमुख शास्त्रकार ब्राह्मण पुढे आला व गावकऱ्यांना म्हणाला, ''त्यांच्या नशिबातच ते होतं. अग्निनारायणालाही तीन जिवांचं अर्घ्य हवं होतं. त्याशिवाय समाजाची घडी ती नीट कशी बसणार? समाजाच्या भल्यासाठी ब्राह्मणांनी आपल्या समाजातील तीन जिवांची आहुती देऊन समाजावर उपकारच केले आहेत! मग तुम्ही कशाला रडता? करा, आनंद साजरा करा!''

शास्त्र जाणणारे ते. ते सांगतील ते खरं; आपलं काय! म्हणून जनता जल्लोष करू लागली.

आजही खेड्यापाड्यांत होळी पेटवतात. होळीच्या मधोमध उभ्या केलेल्या एरंडाच्या फांदीला एरंडपंत म्हणतात. तो म्हणजे जनावरांचं हाडूक घेऊन येणारा मास्तरांचा लहान मुलगा! होळीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या गावातील प्रत्येक घरातून गोळा करतात. कारण हे पुण्यकर्म साऱ्या गावाचं. एरंडाभोवती रचलेल्या गोवऱ्या म्हणजे आपल्या लाडक्या लेकाला मिठी मारून बसलेली त्याची ब्राह्मण आई; तिचं नाव होळोपंती! होळी पेटवण्याचा विस्तव मात्र महाराघरचा. तो मान महाराला. होळी पेटवायची ती महाराघरच्या विस्तवानेच. कारण तो त्या घरचा कर्ता पुरुष तसा नवरा मुलगा; त्याचं नाव होळोपंत! जाळण्याचं पुण्य क्षत्रियाला. तो मान ग्रामप्रमुखाचा. होळी पेटल्यानंतर तिच्याभोवती दुधाचा सडा टाकायचा. तेही एक प्रतीक म्हणून! अग्निमध्ये तडफडणाऱ्या लहान बाळाचा जीव शांत व्हावा म्हणून हे दूध व होळी दिवशी मारलेली बोंब म्हणजे ती त्या तीन निष्पाप जिवांना वाचविण्यासाठी सर्वांनी केलेलं आर्जव!

कमळा जायकरनीच्या गावातही श्रावणात ग्रंथ पारायण केलं जायचं. पारायणामध्ये वेगवेगळे ग्रंथ वाचले जायचे. त्यामध्ये तिनं हिरण्यकश्यपूची कथा ऐकली होती. त्या कथेमध्ये हिरण्यकश्यपूची बहीण होलिका हिला आपला भाचा भक्त प्रल्हाद याला ठार मारायचं होतं. त्यासाठी ती भक्त प्रल्हादाला आपल्या मांडीवर घेऊन अग्नीत बसली; पण त्यात ती स्वत:च जळाली व प्रल्हाद मात्र सुखरूप बाहेर आला! तो दिवस म्हणजेच फाल्गुन शुद्ध पौर्णिमा, असा होळीचा महिमा सांगितला होता. तर दुसऱ्या एका कथेत, मदनरूपी कामदेव भगवान

शंकराच्या शरीरात शिरू पाहात होता. त्यावेळी भगवान शंकरानं आपला तिसरा नेत्र उघडून त्या मदनरूपी कामदेवास ठार मारले. म्हणूनच तो दिवस साजरा करा, असा साक्षात भगवान शंकराचाच आदेश आहे, असं सांगितलं होतं; त्यामुळेच होळी साजरी होऊ लागल्याचं लिहिलं होतं! म्हणजे ग्रंथाग्रंथांतही मारामारी! मग खरं कोणतं? शिवाय कांबळे गुरुजी की ग्रंथ; हा तिढाही होताच. जायकरनीला या खऱ्या-खोट्यामध्ये पडून स्वत:च्या मेंदूचा भुगा होऊ द्यायचा नव्हता.

तिला तिचे खाणावळे, म्हणजे तिच्याकडे जेवायला असणारे; जेवणारे येण्यास सुरुवात होण्याअगोदर होळीला नैवेद्य दाखवायचा होता. त्यासाठी ती नैवेद्याची तयारी करू लागली.

गल्लीच्या एका टोकाकडून बुटांचा 'खाड् खाड्' आवाज येऊ लागला. पोलिसांची शिट्टी गर्जू लागली. माळा तारवटल्या डोळ्यांनी पाहू लागला. माळ्याच्या मध्यभागी होळी पेटल्याची जागा सोडून, तिच्या आजूबाजूला चंपाची कुत्री आपल्या पुढच्या पायांवर मान टाकून पसरली होती. त्यांनी झटपट डोळे उघडून आपल्या जागा सोडल्या व माळ्याचे अंतरंग सोडून भुंकत भुंकत बोळाकडे धावली. कुत्र्यांच्या आवाजानं रात्र थरारली. कुत्री बोळाच्या तोंडाला येईपर्यंत बुटांचा आवाज कुठंतरी आयागमनी झाला होता. तरीही बोळ धरून, गल्लीत तोंड काढून कुत्री भुंकत होती. मात्र, एकाही कुत्र्यानं माळ्याची हद्द ओलांडून बोळातून बाहेर पडण्याचं सौजन्य दाखवलं नाही.

थोडा वेळ भुंकून कुत्री परत चौकात आली. एखाद्याचं मधूनच गुरगुरणं, भुंकणं सुरू होतं. कुत्र्यांच्या दंग्यानं झोप चाळवलेल्या चंपानं आवाज दिला, ''साल्यांनो, गुपचूप झोपा आता!''

कुत्री चौकातच थोडा वेळ इकडं-तिकडं करीत राहिली. काहींनी माळ्याच्या खांबावर मागचा पाय वर केला, तर दोघा बहाद्दरांनी होळीसाठी आणलेल्या; पण उरलेलं म्हणून बाजूला पडलेल्या चहाच्या खोक्यांवर टांग वर केली! कुत्री आपापल्या जागेवर परत विसावली. चंपाचा नवरा सोन्या चौकात बाजलं टाकून त्यावर झोपला होता. राणी कुत्री सोन्याच्या पोटाशी लगटून बसली. हळूहळू तिनंही आपले पुढचे पाय पसरले व त्यामध्ये मान खुपसली.

कुत्र्यांच्या दंग्यानं स्वामी अभयानंदानी डोळे उघडले. भिंतीवरची ट्यूबलाइट

९वी आवृत्ती




# करुणाष्टक

लेखक - **व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

ही आहे एक कुटुंबकहाणी...
दादा, आई, सहा मुलं आणि दोन मुली यांची.
आईचा कडक स्वभाव आणि फाडफाड बोलणं
यामुळे दादा तिला म्हणायचे 'फौजदार'.
पण सगळ्या कुटुंबाला सावली देणारं घर जळलं;
दादा खचले, वारले आणि आई अबोल झाली.
स्वत:च्या संसारात अलिप्तासारखी वागू लागली.
मुलं मोठी होत होती.
या मुलांच्या रूपानं आईपुढे आठ समस्या उभ्या राहिल्या.
जणू ही आठ मुलं म्हणजे नियतीनं आईला घालून
ठेवलेली आठ कोडी. हेच तिचं करुणाष्टक.

खरं म्हणजे कोणत्याही आईचं.
कारण, वाट चालताना ओझं वागवणं
हे स्त्रीच्या भाळी अगदी इतिहासपूर्व काळापासून आलेलं आहे. तेव्हापासून
आपल्या स्त्रीत्वाला आलेलं फळ–मूल
हे सुद्धा आईला ओझंच होऊन राहिलं असलं पाहिजे.

प्रकाश ओकत होती. खोलीतली समईही मंदपणे जळत होती. तिनं काजळी धरली होती. ट्यूबलाइटच्या उजेडात अभयानंदांनी मांडलेला होम त्यांच्याकडे टवकारून पाहात होता. होमाच्या विटांनी मौन पाळलं होतं. त्या जागच्या जागी शांतपणे बसून होत्या. होमाचा पाट, गोमूत्र, दही, दूध, फुलं, माळा, रानचंद-रानकंदचा पाला आदी वस्तू विखरून पडल्या होत्या. भिंतीशेजारी टाकलेल्या चादरीवर सुभानजी आडवा झाला होता. त्याच्याजवळ त्याची दोन्ही चिल्लीपिल्ली आडवी-तिडवी झोपली होती. त्याची अस्तुरी सुकन्या स्वामींचे पाय चेपता चेपता स्वामींच्या पायावरच झोपी गेली होती. डोणीत घुसलेल्या सापासारखं तिचं शरीर लोखंडी कॉटवरून खाली लोंबत होतं! त्याला तिनं बुडाखाली घेतलेल्या स्टुलाचा आधार मिळाला होता.

स्वामींनी पाय हलवला. एवढ्याशा हालचालीनं सुकन्या दचकली व ताडकन उठली. झोपेनं स्वामींच्या सेवेचं व्रत खंडित केल्याचा अपराध तिच्या चेहऱ्यावर झळकत होता! स्वामींच्या चेहऱ्यावर दुधाळ हसू फाकलं. तिच्या जिवाला बरं वाटलं. तिनं आपल्या पारोशा तोंडावर पदराचा शेव फिरवला. ती स्वामींचे पाय चेपू लागली.

''बाळ, झोप आता. थकली असशील,'' स्वामींचा स्नेहार्द्र कटाक्ष तिची विचारपूस करीत होता.

''नाही, नाही बाबा. नुकताच डोळा लागला!'' घडलेल्या प्रमादाला तोंडावाटे वाट मिळाली.

''असू दे. असू दे. होतं असं कधीतरी!'' स्वामींनी तिला धीर दिला.

''होम होईपर्यंत इतकी घेऊ नका, असं मी सांगत होते!''

''काय करणार बाळ! कधीकधी जगन्नियंता देतो ते छप्पर फाडून. अन् नाही म्हणजे पुरतं कंगाल!'' उशाशेजारी ठेवलेली ब्रॅण्डीची बाटली कुरवाळत स्वामींच्या जिभेला कोंब फुटले.

''मला कळलं नाही, बाबा!''

''नाहीच कळणार. माणूस नावाचा क्षुद्र जीव तू. माझ्या अंगात संचारलेली शिवशक्ती तुला कशी कळून येणार? तुला शिवशक्तीच्या ताकदीचा प्रत्यय देण्यासाठी 'शक्तिचर यज्ञ' करणं हाच त्यावरचा उपाय आहे. त्यासाठी आपल्याला हरिद्वारलाच जावं लागेल,'' स्वामींनी हळुवारपणे कारणमीमांसा केली.

''बाबा, त्याची चिंता आपण करू नका. आपली इच्छा लवकरच फळाला येईल.''
''शाब्बास बेटा!'' स्वामी उठून बसले. त्यांनी तिचे दोन्ही दंड हातात पकडले. तिच्या नजरेत नजर खुपसली व म्हणाले, ''तुझे भाग्यशाली दिवस दूर नाहीत बालिके! तुला लवकरच या विश्वाची स्वामिनी व्हायचं आहे!''
''ते खरं ओ बाबाऽ; पण आपण असे पिऊन तर्रऽऽ झालात की मलाच भीती वाटते,'' सुकन्यानं त्यांच्या हातातून आपले हात सोडवून घेतले.
''अगं वेडे, परमेश्वराच्या अगाध शक्तीचा संचार माझ्या शरीरात होतो. ती शक्ती काबूत ठेवणं मला शक्य होत नाही. त्यासाठीच या मॉडर्न अमृताचे काही थेंब मला माझ्या शरीरात ढकलावे लागतात. त्याच्या साहाय्यानं मी दैवी शक्तीवर विजय तर मिळवतोच; पण आकाश-पाताळाची वारीही करून येतो!'' अभयानंदानं हातातली बाटली कुरवाळली व तो हसला.
''म्हणजे?''
''अजून कच्चं मडकं आहे हे!'' स्वामींनी तिची टपली खेचली व ते म्हणाले, ''होशील, होशील; आज ना उद्या तूसुद्धा माझ्या हाताखाली तयार होशील.''
स्वामीनं तिच्या हातून आपले पाय सोडवून घेतले. तो कॉटवरून खाली उतरला व आतल्या खोलीत गेला. त्याने मोरीत खळाखळा चुळा भरल्या. तोंड धुतले. पायावर पाण्याचे दोन तांबे ओतले. मोरीशेजारी सुकन्या टॉवेल घेऊन उभी होती. त्याने टॉवेल घेतला. हातपाय पुसले व परत तो सुकन्याकडे दिला. तिच्या खांद्यावर हात ठेवला. तो तसाच तिच्या कमरेपर्यंत खाली आणला. कमरेला थोडा दाब देऊन त्याने तिला पुढे खेचली. बाबांच्या शरीराला तिच्या शरीराचा स्पर्श झाला! तिनं चटकन मधल्या चौकटीकडे नजर टाकली.
''डोण्ट वरीऽ! काळजी करू नकोस. मी तुझं भलं करीन,'' स्वामी पुटपुटला. त्याच्या स्पर्शानं रोमांचित झालेल्या सुकन्याला काय बोलावं, ते सुचलं नाही.
स्वामी पुढच्या खोलीत आले. त्यांनी सुभानजीला हलवलं.
''काय, काय?'' सुभाना घाबराघुबरा होऊन उठला. समोर स्वामींना पाहून ओशाळला. ''नुकताच...!''
''माहीत आहे मला ते! चल ऊठ बघू आधी. होम पेटवायचा आहे ना?''
बाबांचा आदेश. सुभानजी चटकन जागचा हलला व पाठीमागच्या खोलीत गेला. सुकन्या अजून तिथंच उभी होती! त्यानं तिच्या हातातला टॉवेल खस्सकन

ओढला व मोरीत घुसत तो म्हणाला, ''ए तुझ्या मायलाऽ! घोड्यासारखी उभ्या उभ्याच झोप घ्यायची सवय आहे की काय तुला?''

''अंऽ! कुठं काय?'' सुकन्या बरळली. ती भानावर आली अन् तिला आपली चूक कळली. ती हसली.

''कधीकधी असाही डुलका लागतो बघा!'' तिनं साखर पेरली. सुभानजी खळखळून हसला. हसत हसतच सुकन्या बाहेरच्या खोलीत आली.

बाबा होमाच्या तयारीत गुंतले होते. सुकन्याची नजर आपल्या चिमुकल्यांवरऊगेली. तिचं मातृह्दय कळवळलं. तिनं त्यांना नीट झोपवलं. त्यांच्या अंगावर पांघरूण घातलं.

सुभानानं वासाच्या साबणानं हात, पाय, तोंड धुतले. खळाखळा चुळा भरल्या. 'हा' करून तोंड पसरले. तोंडाची वाफ ओंजळीत पकडून नाकासमोर नेली. परत दोन-तीन वेळा चुळा भरल्या. शिवाय त्यानं आणखी दोनदा ओंजळीत पाणी घेऊन त्याचे सपकारे आपल्या चेहऱ्यावर मारले. सुकन्यानं मोरीच्या कट्ट्यावर ठेवलेला टॉवेल त्यानं उचलला व तोंड पुसत तो बाहेरच्या खोलीत आला.

''जिलबे, तू पण हात-पाय धू बघू. अगं, हा होम आहे.'' त्यानं सुकन्येला सांगितलं. परत त्याला काहीशी शंका आली. आपल्या शंका निरसनासाठी त्यानं स्वामीला विचारलं, ''बाबा, परत अंघोळ केली पाहिजे का?''

''काही आवश्यकता नाही.''

''आपली शंका म्हणून विचारलं!'' त्यानं भिंतीवरच्या घड्याळाकडे नजर टाकली व तो म्हणाला, ''आता दुसरा दिवस सुरू झाला असेलच की.''

''सुभानजी, मला ते कळत नाही का? अन् शास्त्र तू जाणतोस की मी?'' स्वामी एकदम तडकले व पुढे म्हणाले, ''साला, तुम्ही मध्यमवर्गीय कधी सुधारायचेच नाहीत!''

सुभानजी निरुत्तर झाला.

''तुम्ही गप्प बसा ओऽ! बाबांच्या सांगण्याप्रमाणंच होऊ दे. उगाच आपली अक्कल...!'' सुकन्यानं पटकन आपली जीभ चावली. स्वामींनी प्रेमळपणे सुकन्याकडे पाहिलं.

''ठीक आहे, अक्का! उगीच शंकेला वाव नको. नाहीतर सुभानजीचं मन खात बसेल. त्यापेक्षा तुम्ही आत जा. थोडंसं फ्रेश व्हा अन् लगेच होमाला बसायची तयारी करा. तोपर्यंत मी इथलं काम आटपतो. अन् हो, सर्वांसाठी थोडासा

चहाही होऊ दे!'' स्वामींनी होमाला आणलेल्या दुधातलंच कपभर दूध तिच्या हातावर ठेवलं. सुभानजी स्वामींना मदत करू लागला.

''बाबा, सगळं खरं; परंतु होम पेटवायला आता मुहूर्त आहे का?'' न राहवून सुभानजीनं विचारलं.

स्वामी चमकले. त्यांनी तोंडावर खोटं हसू आणलं. शाळेतल्या शंकेखोर पोराला मास्तरानं समजवावं तसं त्यांनी सुभानजीला सांगितलं, ''सुभान, हे रात्रीचं उत्तरायण आहे. ते कोणत्याही मुहूर्तासाठी चांगलंच असतं, असं संस्कृत शास्त्रात सांगितलं आहे; पण शास्त्र पडलं सनातन्यांच्या हातात! ते सर्वसामान्य लोकांना कळलं, तर त्यांचं भलं होईल व यांना कोणी विचारणार नाही याच भीतीनं हा साडेतीन मुहूर्तांसारखाच असणारा मुहूर्त कोणी सांगत नाही; कळलं?''

सुभानजीनं मान हलवली. सुकन्या चहाचे कप घेऊन बाहेर आली. स्वामींनी चहाचा घोट घेतला. ते एकदम खूश झाले. ''व्वाऽ, एकदम छान उताराऽ!''

होमाची तयारी झाली. स्वामींनी आपला सदरा काढला व अंगावर उपरणे घेतले. उपरण्याखाली गळ्यात पांढरंशुभ्र जानवं लोंबत होतं. जानव्याची कडोसरी धरून पाच तोळ्यांची सोन्याची चेन लोंबत होती. स्वामी होमाच्या एका बाजूला बसले. त्यांच्या उजव्या हाताला सुभानजी बसला व त्याच्या शेजारी सुकन्यानं बैठक मारली. स्वामींनी काडी पेटवली. ती होमातल्या लाकडी फाळींवर फेकली. फाळींवर सुभानजीनं रॉकेल ओतलं होतं. त्याचा एकदम भडका उडाला. स्वामींच्या भाषेतल्या रानचंद-रानकंदची पानं, फांद्या धूर ओकू लागली. सुकन्या स्वामींकडे एकटक पाहू लागली. स्वामी मंत्र पुटपुटत होते. त्यांचा गोरापान देह होमाच्या तांबूस उजेडात गाजरासारखा लालबुंद दिसत होता.

प्रथम पानं पेटली. लाकडावर ओतलेलं रॉकेल पेटलं. नंतर लाकडं धुमसून पेटू लागली. लाकडातून बाहेर पडणाऱ्या धुरानं खिडकीच्या व्हेंटिलेशनमधून बाहेर उसळी घेतली. धुराचे लोट वरती जाऊ लागले. त्याच वेळी इराकतीला आल्यानं सीता तडेकर मोरीत आली होती. तिला मोरीच्या खिडकीतून खालून वर येणारे धुराचे लोट दिसले. ती पटकन मोरीतून बाहेर आली. तिनं आपल्या घरातल्यांना उठवलं व तशीच दाराकडे पळाली. तिनं गडबडीनं दार उघडलं अन् 'ठोऽ ठोऽ' बोंब ठोकली.

''आग लागली. पळा, पळाऽ, माळ्याला आग लागली!''

❖

# पुस्तक परिचय

## डिनायल


**अ मेमॉइर ऑफ टेरर**

*‘घृणा, तिरस्कार आणि हतबलतेच्या पलीकडे जाऊन तिच्यावर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगाराच्या मानसिकतेचा शोध घेणाऱ्या जेसिकाचा संघर्ष.’’*



जेसिका स्टर्न हार्वर्ड विद्यापीठात ‘दहशतवाद’ या विषयाची व्याख्याती आहे. तसंच इतर ‘इन्स्टिट्यूशन टास्क फोर्स ऑन नॅशनल सेक्युरिटी अँड लॉ’ची माननीय सभासद आहे. तिनं हार्वर्डमधून ‘पब्लिक पॉलिसी’वर डॉक्टरेट मिळवली. क्लिंटनच्या प्रशासनकाळात तिनं ‘नॅशनल सेक्युरिटी कौन्सिल’वर स्टाफ मेंबर म्हणून काम केलं होतं. तिला २००९ सालची गुगनहाइम फेलोशिप मिळाली होती. तसेच २००१ मध्ये टाइम मॅगझिननं निवडलेल्या, जे आपल्या अभिनय कल्पनांनी जग बदलतील अशा सात विचारवंतांपैकी ती एक होती. न्यू यॉर्क टाइम्सनं नावाजलेल्या ‘टेरर इन द नेम ऑफ गॉड’ आणि ‘द अल्टिमेट टेररिस्ट्स’ या पुस्तकांची स्टर्न लेखिका आहे.

ती मॅसॅच्युसेट्समध्ये पती व मुलासमवेत राहते.




मूळ लेखक **जेसिका स्टर्न**

अनुवाद **मैत्रेयी जोशी**

**प्रस्तावना**

गेली वीस वर्षं मी खलप्रवृत्ती आणि हिंसेच्या कारणांचा अभ्यास करतेय. या कामात मला रुची का वाटते किंवा मी हे काम कसं करू शकते असा प्रश्न आत्तापर्यंत मी कधीच केला नव्हता. 'माझे दहशतवादावरील कार्य' याविषयी मी जेव्हा भाषण करते तेव्हा हमखास विचारल्या जाणाऱ्या एका प्रश्नाचं हे पुस्तक उत्तर देतं. तुझ्यासारखी एक मुलगी पाकिस्तानमधल्या दहशतवादी प्रशिक्षण शिबिराला कशी काय भेट देऊ शकली? तुला भीती नाही का वाटली? याचं उत्तर असं आहे की मला भीती वाटत होती याची मला जाणीवच नव्हती आणि तसं का याचं हे पुस्तक स्पष्टीकरण देतं. दुःखद घटनांच्या एखाद्या मालिकेनंतर मला वाटतं ही भीतीची संवेदना जणू नष्ट होत असावी.

जेव्हा एका बलात्काऱ्याने माझ्यावर आणि माझ्या बहिणीवर पिस्तूल रोखून आपला कार्यभाग साधला, त्या क्षणापासून माझे हे आत्मकथन सुरू होते. तासभर तो तिथं होता. माझी बहीण तेव्हा चौदा वर्षांची होती आणि मी तिच्यापेक्षा एका वर्षानं मोठी. त्या भयानक घटनेनंतरही मी आणि माझी बहीण तुलनेनं आनंदी आणि क्रियाशील आयुष्य जगत राहिलो. माझी बहीण एक यशस्वी मार्केटिंग

कम्युनिकेशन्स एक्झिक्युटिव्ह आहे. एका ऑपेरामध्ये ती गाते आणि यशस्वी अभिनेत्रीसुद्धा आहे. ती विवाहित असून तिला दोन मुलं आहेत. तिचं कुटुंब आणि तिचं संगीत हा तिचा आनंदाचा ठेवा आहे. ती वासनेची शिकार झाली होती हे आज कोणाला खरंही वाटणार नाही. तिच्याप्रमाणं मीसुद्धा माझ्या कुटुंबात आणि माझ्या कामात खूप रमते.

आणि तरीसुद्धा, बालपणापासून, मला माझ्यामध्ये काही गोंधळात टाकणारे बदल आढळून आले आहेत. असे बदल, जे बदलत्या काळाबरोबर अधिकाधिक त्रासदायक होत गेले. प्रत्येक सरत्या वर्षानुसार मला होणाऱ्या वेदनेची तीव्रता कमी-कमी होत गेली. पण त्याचबरोबर आनंदही मावळत गेला. लहानपणी मला लेखिका व्हावंसं वाटायचं, पण ज्या विषयांना लेखन आवश्यक असतं अशा विषयात सातत्यानं मिळणाऱ्या खालच्या दर्जामुळं मला माझं स्वप्न गुंडाळावं लागलं. जिथं भावनांचा काही संबंध नाही अशा विषयांमध्ये मी आरामात गुण मिळवते असं मला दिसून आलं. मी रसायनशास्त्र विषय घेऊन पदवी घेतली. एकतर तो मला तुलनेनं अधिक सोपा वाटला आणि दुसरं म्हणजे त्यातली उत्तरं एक तर 'चूक' होती किंवा 'बरोबर' होती. वास्तव जीवनासारखा तिथं भावनिक ताळमेळ मोलाचा नसतो. मी केमिस्ट व्हायचं योजलं होतं; पण नंतर माझं हिंसेविषयी कुतूहल चाळवलं आणि त्या विषयाची मला भूल पडली. एकीकडं त्याचा मोह होत होता तर दुसरीकडं मी त्याला झिडकारत होते. 'वॉर ॲन्ड पीस' मधले युद्धाचे भाग मी गाळले; परंतु रासायनिक अस्त्रांवर मी डॉक्टरेटसाठी प्रबंध लिहिला - ज्याच्या केंद्रस्थानी मुख्यत्वे हिंसेच्या कार्यकारणभावाचा समावेश होता. मात्र त्यामध्ये हिंसेला बळी पडणाऱ्या माणसांकडं मी फारसं लक्ष दिलं नव्हतं.

अखेरीस मी दहशतवाद या विषयातील तज्ज्ञ झाले. १९८३ मध्ये मी दहशतवादावर पहिला लेख लिहिला. त्या वेळेला करिअरची ही निवड चक्रमपणाची म्हणायला हवी. फारसं शहाणपणाचं पाऊल नव्हतं ते. हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोक दहशतवादाकडं गांभीर्यानं बघत होते. पण मला कुठंतरी अंतर्ज्ञानानं जाणवलं की दहशतवाद यापुढं चढत्या श्रेणीत महत्त्वाचा होणार आहे आणि मी त्यावर काम करणं पुढं चालू ठेवलं. मी आरंभ केला तो दहशतवाद्यांच्या शस्त्रास्त्रांशी संबंधित तांत्रिक कामानं. पण शेवटी त्या दहशतवाद्यांविषयी वाटणाऱ्या तीव्र कुतूहलाला मी शरण गेले. त्या कामात मी माझ्या पुस्तकी प्रशिक्षणाचा उपयोग करण्यापेक्षा व्यक्तिमत्त्वातल्या विक्षिप्तपणाचा उपयोग केला. हिंसक माणसांच्या कृत्यांमागील गूढप्रेरणांकडं मी आकर्षिली जाते

आणि त्या प्रेरणा हुडकून बाहेर काढण्यात मी चांगलीच वाकबगार आहे.

भयाविषयीची माझी जगावेगळी प्रतिक्रिया या कामात माझे बलस्थान ठरली. इतर लोकांना ज्या गोष्टीचं भय वाटतं त्या गोष्टी मी करू शकते, याचा मला शोध लागला. उदाहरणार्थ दहशतवाद्यांना भेटण्यासाठी बॅरूट किंवा लाहोरपर्यंत प्रवास करणं. मला असं आढळून आलं की त्यांचं बोलणं ऐकत असताना मी त्यांच्याविषयी मत बनवणं थोपवू शकत होते किंवा त्यांच्याबद्दलची भीतीची किंवा दहशतीची भावनाही लांब ठेवू शकत होते. मला असंही आढळलं की मी जर केवळ उत्सुकता आणि सहवेदना दर्शवली (म्हणजे सहानुभूती नाही), तर त्या दहशतवाद्यांना माझ्याशी बोलावं असं वाटायचं.

तरीसुद्धा भीती माझा कब्जा घ्यायचीच. इतरांना भीतिदायक न वाटणारे आवाज मला भयंकर भिववतात. मला गर्दीत फिरायला आवडत नाही; विशेषत: रात्री जेव्हा हवेमध्ये लैंगिकतेची तीव्र संवेदना भरून राहिलेली असते अशा वेळी फ्लुरोसन्ट दिव्यांनी झगमगत्या शॉपिंग मॉल्समध्ये जायला मला आवडत नाही. कोणत्याही कारणानं मी अस्वस्थ असले तर सिग्नलचा क्लिक असा आवाज किंवा अगदी घड्याळाची टिकटिकही मला असह्य होते. पण खरोखरच्या भीतिदायक परिस्थितीमध्ये माझं मनोधैर्य खचत नाही. उदाहरणार्थ एक शस्त्रसज्ज दरोडा पडला असताना मी जेव्हा फरशीवर पोटावर पालथी पडले होते तेव्हा शांततेची विशिष्ट जाणीव मला घेरून राहिली होती. शांततेच्या या विस्मयकारक अवस्थांकडं मी क्वचितच लक्ष दिलं. संकटाला दुसऱ्या कोणत्याच तऱ्हेनं प्रतिक्रिया देण्याची मला इच्छाच झाली नाही आणि त्यानंतर ते प्रसंग, ज्यांनी त्या मनोवस्था पृष्ठभागावर आल्या, ते माझ्या स्मरणातही राहिले नाहीत. मी गृहीतच धरून चालले की संकटाला प्रतिसाद देण्याची ही जगावेगळी तऱ्हा माझ्या व्यक्तिमत्त्वातला विक्षिप्तपणा होता... जो खास माझा आहे. या विवक्षित प्रतिक्रिया... संकटप्रसंगी शांत राहणे पण निरुपद्रवी आवाज ऐकणे किंवा सुगंध आले की भीती वाटणे... या प्रतिक्रिया हे जबरदस्त आघातानंतर आलेले (ज्यांचा चांगला अभ्यास झालाय) असे दूरगामी परिणाम होते आणि त्याची मला कल्पनाच नव्हती.

मी एका थेरपिस्टचा सल्ला घेतला. माझ्यामध्ये भावनांची उणीव होती म्हणून नव्हे, आपण आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवावं असं मला वाटत होतं. मी थेरपिस्टला म्हटलं की या उपचारांमधून मला दोन गोष्टी साधायच्या आहेत. एक म्हणजे भावनोद्दीपित न होणं आणि दुसरं कामात अधिक कार्यक्षम होणं. मला असं

वाटत होतं की, भावना मग ती कोणतीही असो ती जीवनात आपल्या प्रगतीच्या आड येते. तिनं मला सांगितलं की मला जे वाटत होतं की मी जन्मत:च काही गुण घेऊन आलीये... अचानक हालचाली झाल्या तर त्या प्रति असलेली कमालीची संवेदनशीलता, सुगंध, ध्वनी, प्रकाश याहीबाबत तशीच संवेदनशीलता ही प्रत्यक्षात जबरदस्त आघातानंतर राहिलेले व्रण होते. ही कदाचित आघातानंतर येणाऱ्या ताणामुळं उद्भवलेली विकृती असेल (PTSD-पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसॉर्डर) असंही तिनं मला सुचवलं.

या रोगनिदानावर माझा विश्वास बसला नाही. PTSD काय प्रकार आहे हे मला सैनिकांबरोबर काम केल्यानं माहिती होतं आणि माझा स्वत:चा जीवनानुभव अशा प्रकारच्या मनोविकारात फलद्रूप होईल याची मी कल्पनाही करू शकत नव्हते. माझ्यावर झालेल्या बलात्काराची स्मृती तर मी खूप वर्षांपूर्वी गाडून टाकली होती. मला वाटत होतं, मी त्यावर मात करून पुढं सरकलीये. भूतकाळात अडकून राहण्यापेक्षा, दहशतीखाली पिचून जाण्यापेक्षा मला समाजासाठी योगदान करायचं होतं. कोणत्याही प्रकारे भयाचा प्रभाव माझ्या निर्णयांवर पडायला मला नको होता. आणि तरीदेखील विरोधाभास असा की दहशतवादाने माझे मन व्यापून टाकले होते. दुसऱ्यांना जखमी करणाऱ्यांच्या अंत:स्थ हेतूंचा सखोल अभ्यास करणं मला भाग आहे असं मला वाटू लागलं. त्यांची दहशत वाटण्याऐवजी मी त्या दहशतीचाच अभ्यास केला.

दहशतवादावरचं माझं दुसरं पुस्तक पूर्ण झाल्यावर, बलात्कार घडत असताना आणि तो घडून गेल्यावर माझ्या जीवनात काय उलथापालथ झाली ते मला समजून घ्यावंसं वाटलं. पोलिसांच्या अहवालाची एक संपूर्ण प्रत त्यांनी मला द्यावी अशी मी विनंती केली. २००६ मध्ये जेव्हा पोलिसांनी ती फाईल संकलित करण्याच्या दृष्टीनं वाचली तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की मुलींवर बलात्कार करणारा एक गुन्हेगार अजूनही मोकाट फिरत असण्याची शक्यता होती. लहान मुलांवर बलात्कार करणारे तुमच्या आमच्यासारखेच म्हातारे होतात. पण ते बरेचदा त्या गुन्ह्याची पुनरावृत्ती शारीरिकदृष्ट्या हतबलता येईपर्यंत करत राहतात.

पोलिसांना माझी मदत हवी होती पण मलाही त्यांची मदत हवी होतीच. मी त्यांची मुलाखत घेतली. त्या दहशतवाद्याच्या गुन्ह्यामागची प्रेरणा जशी मला समजून घ्यायची होती तशीच एक अनामिक भीती काबूत आणण्यासाठी माझ्यावर बलात्कार करणाऱ्याला समजून घेण्याची गरज मला भासली... आयुष्यात पहिल्यांदा मी या भीतीचा अनुभव घेत होते.

माझ्या लवकरच लक्षात आलं की गुन्हा घडला तेव्हा मी अगदीच लहान नव्हते. तरीसुद्धा बलात्काराविषयी बरेचसे तपशील माझ्या स्मरणातून गेले होते. मी माझं व्यावसायिक जीवन दहशतवाद्यांच्या संदर्भात जो प्रश्न विचारण्यात घालवले त्याचं उत्तर देणं मला भाग पडलं... ज्यानं माझ्यावर बलात्कार केला त्या मुलाचं पुढं काय झालं? त्याच्या जीवनकहाणीत असं काही होतं का की ज्यामुळं निदान अंशत: तरी त्याला मला आणि माझ्या बहिणीला का दुखवावंसं वाटलं याचं स्पष्टीकरण देईल? त्यानंतर त्याचं पुढं काय झालं? मला हेही जाणून घ्यायचं होतं की, बलात्कार होत असताना मी एक प्रकारच्या समाधी अवस्थेत गेल्यासारखी का वागले? आणि त्यानंतरही जेव्हा जेव्हा मला खरी भीती वाटते तेव्हा तेव्हा माझी मनोवस्था तशीच का होते? आणि याहूनही काही मोठ्या प्रश्नांनी मला पोलिसांकडं अहवाल मागण्यास प्रवृत्त केलं. हिंसक मरणाची धमकी आपल्यापैकी काही जणांना नेहमीसाठी, अगदी सूक्ष्म प्रमाणात का होईना, का बदलवून टाकते? जेव्हा आपल्याला भयचकित व्हायला पाहिजे अशा परिस्थितीत आपण अचानक बधिर किंवा शांत का होतो? विवक्षित सुवास किंवा काही ध्वनी आपल्यापैकी काही जणांच्या मनामध्ये दहशतीची भावना किंवा असह्य भीती का उत्पन्न करतात?... अगदी अशा परिस्थितीमध्येसुद्धा, जेव्हा आपल्याला निदान बौद्धिक पातळीवर तरी माहिती असते की आपण पूर्णतया सुरक्षित आहोत?

मग ही कहाणी दोन मुलींवर झालेल्या बलात्कारापुरती सीमित न राहता खूप विस्तारली. असं वाटलं की सारा समाज अस्वीकृतीच्या मन:स्थितीत आहे. पोलिसांनी योग्य दिशेनं गुन्ह्याचा तपास केला नव्हता. त्यांनी फार लवकर हात झटकून तपास थांबवला. जेव्हा आम्ही कंठशोष करून सांगत होतो की तो गुन्हेगार आमच्या ओळखीचा नाहीये, तेव्हा माझ्या बहिणीवर आणि माझ्यावर त्यांचा विश्वास बसला नाही. १९७३ मध्ये काँकर्ड, मॅसॅच्युसेट्समध्ये पिस्तुलाचा धाक दाखवून बलात्कार, सर्वथा असंभवनीय होता. अस्वीकृती ही फार मोहात पाडणारी गोष्ट असते याचं शिक्षण मला लवकरच मिळणार होतं. त्रयस्थपणे उभं राहून मजा पाहणाऱ्यांसाठी अत्यंत आकर्षक अशी. ज्यांना आयुष्यात पुढं जायचं आहे अशांसाठी टाळता न येणारी. दहशतीच्या त्या क्षणी अस्वीकृती आणि स्वत:ला त्यापासून वेगळं करणं ही त्या गुन्ह्याची शिकार झालेल्या व्यक्तीसाठी जीवनरक्षक आयुधं आहेत. परंतु प्रदीर्घ काळापर्यंत असा नकार, अशी अस्वीकृती घातक ठरू शकते. त्या प्रकरणात आपल्या समाजाच्या नकाराची परिणती अन्य अनेक मुलींवरील बलात्कारामध्ये, कमीतकमी ४४ आणि बळींपैकी निदान एकीच्या

आत्महत्येत झाली.

पोलिसांच्या फाइल्समध्ये त्या प्रसंगाचे तपशील मला पुन्हा नव्यानं आढळून आले. पण तेवढंच नाही, तर माझी त्या गुन्ह्याबाबत आणि माझ्या कुटुंबाची जगावेगळी प्रतिक्रिया ही हिंसक माणसांचा बारकाईनं अभ्यास करण्याकडं मी का ओढली गेले हे एक कारण होतं. मी आयुष्यभर तेच करत आले होते. त्यांना माणसाळवण्याचा एक मार्ग म्हणून आणि माझी स्वत:ची भीती काबूत आणण्यासाठी... अशी भीती, अशी दहशत जी मला कधी वाटलीच नाही.

हे पुस्तक, या दीर्घ काळात न उलगडलेल्या गुन्ह्याची उकल करताना पोलिसांनी केलेल्या तपासाचा मागोवा घेतं, तसंच तो गुन्हेगार मुलींचा बलात्कारी कसा बनला याविषयी केलेल्या तपासाची मांडणी माझ्या अभ्यासातून केली जाते. माझ्यामध्ये PTSD ची लक्षणं का दिसू लागली या कारणांचा मी घेतलेला मागोवा या पुस्तकात आहे. माझ्या स्वत:च्या पूर्वेतिहासातली ही चौकशी दहशतवाद्यांच्या घेतलेल्या मुलाखतीपेक्षा कितीतरी अधिक भीतिदायक होती. हे करणं, दहशतीच्या डोळ्याला डोळा भिडवणं, मदतीशिवाय तर अशक्यच होतं. ट्रॉमा आणि डिसोसिएटेड स्टेट्स (फुटीर मनोवस्था) यातील तज्ज्ञ थेरपिस्ट आणि ज्याने मला माझ्या बलात्काराची बारकाईने चौकशी करण्यास उत्तेजन दिले आणि मी ती चौकशी करत असताना त्याने मला मदतीचा हात देऊ केला, असा एक साथीदार या दोघांचं बहुमोल साहाय्य मला लाभलं.

## लेखिकेची टिप्पणी

पुस्तक लेखनाचा हा काळ पुन्हा एकदा जगणं माझ्यासाठी किती क्लेशदायक असणार आहे, याची कल्पना असल्यामुळे माझ्याशी ज्यांनी आपले स्वतःचे अनुभव शेअर केले, त्यांना त्यांच्या खऱ्या नावांनिशी मला जगासमोर आणायचं नव्हतं, म्हणून मी ज्यांच्या ज्यांच्या मुलाखती घेतल्या (पीडित, त्यांचे कुटुंबीय, मित्र व पोलीस अधिकारी) त्या सर्वांची नावे मी बदलली आहेत. तसेच त्यांची ओळख पटवणारे अन्य तपशीलही बदलले आहेत. उदा. ते राहत होते त्या शहरांची नावे. त्यांचे अनामिकत्व जपण्यासाठी ते आवश्यकच होतं. तसं पाहता, पाचव्या प्रकरणात मेरीच्या तोंडी (टोपणनाव) मी जे उद्‍गार घातले आहेत, त्यांतले काही त्या बलात्काऱ्याला ओळखणाऱ्या दुसऱ्याच एका व्यक्तीचे आहेत. संभाव्य आरोपी/शोषणकर्ता असा ज्यांचा उल्लेख या पुस्तकात आला आहे,

४थी आवृत्ती

# 'स' सुखाचा!




मूळ लेखक - **जॉन ग्रे**

अनुवाद **- ॲड. शुभदा विद्वांस**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

जर तुमच्या घरातल्या भिंतींना तडे जायला लागले,
तर तुम्ही काय कराल?
प्रथम पायाबाबतची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न कराल.
जर तुमची झाडे सुकून पिवळी पडायला लागली,
तर तुम्ही झाडाला हिरवा रंग देऊन ते ठीक करण्याचा
प्रयत्न कधी कराल का? त्याऐवजी तुम्ही झाडांना पाणी घालाल,
तसेच जेव्हा आपण आपली प्रेमाची तळी भरतो,
तेव्हा आपली अनेक संकटे आपली आपणच नाहीशी होतात.
जसजसे आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी मिळत जातात

अशा कितीतरी धर्मोपदेशकांची नावं आणि इतर तपशीलही बदलण्याचा निर्णय मी घेतला. मागील काही वर्षांत वुर्स्टर आणि बॉस्टन येथील बिशपच्या अधिकारातील प्रदेशांतून बऱ्याच धर्मोपदेशकांच्या विरोधात असंख्य तक्रारी पोलिसांत आल्या. कित्येक धर्मोपदेशकांची नावं अशा घटनांमध्ये गोवली गेली असली तरी, त्यांचा या प्रसंगांमधील सहभाग सिद्ध करणं, हा माझ्या प्रकल्पाच्या कक्षेपलीकडचा विषय आहे. या सर्व प्रकरणांमध्ये माझं ध्येय होतं- कथेशी प्रामाणिक राहून तिची एकात्मता भंग न पावू देता संबंधित सर्वांचं खासगीपण जपणं.

## *समुद्रात उडी मारताना...*

***मी*** *त्याच्याबरोबर पोहायला जावं म्हणून चेट मला गळ घालतोय. मला पोहायला आवडत नाही, असं मी त्याला सांगते. मी त्याला तसं सांगतराहते. त्यानं मला आणि माझ्या मुलाला 'कयाकिंग'ला नेलं. इव्हाननंआणि मी आमचे कयाक्स (एस्किमोंची कातडी नाव) बीचवरील तापलेल्या वाळूवर आणले. चेट आणि इव्हान पोहत होते आणि मी बघत होते. त्यांच्या आनंदात आनंद लुटत होते... मनात एक सौख्याची अनुभूती होती. जेव्हा वारा वाहत असताना एखादं कुत्र्याचं पिल्लू त्याच्याबरोबर धावत असतं तेव्हा ते दृश्य पाहताना तुम्हा-आम्हाला जसा आनंद होतो तसा आनंद होता हा. मी ते कयाक्स आणखीन पुढं सुरक्षित ठिकाणी ओढून आणले. वाळूतले धारदार आणि तापलेले दगडगोटे माझ्या अनवाणी पायांना टोचत होते. माझी त्वचा तापली होती. माझ्या कानशिलांमध्ये दुखत असल्याची पूर्वसूचना मला मिळाली. मी पुरेसा द्रव पदार्थ प्यायले नव्हते. मी समुद्रात काळजीपूर्वक थोडी पावलं टाकण्याचं धाडस केलं. पायांना होणारा पाण्याचा स्पर्श थंडगार होता. पोहायची इच्छा व्हावी असं मला वाटत होतं. माझा मुलगा आणि माझा मित्र, जो अद्यापि माझा प्रियकर नव्हता, मजेत आणि शांत वाटत होते. त्यांची शरीरं त्या गार पाण्यानं निवली असतीलही, तरी मी मात्र खिन्न आणि पोळलेली.*

*मला पोहायची भीती वाटत नाही. मला तशी इच्छाच नसते इतकंच. लाटांचा लपलपता आवाज मला घाबरवतो. मी माझ्या आजोबांच्या बोटीवर असल्याची तो मला आठवण करून देतो. त्याची मला भीती का वाटावी?*

*माझ्या आजोबांना आम्हाला त्यांच्या यॉटवरून लाँग आयर्लंड साउंडवर घेऊन जायला खूप आवडायचं. कधी कधी आम्ही दूरदूरच्या सहलींना जायचो आणि रात्री जमिनीशी दोरांनी बांधून ठेवलेल्या जहाजाच्या लाकडी उतारावर घालवायचो. अशा कितीतरी विखुरलेल्या उतारांनी तो साउंड सजलेला असायचा. रात्री लाटा बोटीवर आपटताना येणारा तो आवाज मन शांत करायचा. मला वाऱ्याचा माझ्या त्वचेला होणारा तो सुखद स्पर्श आठवतोय. क्रीडा करणाऱ्या यॉट्समेनच्या शोधक जगापलीकडं असलेल्या जगाची आठवण करून देणारा तो स्पर्श होता. मला वाटायचं की हे यॉट्समेनचं जग दुर्गंधीयुक्त, किळसवाणं होतं. तिथं माणसांचा नुसता बुजबुजाट होता, ते उथळ होते, खूपच आरडाओरडा करणारे. या दडपशाहीच्या, ऐशो-आरामापलीकडच्या जगात मला हळूच निसटून जावंसं वाटायचं.*

*यॉट्सच्या उतारांवर वर-खाली हेलकावे खात, अपशब्द वापरणारी ती माणसं मला नको वाटायची. पण माझं असं यॉट्सपलीकडचं जग खरोखर अस्तित्वात होतं, याविषयी मनाची पूर्ण खात्री नव्हती. कदाचित असे अधिक स्वच्छ, शुद्ध, पवित्र जग हा माझ्या कल्पनेचाच खेळ असू शकतो.*

*आमच्या रात्रीच्या प्रवासात मुक्कामाच्या मार्गावर आम्ही बरेचदा थांबायचो आणि 'साउंडच्या' मधोमध नांगर टाकायचो. स्तब्ध राहिलं तर तो लाटांचा लपलपता आवाज ऐकू यायचा. माझी आजी आमच्यासाठी जेवण बनवायची, आजोबा आम्हाला पोहायला घेऊन जायचे. उपसागराच्या मधोमध पोहण्याचा तो अनुभव मोठा रोमांचकारी पण भीतिदायक असायचा. समुद्रकिनारा नाही, स्पष्ट दिसणारी क्षितिजरेखा नाही, विशिष्ट स्थळी नांगर टाकायची सोय नाही. समुद्राच्या पृष्ठभागाजवळ काही वेळा जेली फिश तरंगताना दिसायचे आणि मनात खाली असणाऱ्या शार्कचा विचार! आणि आजोबांचा देहसुद्धा!*

*माझी बहीण आणि मी, दोघींची कल्पनाशक्ती तरल होती. समजा एखाद्या शार्कनं आपल्या पायांचा चावा घेतला आणि आपल्याला समुद्रात खोल खोल ओढायचा प्रयत्न केला तर? तिथं तो आमच्या मेजवानीवर विनाव्यत्यय ताव मारेल. आजोबा निष्णात जलतरणपटू (पोहणारे) होते. शार्कनं आमच्या पायांचा लचका तोडला तर ते कदाचित आम्हाला वाचवू शकतील आणि शार्कनं आमची*

*काळीजं कुरतडायचा प्रयत्न केला तर निदान तत्त्वतः तरी ते आमच्या हृदयाची पोकळी शिवू शकतील. ते डॉक्टर होते. चामखीळ कसे काढून टाकायचे, पायाच्या अंगठ्यावर आलेली दाहक सूज कशी कापून काढायची, ट्यूमर्सवर क्ष-किरण कसे पाडायचे - अगदी कल्पनेतसुद्धा... हे सगळं त्यांना माहिती होतं. सुई-दोऱ्यानं शार्कनं केलेल्या जखमा कशा शिवून टाकायच्या हे त्यांना समजलं असतं.*

*माझ्या आजोबांचं शरीर मला आश्चर्यकारक प्रमाणात परिचयाचं आहे. आता जेव्हा मी माझ्या मृत आजोबांचा विचार करते तेव्हा त्यांच्या आत्म्याची नव्हे तर त्यांच्या शारीरिक देहाची संवेदना मला होते - फिकुटलेली, ओलसर, पांढरी कातडी, त्रासदायक केस. ते वृद्ध, जाडेजुडे आणि निस्तेज होते. पण ते कहाणीतल्यासारखे 'गोड म्हातारा' नव्हते तर शार्कसारखे ताकदवान होते. आजोबांची आठवण आली की काही दुर्गंधही त्यांच्या जोडीला येतात. किडणाऱ्या दातांना जंतूसंसर्ग झाल्यामुळं येणारी श्वासदुर्गंधी, त्यांचे आतले शर्ट नुकतेच धुवून घातलेले असले तरीसुद्धा त्यांना आंबूस वास चिकटून राहिलेला असे. मोठ्या आतड्याच्या होणाऱ्या हालचाली आणि त्यामुळं सुटलेला गंध... त्यांचं शरीर त्या मनाचा निचरा करण्यासाठी आतड्याला ताण द्यायचं. त्यामुळं ती छोटी बाथरूम अजूनच भयाण वाटायची. त्या बाथरूममध्ये जायला भीती वाटायची. तिथली हवा शुद्ध करण्यासाठी त्यांनी जर लायझॉलचा फवारा बाथरूममध्ये मारला तर प्रकरण अजूनच वाईट व्हायचं. त्या दोन गंधांचं मिश्रण - अशुद्धता झाकण्याचा तो प्रयत्न - एखाद्याला चक्कर येईल, ओकारी येईल असा. माझ्या दृष्टीनं हे गंध आहेत एका वृद्ध माणसाचे, विकृत विचारांचे. माझ्या आजोबांचं शरीर शरम आणि तिटकाऱ्याचं मूर्तिमंत प्रतीक होतं. पण तितकंच ते दिलासा देणारंही होतं. मला वाटायचं, आमचं रक्षण करायला ते मजबूत आणि समर्थ आहेत.*

*लहान असताना मला जेव्हा घशाचा आजार झाला होता तेव्हा त्यांनी मला त्यांच्याबरोबर त्यांच्या शॉवरखाली नेलं. मला आठवतंय त्यांच्या नग्न देहाजवळ मला त्यांनी धरलं होतं. माझ्यात उठलेला तो विजेचा लोळ; दिलासा आणि अस्वस्थता अशा दोन्ही भावनांचं मिश्रण होतं त्यात. हा दिलासा माझ्या आईच्या मायेचा स्वीकारार्ह पर्याय होता का? तोपर्यंत ती मेली होती का? की मला जवळही घेऊ न शकण्याइतकी ती आजारी होती? हस्तक्षेप न करण्याइतकी दुबळी झाली होती आणि नंतरसुद्धा मला निश्चित आठवत नाही केव्हा ते, कदाचित मी ८-९ वर्षांची असेन - आणखीन एक शॉवरबाथ. पुन्हा एकदा नग्न देहाला भिडलेलं माझं शरीर - तोपर्यंत मी ते सगळं किळसवाणं आहे हे ओळखण्याइतपत मोठी*

झाले होते.

त्या वयात मी प्राथमिक शाळेत होते आणि पुन्हा पुन्हा एक स्वप्न पडायचं मला. एक कमालीचा किळसवाणा, लिबलिबीत, पांढरा गोगलगायीसारखा प्राणी माझ्याकडं यायचा. त्या स्वप्नाची स्मृतीसुद्धा मला असह्य वाटते. आत्तासुद्धा त्या आठवणीनं घशाशी मळमळ दाटते, ओकारीची भावना वाटते आणि भीतीच्या आणि संतापाच्या एका पिंजऱ्यात बंदिवान झाल्यासारखं मला वाटतं. मी त्यातून बाहेर पडू शकत नाही. श्वास घेऊ शकत नाही. मला मदत करेल असं कुणीच नाही हे कसं शक्य आहे?

खरं म्हणजे, मला मदत करणारं कुणीच नव्हतं. माझे डॅड कामाच्या व्यापात आणि प्रेमप्रकरणांमध्ये बुडून गेले होते. माझ्या आईच्या मृत्यूची वेदना त्यांना सहन होत नव्हती. आमच्याबरोबर ते आजोबा-आजीच्या घरात राहत असले तरी मला क्वचितच दिसायचे. ते दूर दुसरीकडं राहायला गेलेत असेच मला वाटत होते.

स्वप्नातला तो गोगलगायीसारखा प्राणी - त्याला तिथं असण्याचा काहीच हक्क नव्हता, माझ्याशी बोलायचा काही अधिकार नव्हता आणि तो नियमांचं उल्लंघन करत होता, याची मला पक्की खात्री होती. तो कोणते नियम मोडतोय याविषयी मी साशंक होते; पण अशा प्राण्यांना रात्रीच्या वेळी छोट्या मुलींना टोमणे मारण्याची परवानगी नसते याची मला जाणीव होती. तरीदेखील मी स्वत:चा बचाव करण्यास असमर्थ होते. अनिश्चिततेनं मला मूक करून टाकलं होतं आणि या पुन्हा पुन्हा पडणाऱ्या स्वप्नात आसपास कोणी वडीलधारे नव्हते, तसे माझ्या प्रत्यक्ष आयुष्यातही परिस्थितीचा उलगडा करून सांगणारंही कुणी नव्हतं. त्या नियमभंग करणाऱ्या प्राण्याला शिक्षा करणारं किंवा गरज पडल्यास खोटेनाटे आरोप करणाऱ्याला शिक्षा करणारं! स्वप्नातला तो गिळगिळीत प्राणी उभा राहायचा तेव्हा पिल्सबरी डोबॉयसारखा म्हणजे पिल्सबर्ग पीठाच्या जाहिरातीत दाखवल्या जाणाऱ्या मुलाप्रमाणे दिसायचा. तो मला सांगायचा, 'तुला माझ्याबरोबर खेळायला शिकलंच पाहिजे. तू वाईट मुलगी आहेस. तू इथून कुठंच जाणार नाहीस आणि तू कधीच यशस्वी होणार नाहीस.'

माझ्या टीनएजमध्ये मला पोहायला खूप आवडायचं, ते लाँग आयर्लंड साउंडवर नसेल तरच! अर्थात... ते एव्हाना मला प्रदूषित झालेलं दिसत होतं. मला नॉर्दर्न माईन तसंच कॅनडातील थंड, निर्मळ पाणी आवडायचं. डोंगरांवर वाहणाऱ्या झऱ्यामध्ये अंघोळ करायला आवडायचं. तिथलं पाणी इतकं थंडगार असतं की तुमचा श्वास थांबेल आणि तुमच्या मनातील शरमेच्या भावनेला चुकवून


*तुम्हाला नवजीवन देऊ शकेल. पण नंतर गिळगिळीत प्राण्यांच्या विचारानं मला पोहणं असह्य होऊ लागलं. पोहण्याच्या तलावांना क्लोरीन घातलेल्या प्रसाधनगृहांची कळा येऊ लागली. समुद्रामध्ये गोगलगायी, तत्सम प्राणी आणि साप होते. मी भ्यायले होते अशातला भाग नाही; फक्त मला इच्छाच राहिली नव्हती.*

*एक महिन्यापूर्वी चेटनं आम्हाला पुन्हा पोहायला नेण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला पोहायला आवडत नाही याची मी त्याला आठवण करून दिली. आम्ही व्हेरमाँटला होतो. आम्ही एका झऱ्याजवळून चालत होतो. तोच स्फटिकासारखा स्वच्छ, खोल आणि क्वचित कुठं जलद प्रवाह असलेला झरा होता. त्याच्यात उडी मारली तर प्रवाह तुम्हाला दुसऱ्या बाजूला घेऊन जाणार. तिथं विसावायला वाळू होती. कशी कुणास ठाऊक, या वेळी मी पोहायला नकार देऊ शकले नाही आणि त्याचा परिणाम म्हणजे मला विलक्षण आनंद झाला. पण त्याच वेळी मनात भीतीसारखी कसलीतरी अनाम भावना दाटून आली.*

*नंतर त्यानं मला समुद्रकिनारी नेलं तिथं बाजूला भरतीमुळं निर्माण झालेला लहानसा तलाव होता - पोहण्यास योग्य. आणि त्याच्या दोन्ही बाजूंनी अरुंद मुखं समुद्राला जाऊन मिळणारी. त्याचं पाणी शुद्ध होतं. जागा बदलणाऱ्या भरतीच्या लाटांनी सतत धुतला जात होता तो तलाव आणि त्या तलावात छोटे जेली फिश होते. ते डंख मारत नव्हते पण शेकडो पुरुषांच्या लिबलिबीत जननेंद्रियांसारखे ते शरीराला लपेटून सुळकन निघून जात. आत्यंतिक तिटकाऱ्यासारखी दुसरी वेदना नाही. अखेरीस ते सारं माझ्या त्वचेला लपेटून, निसटून जाणारं ते कमालीचं लिबलिबीत मांस... त्याची दहशत वाटू लागल्यावर मला धर, मला त्या पाण्यातून बाहेर काढ, अशी मी चेटला विनंती केली आणि त्यानं मला पुन्हा समुद्रावर नेण्याचं वचनसुद्धा दिलं, त्यायोगे मी माझी भीती, ते समुद्रपाणी यांना नेस्तनाबूत करू शकले.*

❖

९वी आवृत्ती




# लक्ष्यवेध

लेखक - **रणजित देसाई**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

शिवचरित्रातील प्रत्येक प्रसंग म्हणजे स्वतंत्र कादंबरीचा विषय. या चरित्राइतके सर्वांगसुंदर चरित्र आजवर इतिहासाने पाहिलेले नाही. असा या चरित्राचा लौकिक.
बारा मावळांत स्वराज्याचे रोपटे रुजते, न रुजते, तोच अफझलखानाचे संकट अवतरले.
वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या हिरव्यागर्द रानावर राजकारणाचा पट मांडला गेला.
चढे घोड्यानिशी राजांना पकडून नेण्याची अफझलखानाची गर्वोक्ती होती आणि खानास मारल्याविना राज्य साधणार नाही, हे राजे पुरे जाणून होते.
या दोन राजकारण-धुरंधरांनी खेळलेला डाव म्हणजेच लक्ष्यवेध.

# स्मरण



## नारायण सुर्वे

विसाव्या शतकाच्या मध्यावर ‘दुसरा केशवसूत’ म्हणून ज्यांना अत्यंत आदराने संबोधले गेले त्या नारायण सुर्वे यांनी ‘चार शब्द’ या कवितेतून आपल्या एकूणच अस्तित्वाच्या धारदार खुणा प्रकट केल्या आहेत.

एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे
सावध असा, तुफानाची हीच सुरुवात आहे
कामगार आहे, मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे...

नारायण सुर्वे आपल्या एकूणच आयुष्याचा वेध घेताना म्हणतात की, ‘‘मी अनाथ मुलगा म्हणून जन्माला आलो. ही अतिशय दु:खद गोष्ट आहे. भूषणावह नाही. मी हा मजकूर लिहीत असताना शेकडो आया आजही विषण्ण अंत:करणाने हॉस्पिटलमध्ये, रस्त्याच्या कडेला किंवा रानाशेतांतून हजारो अर्भकांना जन्म देऊन मोकळ्या होत असतील. त्यांना तेव्हा काय वाटत असेल, हे आपण तर्कानेही जाणू शकतो. ही जन्मदात्री आई तेव्हा माझी नाळ कापून, माझ्यापासून अलग झाली असेल, तेव्हा तिच्या डोईवर आकाश फाटले असेल; भीषण वादळात सापडलेल्या

ज्योतीसारखी ती थरथरत, कावरीबावरी होत शरमिंदी झाली असेल. तिला आपले बाळंतपण जर सुखावह वाटत नसेल, तर त्याच्यासारखा मोठा शाप नाही. अशी स्त्री या कुबट जगावर थुंकेल तरी, नाहीतर सारी पोरे माझीच आहेत, अशी माया तरी लावील; तिला दुसरा पर्याय नाही. तिने पुढे काय केले असेल, हे तिचे तिलाच ठाऊक.''

नारायण सुर्वे यांच्या आयुष्यातला पूर्वार्ध एकदा का लक्षात घेतला की, त्यांच्या आत्मानुभवी कवितेची नस आपल्याला नेमकी पकडता येते.

'माझे विद्यापीठ' या कवितेत त्यांनी आपले पूर्वायुष्य विणलेले आहे.

ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती

दुकानांचे आडोसे होते, मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती... अशा देण्यात आलेल्या उठवळ आयुष्याची ऊठबस करता करता

टोपलीखाली माझ्यासह जग झाकीत दररोज अंधार येत-जात होता...

अत्यंत प्रतिकूल आयुष्य वाट्याला आलेल्या नारायण सुर्वे यांनी केवळ कवितेच्या साहाय्याने आपल्या आयुष्याला प्रतिमेच्या उन्हात अनुभवत, आपले काव्यविश्व फुलवले. 'ज्ञानपीठ' पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांनी नारायण सुर्वे यांच्या निवडक कवितांचे संपादन केले आणि त्याला एक छोटेखानी प्रस्तावना लिहिली. तिचा शेवट करताना कुसुमाग्रज म्हणतात, ''शोषणग्रस्त माणूस हे सुर्वे यांच्या कवितेचे केंद्र आहे. सुर्व्यांच्या कवितेत भेटणारी उदासीनताही कविमनाच्या प्रामाणिकपणाचीच दर्शक म्हणायला हवी; परंतु गेल्या तीन दशकांच्या काव्यलेखनाच्या प्रवासात हा कवी हताश, निराश झालेला नाही. कवीने जोपासलेल्या जीवनविषयक दृष्टिकोनामुळे कवीच्या मनात उद्याविषयी अढळ विश्वास आहे. आजच्या या अर्धपोटी, उपेक्षित जगाच्या दारात स्वप्नांचा खजिना घेऊन उद्याचा सोनेरी रथ लवकरच उभा राहील असा ठाम विश्वास सुर्वे यांच्या कवितेत आहे.''

परभणी येथे १९९५ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद नारायण सुर्वे यांना लाभले होते. २७ फेब्रुवारी २००५ रोजी त्यांना ‘जनस्थान’ पुरस्काराने सन्मानित केले गेले होते. भारत सरकारने त्यांना ‘पद्मश्री’ दिली होती. ‘कबीर पुरस्कार’, ‘नेहरू अॅवॉर्ड’, ‘सोव्हिएत लँड पुरस्कार’ असे अनेक पुरस्कार नारायण सुर्वे यांना लाभले होते. नारायण सुर्वे यांचा कालखंड आहे १९३६ ते २००७ असा होता. दलितांच्या, शोषितांच्या वेदनांना त्यांनी आपल्या कवितेतून वाचा फोडली.


दररोज स्वत:ला धीर देत जगणे; कठीण होत आहे...
किती आवरावे आपण आपणाला; कठीण होत आहे...
आकांत पसरायास मनास थोपटीत झोपवून येतो
भुसा भरलेले भोत दिसूनही; थांबणे कठीण आहे...
तडजोडीत जगावे जगतो : दररोज कठीण होत आहे
आपले अस्तित्व असूनही नाकारणे; कठीण होत आहे...
समजून समजावतो, समजावूनही नच मानतो
कोठारात काडी न पडेल, हमी देणे; कठीण होत आहे...

नारायण सुर्वे यांच्या बऱ्याचशा कविता आत्मनिवेदनाच्या विस्तृत मार्गावरून, आपल्या प्रतिमेच्या वाटा धुंडाळीत प्रकट होतात. गिरणीत कामगार म्हणून कार्यरत असताना १९५८ मध्ये त्यांनी आपल्या काव्यलेखनाला सुरुवात केली. ‘मार्क्स’चे तत्त्वज्ञान त्यांनी मानले होते. जसे आयुष्य भोगावे लागते तसा त्या कवीच्या कवितांचा रंग असतो. कवितेतला प्रत्येक शब्द कवीची जीवनविषयक भूमिकाच स्पष्ट करीत असतो. भोवतीची माणसे आणि त्यांचा अनुभव हाच सुर्वे यांच्या कवितेचा प्राणबिंदू आहे. ‘भागो नही; बदलो’ ही सुर्वे यांची वृत्ती आहे.

– वामन देशपांडे
डोंबिवली (पूर्व)
९३२४६१५०७७

**४थी आवृत्ती**

# शेलका साज




लेखक - **शिवाजी सावंत**

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

हा आहे 'मृत्युंजयकार' शिवाजी सावंत यांच्या विविधरंगी ललितलेखनाचा संच : 'शेलका साज'!

इथं सावंतांच्या खास रसश्रीमंत शैलीत वेध घेतलेले महाराष्ट्रवैभव कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जसे भेटतील, तसाच लेखकाला चकवा देऊ बघणारा वाचक अशी झूल पांघरलेला लफंगाही भेटेल.

छ. शिवराय, शंभूराजे, महाराणी येसूबाई, सरलष्कर संताजी घोरपडे यांच्या जीवनझुंजीतील आजवर मराठी वाचक मनाला अज्ञात राहिलेल्या मनामनांच्या अणीदार कंगोऱ्यांना केलेला रसबाळा, तरल ललितस्पर्श भेटेल. तसाच कसा होता - असेल शिवकालीन रणसंमुख सामान्य मावळा यावर टाकलेला डोळस व वास्तव प्रकाशझोत असेल.

इथं आर्य चाणक्याचा वेगळ्याच दृष्टीनं केलेला विचार दिसेल, तसंच, दीनदलितांना 'आधारवड' झालेल्या राजर्षी शाहूंचं क्षणदर्शन घडेल.

सावंतांनी कथा मोजक्याच बेतल्या. मालिश, भिजाणे यांतून त्यांचं या आकृतिबंधाचं बळ दिसेल. 'मुकी' ही कथा तर अल्बर्ट कामूची आठवण करून देईल - यासाठीच या संचाचं शीर्षक : शेलका साज!!

# श्रद्धांजली



## ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांचे निधन

'साहित्य हाच धर्म' मानणारे आणि 'समाजमनस्क समीक्षक' अशी ओळख असलेले ज्येष्ठ समीक्षक, साक्षेपी संपादक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष आणि जवळचे मित्र असलेले डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनानंतर प्रा. जाधव यांची प्रकृती खालावली होती. त्या घटनेचा मोठा धक्का त्यांना बसला होता. त्यांचे बाहेर फिरणेही बंद झाले होते. ढासळत असलेल्या प्रकृतीमुळे गेल्या काही महिन्यांपासून प्रा. जाधव यांच्यावर उपचारही सुरू होते. यादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांना साहित्य, शिक्षण, सामाजिक अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

प्रा. जाधव यांचा जन्म बडोद्याचा; पण कार्यभूमी महाराष्ट्र.

त्यांनी राज्य परिवहन महामंडळात नोकरी केली. पुढे मुंबई, औरंगाबाद, अमरावती येथील महाविद्यालयात १२ वर्षे अध्यापन केल्यानंतर वाईच्या विश्वकोश मंडळात एका विभागाचे संपादक म्हणून त्यांनी १९ वर्षे कार्य केले. या जबाबदारीतून मुक्त झाल्यानंतर ते पुन्हा आपल्या लेखन आणि वाचनात रमले. गाढा व्यासंग असूनही त्यांनी त्याचे प्रदर्शन कधीही केले नाही; पण व्याख्यानांतून त्यांच्या व्यासंगाचे दर्शन व्हायचे. त्यांचे विचार, लेखन यामुळे वेगळी ओळख तयार झाली. समीक्षच नव्हे, तर कविता, ललित, कोश अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतही त्यांनी विपुल लेखन केले.

दलित साहित्याकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवून समीक्षेच्या अंगाने या साहित्याचे श्रेष्ठत्व समाजात रुजविण्याचे काम प्रा. जाधव यांनी केले. ‘निळी पहाट’, ‘निळे पाणी’, ‘आनंदाचा डोह’, ‘चंदेरी चित्रहार’, ‘सांस्कृतिक मूल्यभेद’ या ग्रंथांमुळे साहित्यविश्व ढवळून निघाले. ‘साठोत्तरी मराठी कविता व कवी’ या आणि अन्य ग्रंथांमुळे मराठी साहित्याच्या समीक्षेला त्यांनी एक नवी दिशा मिळवून दिली. लेखनाबरोबरच अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी घडवले. त्यांना विद्यार्थ्यांमध्ये नव्हे, तर लेखकांमध्येही आदराचे स्थान आहे; त्यामुळेच औरंगाबाद येथे २००४ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते बिनविरोध अध्यक्ष झाले. त्यांना ‘विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आले तसेच इतर विविध पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले.

❖

# का ते सांगा!

## गोष्ट आपल्या पृथ्वीची



**पृथ्वी एक घड्याळ** - आपण जर पृथ्वीच्या घडामोडींचा संपूर्ण इतिहास चोवीस तासांच्या घड्याळात बसविला, तर कोणत्या वेळी मानव उत्क्रांत झालेला आहे? उत्तर आहे तंतोतंत ११:४८:४३ वाजता. मानवाचे आगमन किती उशिरा झाले हे समजून घेण्यासाठी आपल्याला मानवाच्या पृथ्वीवरील आगमनाची प्रत्यक्ष वेळ माहीत असणे आवश्यक आहे. ती वेळ आहे सकाळी ४

वाजता (4 a.m.) पराक्रमी असे डायनासोर- ज्यांनी १०० वर्षे पृथ्वीवर राज्य केले, ते अस्तित्वात आले १०.५६वाजता (10.56 p.m.) नंतर ११:५३:४३ वाजता सर्वांत बुद्धिमान असा प्राणी म्हणजे मानव दिसू लागले.

पृथ्वी हा असा एकमेव ग्रह आहे ज्याच्यावर सजीव सृष्टी आहे. 'का ते सांगा' हे सदर तुम्हाला घेऊन जाते एका अत्यंत मनोरंजक सफरीवर- आपल्या भव्य ग्रह पृथ्वीवर.

**आपला ग्रह**

**का बरं पृथ्वी एक विशेष ग्रह आहे?**

पृथ्वी सूर्यापासून तिसरा ग्रह आहे. पृथ्वी हा शुक्र आणि मंगळ यांच्या मध्ये येतो. तिथं आपलं घर आहे म्हणून नाही, तर अजून इतर भरपूर गोष्टींसाठी हा एक विशेष ग्रह आहे.

पृथ्वी या एकमेव ग्रहावर सजीव सृष्टी (पाणी, जीवजंतू,वनस्पती इ.) आहे. सूर्यमालेतील या ग्रहावर



सजीव सृष्टीला पूरक अशा वातावरणाबरोबरच इतरही वेगवेगळे जैविक घटक अस्तित्वात आहेत.

पृथ्वीभोवतालच्या वातावरणात २१% टक्के ऑक्सिजन असून, बराचसा भूभाग पाण्यानं व्यापलेला आहे.

आपल्या माहितीप्रमाणे ७१ टक्के पृथ्वी ही खाऱ्या पाण्याच्या महासागरानं बनलेली आहे. पृथ्वी हा असा एकमेव अंतरग्रह आहे ज्याला एक मोठा उपग्रह चंद्र आहे. पृथ्वी हा घनदाट जंगल असलेला ग्रह आहे. हा असा ग्रह आहे ज्याच्यावर अद्वितीय वैशिष्ट्यं आहेत. पृथ्वी हे अभिमान वाटेल असं घर आहे.


**का बरं पृथ्वीला काही वेळेस 'गोल्डीलॉक्स' ग्रह म्हणतात?**

जर तुम्ही गोल्डीलॉक्स आणि तीन अस्वलं ही गोष्ट



**८वी आवृत्ती**

# वपु८५




लेखक - **वपु काळे**

**किंमत : ९०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

प्रिय व.पु.,
... तुमची एकूण कथा वाचताना असं वाटतं, की तुम्ही गोष्ट सांगत आहात आणि आम्ही ती 'ऐकतो' आहोत.
मराठी कथा-वाङ्मयाच्या प्रवासात कथेनं जी वेगवेगळी वळणं घेतली आहेत, ती सर्व तुमच्या कथांतून दिसतात.
मराठी कथेच्या प्रत्येक टप्प्यावर तुमची कथा थांबून, थोडं मागं पाहून, पुढं सरकली आहे.
व.पु., तुमची कथा नव्यांत नवी आणि जुन्यांत जुनी आहे. तिनं परंपरेला सोडलं नाही, की नवतेला अव्हेरलं नाही.
तुमची कथा धबधब्याप्रमाणे वाहत नाही, समुद्राप्रमाणे अथांग वाटत नाही, नदीप्रमाणे किनाऱ्यालगत सुपीकता देत नाही.
ती झऱ्याप्रमाणे झुळझुळ वाहते, गुणगुणते. रसिकांवर मोहिनी घालते...
**मधु जामकर**

वाचली असेल तर तुम्हाला असं समजेल की गोल्डीलॉक्स ही त्या गोष्टीमधील लहान मुलगी आहे, जिला सगळ्या गोष्टी एकदम परिपूर्ण असाव्यात असं वाटायचं. तिला अशा गोष्टी नव्हत्या आवडत ज्या खूप गरम, खूप गार, खूप कठीण, खूप मऊ असत. पृथ्वीला काही वेळा गोल्डीलॉक्स ग्रह असे संबोधले जायचे, कारण अनेक कारणांमुळे हा ग्रह जीवनासाठी परिपूर्ण आहे.

हा ग्रह खूप ऊष्ण,खूप शीत नाही; किंवा खूप शुष्क वा आर्द्र नाही. आजच्या काळात शास्त्रज्ञ लोक 'गोल्डीलॉक्स ग्रह' ही पदवी अशा ग्रहांसाठी विचारात घेतात, ज्यांचं अंतर ताऱ्यांपासून योग्य आहे, ज्याद्वारा अशा ग्रहांवर जीवसृष्टी अस्तित्वात येणं शक्य आहे. दुर्दैवानं अजूनपर्यंत पृथ्वीसारखा परिपूर्ण ग्रह सापडलेला नाही.

**'पृथ्वी' नावाची उत्पत्ती**

पृथ्वी या शब्दाचं मूळ इंग्रजी आणि जर्मन भाषांत आहे. दोन्हीचा अर्थ जमीन असा आहे. हा एकमेव ग्रह आहे ज्याचं नाव ग्रीक किंवा रोमन देव आणि देवता यांच्यावरून ठेवलेलं नाही; पण कोणालाच माहिती नाही की हे नाव कोणी ठेवलं!

**पृथ्वीला निळी गोटी असं का संबोधलं जातं?**


जेव्हा तुम्ही पृथ्वीला अवकाशातून बघता, तेव्हा तुम्हाला ती निळ्या गोटीसारखी दिसते. डिसेंबर १९७२मध्ये अपोलो १७ या यानातील अंतराळवीरांच्या तुकडीनं पृथ्वीचा पहिला फोटो प्रक्षेपित केल्यावर ही संज्ञा पहिल्यांदा वापरली गेली. पृथ्वी अशी निळी गोटी

वाटते की, ज्यावर हिरव्या, तपकिरी, पिवळ्या व पांढऱ्या या रंगांचे वक्राकार मिश्रण तयार झालं आहे.

यामधील निळा रंग पृथ्वीवरील पाण्याचा साठा दर्शवितो, तर पिवळा, तपकिरी आणि हिरवा जमिनींचे प्रकार दर्शवितो आणि पांढरा रंग वातावरणातील ढगांचा आहे. चंद्राच्या कक्षेमधून २९००० किलोमीटर अंतरावरून अवकाशयानानं पृथ्वीचं हे मूळ छायाचित्र असं घेतलं आहे की, यात आफ्रिका, अंटार्क्टिका आणि अरबी द्वीपकल्पही दिसते. हा फोटो खूप विशेष आहे कारण, आत्तापर्यंतचा हा पृथ्वीचा पहिला पूर्ण असा फोटो आहे.

**पृथ्वी कशी फिरते?**

पृथ्वी दोन मार्गांनी फिरते. स्वतःभोवती फिरते. आणि स्वतःभोवती फिरता फिरता सूर्याभोवतीही फिरते. पृथ्वीच्या मध्यातून जी काल्पनिक रेषा दक्षिणोत्तर गेली आहे, त्याला पृथ्वीचा अक्ष असे म्हणतात. पृथ्वीच्या या




अक्षाभोवती फिरण्याला पृथ्वीचं परिभ्रमण म्हणतात. या मार्गाला 'पृथ्वीची कक्षा' असे म्हणतात.

पृथ्वीचा अक्ष संपूर्णतः सरळ नसून, थोडा तिरका २३.५अंश कोनात आहे. पृथ्वीच्या याच फिरण्यामुळे दिवस,रात्र व ऋतू होतात. ज्या मार्गानं पृथ्वी सूर्याभोवती फिरते त्याला 'कक्षा' असं म्हणतात. पृथ्वीला सर्वसाधारणपणे सूर्याभोवती परिभ्रमण करताना ३६५ दिवस म्हणजेच पूर्ण १ वर्ष लागतं.

**छोटा दिवस**

आपण नेहमी म्हणतो पृथ्वीला तिच्याभोवती फिरायला २४ तास लागतात. यालाच आपण एक दिवस म्हणतो, खरं पाहिलं तर हा काळ थोडा लहान आहे. पृथ्वीला २४ तासांपैकी २३ तास, ५६ मिनिटं आणि ४ सेकंद वेळ लागतो.

**पृथ्वी कशी तयार झाली?**



आपली पृथ्वी ही सौर यंत्रणेचा असा भाग आहे की, जी वायू, ढग आणि धुळींचे कण- जे सूर्य तयार होताना ४.६ अब्ज वर्षांपूर्वी राहिले, त्यापासून बनली आहे. पृथ्वीनं ४.६ अब्ज वर्षांपूर्वी आकार घ्यायला सुरुवात केली. काही धुळींचे कण, दगडांचे तुकडे आणि अवकाशातले वायू जे सूर्याच्या कक्षेभोवती होते ते हळूहळू गरम झाले आणि संपूर्ण वस्तुमान वितळायला सुरुवात झाली.

जसं जसं वस्तुमान वाढायला सुरवात झाली, तसतसं चुंबकीय शक्ती आणि गुरुत्वाकर्षण निर्माण होऊ लागलं. या दोन्हीही शक्तींमुळे अवकाशातल्या गोष्टींना अवकाशाबाहेर जायला अटकाव झाला.

ही शक्ती अवकाशातल्या इतर गोष्टींना आकर्षित करू लागली तोपर्यंत तिथला आजूबाजूचा कचरा वेगळा होऊ लागला आणि यातूनच पृथ्वी आकाराला आली. अवकाशामधले जड पदार्थ पृथ्वीच्या मध्यभागी येऊन साचले आणि त्यातून पृथ्वीचा गाभा तयार झाला आणि उरलेले कण हे पृथ्वीचं आवरण, कवच आणि वातावरण म्हणून तयार झाले. सौर यंत्रणेमधले सर्व ग्रह याच प्रक्रियेतून निर्माण झाले आहेत.



**पृथ्वीचे वेगवेगळे भाग कोणते?**

हवा, पाणी, जमीन आणि जीवन या सर्वांनी मिळून पृथ्वी बनली आहे. हाच तो ग्रह जे आपलं घर आहे. हवा ही भरपूर वेगवेगळ्या वायूंनी बनली आहे. या सर्वांमध्ये महत्त्वाचे वायू म्हणजे नत्रवायू आणि प्राणवायू जे आपल्या जीवनासाठी आवश्यक आहेत. जमीन ही पर्वत, पठार, दऱ्या आणि वाळवंटापासून बनलेली आहे. यामध्ये जमिनीच्या पृष्ठभागाखालील भाग दगड आणि धातूंचा बनलेला आहे. पाण्यामध्ये गोडं पाणी आणि खारं पाणी यांचा समावेश आहे. हे पाणी समुद्र, महासागर, नदी, तलाव, झरे, पाऊस, हिम आणि बर्फ यांतून तयार होतं.

सजीवांमध्ये माणसांबरोबरच प्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या लाखो प्रजाती- अगदी सूक्ष्मापासून महाकाय- समाविष्ट आहेत. या गोष्टींच्या परस्पर संबंधांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे ‘पृथ्वीप्रणाली विज्ञान.’

**(क्रमशः)**


**निहारिका देशमुख**


फ्रँकलिन
'फ्रँकलिन' कासवाच्या बोधपर
गोष्टींची मालिका आता मराठीत !
मूळ लेखिका
पोलेत बूर्ज्वा
अनुवाद
मंजूषा आमडेकर
किंमत प्रत्येकी ५०रु.
एकत्रित पोस्टेज १००रु.

# गणिती कोडी सोडवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | + | २ | = | |
| + | | + | | + |
| ६ | + | | = | १६ |
| = | | = | | = |
| | + | १२ | = | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | - | २ | = | |
| + | | | | + |
| ८ | | | | ७ |
| = | | | | = |
| | - | ३ | = | |





# पर्यावरण प्रदूषण


## निरंजन घाटे

**पृथ्वीवर मानवजात शिल्लक राहायची असेल,
तर पर्यावरणाचा समतोल महत्वाचा.
प्रदूषण कमी व्हायला हवे, अशा घोषणा होतात.
ह्या क्षेत्राची विविधांगी
आणि सर्वस्पर्शी माहिती देणरा एकमेव मराठी ग्रंथ**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 June, 2016. Posting Date : 11 June, 2016.


# काही निवडक पुस्तके













**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,
____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.